**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११९

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. शेख लाल शेख अमीर, अपिलार्थी
अजंठा कॉलनी, एक मिनार मस्जितसमोर,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणतीही विशिष्ट विनंती केलेली आढळून येत नाही. या अर्जाबरोबर त्यांनी त्यांचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. यावरुन त्यांना त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००५ ते ०७-०९-२००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- कोंबडी कुकूट पालन टाकण्यासाठी नगरपरिषदेच्या नियम व अटी कोणत्या आहेत, त्याची लिखित स्वरुपात माहिती द्यावी, अजंठा कॉलनीत श्री. शेख रफिक शेख उस्मान व शेख मजर शेख आफक या दोघांनी कोंबडी कुकूटपालन टाकले तर याबाबत नगरपरिषदेची परवानगी घेतली आहे काय, जर घेतलेली नसेल तर आपण त्यांच्यावर कारवाई का केली नाही, विनापरवाना सुरु केलेले कोंबडीपालनचे बांधकाम व सुरु केलेला व्यवसाय आपण लवकरात लवकर बंद करावा व तो व्यवसाय बंद केल्याबाबत लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी अपिलार्थीस ४ रुपये इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००७ रोजी माहिती पुरविली, तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-११-२००७ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल झालेल्या अपिलावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी असा निष्कर्ष

काढला की, अपिलार्थी यांनी कोंबडी कुक्कुटपालन टाकण्यासाठी नगरपरिषदेच्या नियम व अटी काय आहेत याबाबत विचारलेली माहिती शासकीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीच्या दिवसापर्यंत दिली नव्हती. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती दिली गेली नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. या अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ विनंती अर्जानुसार ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याची सूचना केली आहे. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-११-२००७ रोजी लेखी स्वरुपात पारित केले आहेत, तथापि सुनावणीच्या वेळी दिलेल्या तोंडी आदेशावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ कोंबडी कुकुट पालनाकरिता नगरपरिषदेची परवानगी घेतली नसेल तर आपण त्यांच्यावर कारवाई का केली नाही यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची आहे व त्यांनी "याबाबत नगरपरिषद आपल्याशी बांधील नाही" असे अपिलार्थीस कळविले आहे. मूळात येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिका-याकडून अमुक एक कारवाई का केली गेली नाही, अशा अर्थाचे स्पष्टीकरण अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे व जन माहिती अधिका-याने ते अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या मुद्दयाव्दारे ही माहिती मागितली आहे तो मुद्दाच मूळात अवैध आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविली असती तर

ते अधिक योग्य झाले असते असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात माहिती देतांना चुकीची पध्दत वापरल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १८-०९-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी प्रतिसाद दिला असला तरी या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती अपूर्ण होती. अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये दिली आहे. या माहितीमध्ये देखील एका मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस चुकीच्या पध्दतीने दिल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण व नंतर चुकीच्या पध्दतीने माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले असल्यामुळे संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस, आता जन माहिती अधिकारी यांच्यायाकडून आवश्यक असलेली माहिती मिळाली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे उपस्थित केलेल्या प्रश्नांचा निपटारा जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, सेलू यांनी आजमितीस केला असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख लाल शेख अमीर, अजंठा कॉलनी, एक मिनार मस्जितसमोर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२०

निर्णय दिनांक  १७-१२-२००८

१ श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, अपिलार्थी
राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टॅन्ड रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (मु.), परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे प्लेट फार्म वेईंग मशिनच्या दुरुस्ती कामाचे थकीत बील

मिळणेबाबत व बील न देण्याबाबतची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली होती, तथापि आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंड लावण्यात यावा अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"प्लेट फार्म वेईंग मशिनक्षमता १००० किलो याचे दुरुस्ती व मुद्रांकण कामाचे थकित बिल मीळणेबाबत बिल क्र. १९८/१९९ दिनांक ०९/१२/२००३.

थकित रक्कम रुपये ७५०/- शासणाचे पातडळी प्रमाणपत्र क्र. ७२८८६६, दि. ९/१२/२००३.

सदरील थकित रक्कम अद्याप अदा करण्यात आली कारण काय कळावे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना सात दिवसाच्या आत त्यांच्याकडे अहवाल सादर करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तदनंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे याच विषयावरील त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या व दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठपुरावा केल्याचे दिसून येते.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करेपर्यंत देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे बील अदा करण्यात आले नाही किंवा त्यांनी विचारलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे रुपये २५००० इतका दंड व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. ज्ञानदेव शामराव उदास, कनिष्ठ लिपीक, भांडार शाखा यांना अपिलार्थीच्या देयकाची रकम घेऊन त्यांच्याकडे पाठविले असता, सदर बील स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद झाल्यानंतर अपिलार्थी हे सुनावणीमध्ये हजर झाले आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यावर असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. उदास नावाचे कर्मचारी त्यांच्याकडे आयोगाची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर दोनदा येऊन गेले होते व त्यांनी अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दाखल केलेले व्दितीय अपील मागे घेण्याची विनंती त्यांना केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीव्दारे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याची मांडणी त्यांनी स्पष्ट स्वरुपात केलेली नाही. त्यांच्या प्रथम अर्जामधील मुद्दा ३ (I) व (III) चे अवलोकन केले असता, अपिलार्थीस त्यांचे बील जन माहिती अधिकारी यांनी अदा न करण्याचे कारण अवगत करुन हवे असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. या अनुमानास आज सुनावणीसाठी उपस्थित असलेले अपिलार्थी यांनी दुजोरा दिला आहे. एवढे जरी असले तरी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या अर्जावर अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जन

माहिती अधिकारी यांनी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करणे गरजेचे होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कारवाई अद्यापपावेतो केलेली नाही जर अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाचा जर त्यांना काही बोध झाला नसेल तर त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळवून त्यांच्या मूळ अर्जावर निर्णय देणे त्यांचे कर्तव्य होते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर देखील यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी काहीही कारवाई केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. आपल्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्तिचपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने व अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची स्पष्टपणे मागणी न केल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भीत केलेल्या त्यांच्या थकीत बीलाच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी एका आठवड्याच्या आत कार्यवाही करुन अपिलार्थीस त्यांचे बील देण्याचे आश्र्वासित केले आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टॅन्ड रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (मु.), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२१

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. प्रभाकर पांडुरंग लोखंडे, अपिलार्थी
रा. डॉ. आंबेडकरनगर, पुर्णा, तालुका पुर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),
तहसील कार्यालय, पुर्णा, तालुका पुर्णा,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार पुर्णा, तालुका पुर्णा,
जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती, जन अपिलीय अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. अबुबकर तारमहमद, श्री. इरवंत बापुअप्पा कु-हे व श्री. व्ही. व्ही. ताडकळसकर हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून, पुर्णा तालुक्यातील ३ अर्धघाऊक रॉकेल विक्रेते, श्री. अबुबकर तारमहमद, श्री. इरवंत बापुआप्पा कु-हे व श्री. व्ही. व्ही. ताडकळसकर यांना संलग्नीत असलेल्या रॉकेल हॉकर्स/ किरकोळ व रिटेल विक्रेते यांना वाटप केलेल्या रॉकेल वाटप बील पुस्तकाच्या पावत्या व त्यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलच्या के. एल. प्रमाणे त्यांचे रॉकेल वितरण व स्टॉक वितरण रजिस्टरच्या सत्यप्रती, तसेच पुरवठा निरीक्षक यांच्याकडून तपासणी केलेल्या मासिक अहवालाच्या सत्यप्रती व त्यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल व टॅंकरच्या पोच पावत्याच्या सत्यप्रती, अशी माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती विहित मुदतीत दिली नाही. माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार पुर्णा यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी हे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात उद्धत केलेली ०१ एप्रिल २००२ ते ३० जून २००७ पर्यंतच्या कालावधीची माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी म्हणजे दिनांक १६-०८-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाला उद्देशून लिहिले असून त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाकडे असल्याचे नमूद केले आहे व अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे (त्रयस्थ पक्षाकडे) योग्य त्या

कार्यवाहीस्तव वर्ग करण्यात येऊन ३० दिवसांच्या आत अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्रयस्थ पक्षाला सूचित केले व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संपर्क साधून हस्तगत करण्याचे सूचित केले. यानंतर संबंधीत त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस दिनांक ०४-०९-२००७ व ०७-०९-२००७ रोजी तीन वेगवेगळी पत्रे पाठवून अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे रुपये १००८०, १००८० व रुपये ७३३६ इतके शासकीय कोषागारामध्ये भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्रयस्थ पक्षाने दिलेल्या सुचनेप्रमाणे कोषागारात केला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २०-१०-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात न भरल्यामुळे फेटाळून लावून निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे त्यावेळीही तयार होती व आजही तयार आहे. तथापि या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्रयस्थ पक्षाने सूचित करुनही अपिलार्थीने भरणा केले नाही. अपिलार्थीस ती माहिती १५ दिवसाच्या आत देण्यास ते तयार आहेत. सदर कालावधी त्यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी लागणार आहे. त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस,

त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी त्याच दिवशी प्रथम प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ चे अवलोकन केले असता, कोणाही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची मागणी केली असता ती अर्जदारास माहिती देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाने नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी यांनीच देणे अभिप्रेत आहे. अर्जदारास सार्वजनिक स्वरुपाची माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त होणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती जरी त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असली तरी अधिनियमातील योग्य त्या पध्दतीचा अवलंब करुन ती माहिती त्यांच्याकडून घेऊन अंतीमतः अर्जदारास त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी निर्णय देणे हे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाला अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली सूचना पूर्णतः अवैध आहे. माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ गाभाच हा आहे की, कोणाही अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त करुन घेता येते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमास त्यांच्या या कृतीव्दारे छेद दिल्याचे निःसंशयपणे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ती माहिती सार्वजनिक स्वरुपाची होती व माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्रयस्थ पक्षाकडून मागवून ती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविणे अपेक्षित होते या परिस्थितीत ही उचित कारवाई त्यांच्याकडून होणे अपेक्षित होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उपरोक्त बाब वगळता, अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून, शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलच्या के. एल. प्रमाणे त्यांचे रॉकेल वितरण व स्टॉक वितरण रजिस्टरच्या सत्यप्रती व पुरवठा निरीक्षक यांच्याकडून तपासणी केलेल्या मासिक अहवालाच्या सत्यप्रती या दोन बाबी, अशी माहिती मागितली होती. शासनाकडून

प्राप्त होणारे रॉकेलचे नियतन जन माहिती अधिकारी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी करीत असतात, पुरवठा निरीक्षक हे जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील असल्याने या मुद्दयांशी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. यासंदर्भात शासनाने त्यांच्या परिपत्रक क्रमांक रॉकेल- १००५/२५८२/प्र.क्र.४८४४/नापु २७, दिनांक १३ जानेवारी २००६ च्या परिपत्रकाव्दारे विस्तृत सूचना दिल्या असून या सुचनांचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या भागासंबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असणे अपेक्षित आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आश्वासित केले आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा नीट अभ्यास न केल्याने अपिलार्थीस माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या हातून ही अनियमितता घडली असल्याचे दिसून येते. आपल्या अशा प्रकारच्या चुकीच्या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १७-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर पांडुरंग लोखंडे, रा. डॉ. आंबेडकरनगर, पुर्णा, तालुका पुर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग), तहसील कार्यालय, पुर्णा, तालुका पुर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार पुर्णा, तालुका पुर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२२

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. खाडे किसनप्रसाद धोंडीबा, अपिलार्थी
मु. पो. चारठाणा, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
परभणी, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय दिला नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे विचाराधीन अपील सादर केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००० ते २००७ जूनपर्यंतच्या कालावधीतील काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यातील मुद्दा क्रमांक १) - जिंतूर चारठाणा रोडवर असलेल्या हलविरा पाटीच्या पूर्वेस नागानगर या राजस्थानी शेतक-यास गेल्या आठवडाभरात दिलेल्या कनेक्शनची लेखी माहिती मागितली होती. या लेखी माहितीमध्ये, संबंधीताने वीज कनेक्शनसाठी केलेल्या अर्जाचा दिनांक, कोटेशन पावतीची सत्यप्रत, त्या कनेक्शनसाठी वितरण कंपनीने घेतलेल्या वरिष्ठ कार्यालयाच्या मंजुरीच्या पत्राची सत्यप्रत, मुंजरीनंतर पुरविले गेलेले सिमेंट पोल, तार आदिंचा दिनांक, तसेच विद्युत पुरवठा हा शेतीपंपासाठी / घरगुती याबाबत या व मुद्दा क्रमांक २) चारठाणा कनिष्ठ अभियंता कार्यालयाअंतर्गत आजपर्यंत २००० पासून किती शेतक-यांनी कनेक्शनसाठी अर्ज केले आहेत, त्यांनी रितसर कोटेशन भरले असल्यास त्यांचे नांव व दिनांक, त्यांना कनेक्शन दिलेले नसल्यास त्याची कारणे - या मुद्दयांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती यासंदर्भात दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज खाजगी कुरियर सर्व्हिसकडून दिनांक ०६-०७-२००७ रोजी पाठविला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मधील "त्यांना कनेक्शन दिलेले नसल्यास त्याची कारणे" हा मुद्दा वगळता, उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ही माहिती अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीशी सुसंगत असल्याने देय ठरते. अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास व अपील

अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी प्रतिसाद न देण्याची कारणे, संबंधित सर्व जण सुनावणीसाठी अनुपस्थित असल्याने आयोगास समजू शकत नाहीत.

वरील परिस्थितीत वर्णिलेल्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय ठरत आहे. ही माहिती न देण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही व ही माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ चा भंग होईल, अशातली कोणतीही बाब येथे दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाने विनामूल्य पुरवावी. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मिल कॉर्नर, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी रितसर अर्ज करुनही अधिनियमान्वये त्यांना देय असलेली माहिती न दिल्याच्या या प्रकरणाची त्यांनी आपल्या पातळीवर सखोल चौकशी करुन आवश्यक वाटल्यास संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई करावी / प्रस्तावित करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाने विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद यांना, त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत पूर्ण करुन, संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन, तदनंतर आवश्यक वाटल्यास, संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई करावी / प्रस्तावित करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खाडे किसनप्रसाद धोंडीबा, मु. पो. चारठाणा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मिल कॉर्नर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२४

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. सुरेशचंद ताराचंद मुथा, अपिलार्थी
२१, राजाराणी अपार्टमेंट, पद्मपूरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जालना

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे गैरकायदेशीर सावकारी संबंधी नियम व कारवाईबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत कालावधी दिनांक ०९-१२-२००४ ते २३-०४-२००७ असा असून अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्व्ये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्याप्रीत्यर्थ रुपये १३० इतके शुल्क शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने सदरचे शुल्क कोणत्या लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात भरावयाचे याचे अपिलार्थीस मार्गदर्शन केले आहे.

तथापि शुल्क न भरता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-१०-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही

माहितीची मागणी केली होती. सदर माहिती त्यांना व्यक्तिशः हवी होती, ही माहिती घेण्यासाठी, माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०९-०७-२००७ रोजी उपस्थित झाले होते. अपिलार्थी यांनी त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, या मूळ अर्जासंदर्भात दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपिकाची सही व कार्यालयाचा शिक्का दाखविला. अपिलार्थीचा हा पुरावा ग्राह्य धरण्यात येत असून, यावरुन अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती व ही माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १२-०७-२००७ रोजीचे कथित पत्र व जन अपिलीय अधिकारी यांचे त्यांना सुनावणीसाठी हजर राहण्यासाठीच्या सुचनेचे दिनांक २४-०८-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी जर वेळीच कळविले असते तर रुपये १३० इतके शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्याचवेळी भरले असते व त्यांना पुढील प्रथम व व्दितीय अपील करण्याचा खर्च करावा लागला नसता. आपल्या युक्तिवादाच्या शेवटी अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी व विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. तदनंतर परत दिनांक ०१-०९-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी या शुल्काचा भरणा करण्याबाबत स्मरणपत्र दिले व अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली असून यावरुन त्यांनी हे पत्र त्यांच्या कार्यालयातील नोंद क्रमांक

१२४३/०७ नुसार अपिलार्थीस दिनांक १२-०७-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येईल व दिनांक ०१-०९-२००७ रोजीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याच्या प्रित्यर्थ त्यांनी पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील नोंद क्रमांक १६१७ ने पाठविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यास त्यांनी प्रथमतः विहित मुदतीत सूचित केल्याचे दिसून येत आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२ जुलै २००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्राव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काचा सविस्तर हिशोब (संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर) अपिलार्थीस कळविला नाही. केवळ या तांत्रिक चुकीमुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १२ जुलै २००७ रोजीचे पत्र अवैध ठरत असून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी यांनी आज युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्याचे टाळले अथवा त्यांच्यापासून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१७-१२-२००८	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सुरेशचंद ताराचंद मुथा, २१, राजाराणी अपार्टमेंट, पद्मपूरा, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२५

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, अपिलार्थी
रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष भुसंपादन अधिकारी,
कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन

माहिती अधिकारी यांनी, आजपर्यंत काही कळविले नाही असे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे गट नंबर १५२ मौजे वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गाकरिता, संपादित क्षेत्राच्या घेतलेल्या व्हिडीओ शुटींगच्या दिनांक ०३-०७-२००२ ची कॅसेट मिळण्याबाबत अर्ज केला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली कॅसेट त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीस व्हिडीओ कॅसेट देता येत नसल्याचे कळविले व अपिलार्थीने उपस्थित केलेल्या प्रकरणात उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी स्थळपाहणी केली असल्याने व स्थळपाहणीच्या वेळी व्हिडीओ शूटींग घेतली असल्यास कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीस हे अपील करण्यासाठी ११ महिन्याचा विलंब झाला असल्याने अपिलार्थीचे हे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावले व अपिलार्थीस त्याप्रमाणे दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या पत्राने कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस हा निर्णय लेखी कळविल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीवरुन सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीचा हा अपील अर्ज फेटाळल्यानंतर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये याच माहिती-करिता परत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दिला. यानंतर अपिलार्थीने याच विषयावर दिनांक २१-०८-२००८ रोजी दोन वेगवेगळी अपिले दाखल केली. ही अपिले अनुक्रमे विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ व उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याविरुध्द केली होती, याबाबत जन

अपिलीय अधिकारी यांनी या अपिलांवर सुनावणी घेऊन दिनांक १९-०९-२००८ रोजी आपले आदेश पारित केले. सदर दोनही आदेश अपिलार्थीस प्राप्त झाले असून, या आदेशामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांनी विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्याविरुध्द अपिलार्थीने केलेले अपील फेटाळले व उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याविरुध्द केलेले अपील मंजूर करुन उपविभागीय अधिकारी वैजापूर यांना अपिलार्थीस, त्यांच्याकडे कॅसेट उपलब्ध असल्यास ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कळविले व उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे असे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कॅसेटची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्या शेतातून मुंबई-नागपूर महामार्गाच्या बांधकामाकरिता त्यांच्या मालकीची शेतजमीन भुसंपादन कायद्याखाली संपादित करण्यात आली होती. सदर भुसंपादनाचा मोबदला त्यांना प्राप्त झाला असून सदर मोबदल्याची रक्कम निश्चित करतांना प्रत्यक्षतः त्यांच्या शेतात जेवढी झाडे अस्तित्वात होती त्यापेक्षा झाडांची संख्या कमी दाखविण्यात आली आहे. त्यांनी या व्हिडीओ कॅसेटची मागणी केली असता सर्व संबंधीत कार्यालयांनी त्यांना ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविल्यावरुन त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याकडे ही कॅसेट उपलब्ध असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे अभिप्राय या त्यांच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या पत्रामध्ये व्यक्त केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली कॅसेट उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे

अपिलार्थीने मागणी केलेली कॅसेट उपविभागीय अधिकारी वैजापूर यांच्या कार्यालयात असण्याची शक्यता असल्याचे कळविले आहे. कॅसेट काढली होती किंवा कसे / असल्यास अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे दिनांक ०३-०७-२००२ रोजी कोणत्या प्राधिकरणाने कॅसेट काढली, यासंदर्भात अपिलार्थीने कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. याच माहितीकरिता अपिलार्थीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे दुसरा अर्ज देखिल केला आहे त्यामुळे या प्रकरणी मूलतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चितपणे कोणत्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे किंवा कॅसेट काढून ठेवण्याचे आदेश कोणी कोणाला दिले होते या प्रश्नांची उत्तरे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अभिलेख्यावरुन प्राप्त होऊ शकत नाही, त्यामुळे आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली कॅसेट उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकणार नाहीत, हे उघड आहे. सबब अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२६

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, अपिलार्थी
रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते
विकास महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ, अदालत रोड, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राविरुध्द केलेले आहे, तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी, गट नंबर १५२ मौजे वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गाकरिता संपादित क्षेत्राची स्थळपहाणी, पंचनामा नक्कल, व्हिडीओ शुटींगची नक्कल, त्यांचे झाडासोबत घेतलेल्या फोटोची कॉपी व दिनांक ०३-०७-२००२ ची कॅसेटची प्रत, त्यांना मिळवून देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे पिकाची नुकसानभरपाई मिळण्याकरिता दिनांक २५-०९-२००६ रोजी केलेल्या अर्जावर काय कारवाई केली, याची माहिती मागितली होती. तसेच त्यांना नुकसान झालेल्या पिकाची नुकसानभरपाई मिळाली नाही असेही त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांनी काय कारवाई केली, याचे सविस्तर विवेचन या पत्रामध्ये अपिलार्थीस केले आहे. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने त्यांच्या आवश्यक असलेल्या माहितीचा वाव बदलून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नागपूर-मुंबई महामार्गाच्या संपादित क्षेत्राची स्थळपहाणी व संपादित क्षेत्राची नक्कल, व्हिडीओ शुटींगची नक्कल व त्यांच्या झाडासोबत काढलेल्या फोटोच्या प्रतीची मागणी केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०४-०९-२००७ रोजी त्यांच्याकडे चर्चेसाठी बोलाविले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजी पाठविले असल्याचे दिसून येते. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या अपिलावर चर्चा होऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जातील प्रत्येक मुद्दयावर काय कारवाई करावयाची हे निश्चित झाले. या चर्चेमध्ये विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास

महामंडळ व उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या स्थळपहाणी व पंचनाम्याच्या प्रती १५ दिवसाच्या आत देण्याच्या सूचना देण्याचे निश्चित झाले व अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या अतिरिक्त मुद्दयाबाबत अपिलार्थीस तात्काळ स्थिती अवगत करुन देण्यात आली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्याप देखील माहिती प्राप्त झाली नाही. दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी काय कारवाई केली, याचे सविस्तर विवेचन करणारे पत्र अपिलार्थीस दिले असून सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या, पिकाच्या नुकसानभरपाईसंदर्भात केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या केलेल्या अर्जावर, केलेल्या कारवाईची अपिलार्थीस सविस्तर कल्पना दिली आहे. सदर पत्र प्राप्त होऊनही अपिलार्थी यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथमतः वाढीव माहितीची मागणी केली. या

वाढीव माहितीमध्ये देखील अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०९-२००७ रोजीच्या घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त पुरविले आहे. यावरुन अपिलार्थीने वाढीव माहितीची मागणी करुनही ती देण्यास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदारास त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविण्याची कोणतीही तरतूद नाही. अर्जदाराने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम व नंतर व्दितीय अपील अपिलीय प्राधिकरणाकडे करणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होऊनही प्रथम व व्दितीय अपिलामध्ये माहितीची व्याप्ती वाढविल्यामुळे व अशा प्रकारे माहिती व्याप्ती वाढविण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नसल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस त्यांच्या वाढीव माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळा स्वतंत्र अर्ज करणे भाग आहे असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, अदालत रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२७

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, अपिलार्थी
रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक ०९-०८-२००७ रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला असता त्यांना आजपर्यंत संबंधितांनी काहीही कळविले

नाही. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशिलामध्ये -- गट नंबर १५२ मौजे वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गाकरिता संपादित क्षेत्राची स्थळपहाणी, पंचनामा, संमतीपत्राची प्रत व दिनांक ०३-०७-२००२ रोजी स्थळपहाणी व पंचनानामा, संमतीपत्र प्रत व व्हिडीओ कॅसेट -- या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०७-२००५ रोजीच्या अर्जाव्दारे, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००२ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात उल्लेख केलेली माहिती मागितली होती. या मूळ अर्जामध्ये दिनांक ०३-०७-२००२ रोजीच्या कथित व्हिडीओ कॅसेटचा उल्लेख नव्हता. या अर्जावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील विलंबाच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी नामंजूर केले. यानंतर अपिलार्थीने परत उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी याच माहितीकरिता प्रथम अर्ज केला व दिनांक २१-०८-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले व माहिती उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले.

आज रोजी आयोगाकडे अपिलार्थीने दिनांक १०-०८-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भातील अपील विचाराधीन आहे. अपिलार्थीचा दिनांक ०९-०७-२००८ रोजीचा कथित अर्ज पाहता हे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील असल्याचे दिसून येते. हे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबाच्या कारणास्तव फेटाळून लावले आहे, मात्र नंतर

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे त्यांचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे, अथवा माहिती उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २५-०७-२००५ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे सूचित केले होते. आजमितीस अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती (व्हिडीओ कॅसेट व संमतीपत्राव्यतिरिक्त) विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती (अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील व्हिडीओ कॅसेट व समंतीपत्रक या बाबी वगळता उर्वरित सर्व माहिती) विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेले विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या प्रतिनिधीने सदर माहिती अपिलार्थीस देण्याची तयारी दर्शविली आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये, मूळात या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या

अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०९-२००८ रोजी जो निर्णय दिला आहे तो योग्य असल्याचे आयोगाचे मत असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी आता विशेष भुसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसेल त्या माहितीसंदर्भात योग्य तो खुलासा त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल त्यासंदर्भात अपिलार्थीस योग्य ते मार्गदर्शन करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, रा. गायकवाडवाडी, शिवराई रोड, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४८

निर्णय दिनांक १७-१२-२००८

१ श्री. वाघमारे अशोक रामराव, अपिलार्थी
मु. पो. जवळगा, तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, देवणी, तालुका देवणी,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिका-याने त्यांनी मागणी केलेली माहिती न दिल्यामुळे त्यांनी हे अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीमध्ये, पंचायत समिती सेस फंड झालेल्या कामांची संपूर्ण माहिती, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ३० टक्के संपूर्ण तालुक्यातील कामे, अंदाजपत्रके, कामाच्या मस्टरची माहिती, देवणी तालुक्यातील विकास कामांची माहिती, विशेष कल्याण योजना, दलित वस्ती योजनांची संपूर्ण तालुक्यातील माहिती व इस्टीमेट व्हॅल्युयशन मिळण्याबाबत, अशी माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या दोन पत्रांव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. त्यापैकी एका पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस दलित वस्ती सुधार योजने अंतर्गतच्या माहितीसंदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात शुल्क भरणा करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने नेमके किती शुल्क व ते कोठे, कसे भरावयाचे याचा उल्लेख केलेला नाही. तसेच दुस-या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ३० टक्के तालुका स्तरीय पूर्ण तालुक्यांच्या संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनांच्या कामांची माहिती ग्रामपंचायत स्तरावर असल्याने अपिलार्थीस ही माहिती संबंधीत ग्रामपंचायतीच्या ग्रामस्तरावरुन परस्पर घेण्यासाठी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २३-१०-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे याचा विचार करुन

त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी फेरअर्ज करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी हे कोणते जनहित साध्य करणार आहेत, याची विचारणा आयोगाने केली असता, त्यावर अपिलार्थीने कोणतेही उत्तर दिले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०१-०८-२००७ रोजीचे कोणतेही पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही, असे त्यांनी पुढे आपल्या युक्तिवादामध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत जो भाग आहे त्या भागाची माहिती अपिलार्थीस देण्याकरिता अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. या मुद्दयावर आयोगाने जन माहिती अधिकारी यांना त्यांचा अपिलार्थीस दिनांक ०१-०८-२००७ रोजीचे कथित पत्र पाठविल्याबाबतचा पुरावा सादर करण्याची सूचना दिली असता, जन माहिती अधिकारी हे यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगासमोर दाखवू शकले नाहीत. आयोगाने आज सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी दिलेल्या सूचना पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची प्रत घेऊन येण्याची सूचना करुनही जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची नोंदवही आयोगास सादर केली नाही, याची आयोग सखेद नोंद घेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप प्रचंड असून, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती. अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा त्यांचा कधीही तसा उद्देश नव्हता व आजही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती मोघम स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा त्यांना अर्थबोध होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ४८ ग्रामपंचायतीशी व तालुक्यातील पंचायत समितीच्या हजारो कामांच्या संदर्भातील असल्याने या माहितीची व्याप्ती मोठी होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) व कलम ६ (३) प्रमाणे प्रतिसाद देणे आवश्यक होते. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती त्यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नव्हती, त्या माहितीसंदर्भात त्यांनी, ही माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात होती त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता त्यांनी अपिलार्थीस ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकाकडून परस्पर माहिती घेण्यासाठी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अशा प्रकारे चुकीची ठरते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणा-या व अंदाजित शुल्क, माहितीच्या पृष्ठांच्या प्रतींची संख्या, या संपूर्ण हिशोबासह अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०८-२००७ रोजी दिलेल्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क त्यांना न कळविता, त्यांना फक्त माहितीसाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविला आहे. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या मूळ अर्जामधील अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये त्यांनी मुद्दा क्रमांक २ व्दारे "स. ग्रा. रो. यो. ३० टक्के संपूर्ण तालुक्यातील कामाची

माहिती" असा उल्लेख केला आहे. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या उल्लेखावरुन मूळात अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत ते संभ्रमित झाले असावेत असे अनुमान आयोग काढत आहे. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवितांना ती मोघम स्वरुपात न मागविता ती स्पष्ट स्वरुपात मागविणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती हजारो कामांच्या संदर्भात असल्याचे व ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. याचबराबर अपिलार्थी हे, ही माहिती प्राप्त करुन निश्चितपणे कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याबाबत देखील ते आयोगास काहीही सांगू शकले नाहीत. यावरुन अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना पुरेसे गंभीर नसावेत असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात व स्वरुप मोघम असल्याने अधिनियमातील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला सविस्तर निर्णय पुरेसा बोलका असून या निर्णयाशी असहमत होण्याचे आयोगास कोणतेही कारण दिसून येत नाही.

याचबरोबर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपैकी जी विशिष्ट माहिती हवी आहे, अशी विशिष्ट माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या अभिलेख्याची तपासणी करुन प्राप्त करुन घ्यावी. उपरोक्त प्रकरणी हे प्रकरण पुरेशा गांभीर्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी न हाताळून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन या कृतिव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (ग्रामविकास) यांना संबधीत जन माहिती अधिकारी

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चित स्वरुपाच्या माहितीची मागणी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे फेरअर्जाव्दारे करावी.

३. सचिव (ग्रामविकास) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाघमारे अशोक रामराव, मु. पो. जवळगा, तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२९

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. ननवरे पी. एस. अपिलार्थी

व्दारा - गायकवाड एस. एम.

'योगेश निवास' बी. फॉर्मसी कॉलेज जवळ,

बार्शी रोड, उस्स्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक,

गुलशन-ए-अतफाल, उर्दू प्राथमिक शाळा,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष, शम्स एज्युकेशन सोसायटी,

खाजानगर, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांनी दिनांक १०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर आदेश झालेले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०८-२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. कादरी सय्यद जहीरोद्दीन महमंद गुलाम सकलीन यांच्यासंदर्भात एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. या माहितीमध्ये, मुख्याध्यापकाच्या पदोन्नतीच्या आदेशाची सत्यप्रत, या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची जून १९९३ व जुलै १९९३ च्या हजेरीपटाची सत्यप्रत, या कर्मचा-यांच्या जून १९९३ व जुलै १९९३ या दोन महिन्याच्या वेतन देयकाच्या सत्यप्रती व मुख्याध्यापकाच्या सेवापुस्तकाच्या सत्यप्रती, या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिका-यास प्राप्त झाला नसल्याचे त्यांच्याकडील विनादिनांकाच्या पत्राने कळविले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा नवीन अर्ज करण्याचे सूचित केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली निम्मी माहिती त्रयस्थ पक्षाशी व उर्वरित माहिती शाळेच्या प्रशासनाशी संबंधीत होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ४ मधील माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असली तरी ती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ चा कोणत्याही प्रकारे भंग होईल अशातली बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देय ठरत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. आता आयोगाची, अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या सुनावणीची नोटीस प्राप्त झाली असून, अपिलार्थीस ते सदर माहिती ३० दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना माहितीसाठीचा प्रथम अर्ज खरोखरच पाठविला किंवा कसे याबाबत त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती ३० दिवसाच्या आत देण्यास उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे तयारी दर्शविली आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी. अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नसल्याने अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ननवरे पी. एस. व्दारा - गायकवाड एस. एम. 'योगेश निवास' बी. फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्स्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुलशन-ए-अतफाल, उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, शम्स एज्युकेशन सोसायटी, खाजानगर, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३०

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. गायकवाड आनंद सोन्याप्पा, अपिलार्थी
मु. पो. औराद, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जात पडताळणी समिती, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद क्रमांक ३ तथा विभागीय
समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय,
लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, हव्या असलेल्या माहितीच्या संदर्भात - दिनांक २४-११-२००४ पासून ते आजतागायतपर्यंत प्रलंबीत असलेली संचिका, जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत - असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज म्हणजे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये, त्यांना आवश्यक असलेले जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदस्य सचिव विभागीय जात पडताळणी समिती लातूर / औरंगाबाद यांना केलेला अर्ज असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनाविलंब तात्काळ जात पडताळणी प्रमाणपत्र निवडणूक लढविण्यासाठी देण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये एकूण चार मुद्दे उपस्थित करुन या चारही मुद्याव्दारे त्यांनी कोणतीही विशिष्ट अशी माहिती मागवली नाही मात्र यावरुन एकूण अपिलार्थीस सदरचे प्रमाणपत्र त्यांना निवडणूक लढविण्यासाठी हवे असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ - प्रलंबीत असलेली ४० पानी संचिका कार्यालयात प्राप्त आहे किंवा कसे - हा मुद्दा वगळता उर्वरित तीनही मुद्दयाव्दारे त्यांनी त्यांच्या विनंती अर्जाचा विचार होऊन त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र त्वरित मिळण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाला नाही. सदर अपील त्यांनी उपसंचालक विभागीय माहिती

कार्यालय, लातूर यांच्याकडे केले. सदर अपील अर्ज विभागीय माहिती अधिका-याच्या कार्यालयाशी कोणत्याही प्रकारे संबंधीत नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी काय कारवाई केली ते आयोगास संबंधीत कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही, तथापि आज उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस योग्य तो खुलासा केलेला आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जिल्हा परिषद निवडणुकीकरिता जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करुन त्यांचा बी.एड परीक्षेकरिता सादर केलेला अर्ज उपरोक्त प्रकरणात ग्राह्य धरण्याबाबत विनंती केली होती, तथापि जिल्हा परिषद निवडणुकीकरिता शासनाने दिनांक ३१-१२-१९९८ अन्वये विहित केलेल्या अर्जाच्या नमुन्यात जात पडताळणी समितीकडे अपिलार्थीने अर्ज करणे आवश्यक होते. अपिलार्थीने बी. एड करिता सादर केलेला अर्ज निवडणूक प्रकरण म्हणून ग्राह्य धरता येत नाही त्यामुळे अपिलार्थीस राखीव जागेवर निवडणूक लढवावयाची असल्यास त्यांना विहित नमुन्यातील अर्ज समितीकडे सादर करणे आवश्यक असल्याचा खुलासा त्यांनी अपिलार्थीस या दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये केला आहे. आयोगास जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा योग्य वाटतो. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे केलेल्या अर्जावर माहितीची मांडणी व्यवस्थित केलेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे वैयक्तीक काम करुन घ्यावयाचे आहे, म्हणून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा मार्ग अवलंबिला असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही व आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे

योग्य तो खुलासा केला असल्याने व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलावर विचार करण्यासारखे काही उरले नाही असे आढळून येत असल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड आनंद सोन्याप्पा, मु. पो. औराद, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३१

निर्णय दिनांक  १८-१२-२००८

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, — अपिलार्थी
मु. पो. पिंपरखेड, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ कृषि अधिकारी, आष्टी,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे १००० रुपये इतके शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे त्यांनी अपील दाखल केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये १००० इतके त्यांना त्वरित परत करण्याचे, त्यांना विनाशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याचे व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ११/२००६ ते १४-०५-२००७ या कालावधीतील मोराळा व महिंदा या गावातील माती नाला विषयी माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १००० इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेवरुन अपिलार्थीने दिनांक १४-०६-२००७ रोजी शासकीय कोषागारात चलनाव्दारे रुपये १००० इतक्या रकमेचा भरणा केला. आवश्यक ते शुल्क भरल्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००७ रोजी ज्ञापनाच्या स्वरुपातील पत्राव्दारेआपला निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे सूचित केले व त्यांनी माहिती अधिकार तरतुदीनुसार त्यांच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण विचारले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. थोडक्यात, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या या ज्ञापनाव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येते. या

ज्ञापनामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती सशुल्क द्यावयाची किंवा कशी याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीच्या त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठीच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने अधिनियमातील विहित मुदतीत ती अपिलार्थीस देय ठरत आहे, तथापि या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीपोटीचे रुपये १००० इतके शुल्क भरण्याचे सूचित केले असता अपिलार्थीने, दिनांक १४-०६-२००७ रोजी शासकीय कोषागारामध्ये आवश्यक त्या रकमेचा भरणा केला आहे. आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरले नाही, हा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे, कारण, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांनी शासकीय कोषागारात १००० रुपये इतक्या रकमेचा दिनांक १४-०६-२००७ रोजी भरणा केलेल्या चलनाच्या झेरॉक्स प्रती आयोगाकडे सादर केलेल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे सांगितले आहे व ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या शासकीय कोषागाराच्या चलनाच्या झेरॉक्स प्रतीवर ती सत्यप्रत असल्याप्रीत्यर्थ कोणीही साक्षांकीत केल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात निश्चित केला आहे किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी व तदनंतर अपिलार्थीस

विनामूल्य माहिती पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेली कोषागाराच्या चलनाची प्रत चुकीची अथवा बनावट असल्याचे आढळल्यास त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सशुल्क पुरवावी. अपिलार्थीने कोषागारात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्याचे सिध्द झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरचे पूर्ण शुल्क त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत परत करावे कारण अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिल्याचे दिसून येत नाही व परिणामी कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस पूर्ण माहिती विनामूल्य देय ठरते. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे देखिल जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३०-०५-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत असून आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय ठरत आहे.

या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्यासंदर्भात या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही सकारात्मक कारवाई केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या घटनेमधील एकूण वर्तनाव्दारे, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. सबब सचिव (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीने शासकीय कोषागारात दिनांक १४-०६-२००७ रोजी रुपये १००० इतक्या शुल्काचा भरणा केल्याचे सिध्द झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रुपये १००० इतके शुल्क हे आदेश प्राप्त होताच ५ दिवसाच्या आत परत करावे.

४. सचिव (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, मु. पो. पिंपरखेड, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३३

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. श्रीकांत सु. डहाळे, अपिलार्थी
७ - रचनाकार कॉलनी, स्टेशन रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सर्व्हे नंबर १४/०३ (समतानगर) १५

मीटर रुंद रस्त्याबाबत अर्जदार या नात्याने दाखल केलेल्या ६ तक्रार अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली नसल्याने त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००७ रोजी निर्णय दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपील योग्यरित्या चालविले नसल्याचे त्यांनी, या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावरुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००७ रोजी जी माहिती पुरविली आहे त्यामध्ये, त्यांनी केलेल्या सहा अर्जावरील केलेल्या कारवाईचा उल्लेख नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हे नंबर १४/०३ समतानगर येथील १५ मीटर रुंद रस्त्याबाबत दिनांक ३१-०१-२००२ ते १३-११-२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ३१-०१-२००२ ते १३-११-२००६ या कालावधीत केलेल्या एकूण सहा तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली, याची माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती पुरविलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१०-२००७ रोजी आदेश दिले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-१०-२००७ रोजी सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या तोंडी

सुचनेप्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविली, तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या सहा अर्जासंदर्भात त्यांनी कोणती कारवाई केली आहे याचे सविस्तर वर्णन करुन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे, तथापि अपिलार्थी यांना ही माहिती अपेक्षित नाही, असे दिसून येते. अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कारवाईची त्यांना माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थीच्या सहा वेगवेगळ्या अर्जांवर त्यांनी स्वतंत्रपणे कोणतीही कारवाई केली नसल्याचे सांगून, अपिलार्थीच्या सहाही तक्रार अर्जासंदर्भात त्यांना दिनांक १७-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती स्पष्ट करुन उत्तर दिल्याचे नमूद केले आहे. मूळात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर काय कारवाई केली यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या तक्रारीसंदर्भात त्यांनी (जन माहिती अधिकारी यांनी) केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कृती न करता अपिलार्थीच्या प्रश्नास उत्तर द्यावे त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे वस्तुस्थिती स्पष्ट केल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या सहाही तक्रार अर्जांवर स्वतंत्रपणे केलेल्या कारवाई संदर्भातील पत्रव्यवहारांच्या सर्व प्रती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जर अपिलार्थीच्या या तक्रार अर्जावर त्यांनी कोणतीही कारवाई केली नसेल तर त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये तसे कळवावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-१०-२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा विलंबाने देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील

कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले असल्याचे सिध्द होत असल्याने, संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ०७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक नगरपालिका प्रशासन यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीकांत सु. डहाळे, ७ - रचनाकार कॉलनी, स्टेशन रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३४

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ सौ. नुझहत पिता महेबुब खान, अपिलार्थी
रा. विद्यानगर,
परभणी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, परभणी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यानंतरही कागदपत्रे पाठविली नाहीत, त्यामुळे त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन त्यांना अधिनियमाप्रमाणे दंड देण्यात यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे फैजुलउलूम प्राथमिक शाळा, परभणी विषयी जून १९८८ ते जुलै २००७ या कालावधीतील ११ मुद्दयांसंदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही व आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांनी सुनावणी घेतली नसल्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी ज्यांना शिक्षण संचालकांनी त्यांच्या आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ कं(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ व्दारे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे त्यांनी सुनावणी घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. सदर सुनावणीस उपस्थित राहण्यासाठीचे पत्र अपिलार्थीस किमान १० दिवस

अगोदर पोहोचेल, असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे वेगळे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. नुझहत पिता महेबुब खान, रा. विद्यानगर, परभणी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३५

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. लक्ष्मण अर्जुन ठोंबरे, अपिलार्थी
रा. जयभिमनगर, घाटी रोड, टाऊन हॉल,
लाल मस्जीद, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या पहिल्या अपिलाचा निर्णय बेकायदेशीर असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपील केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ६८ च्या दारिद्र्यरेषेखाली असलेल्या व दारिद्र्यरेषेखाली नसलेल्या लाभार्थींच्या दोन वेगवेगळ्या याद्या व त्यांची नावे, कुटूंबातील व्यक्तींची संख्या, त्यांना मिळणारे धान्य, किंमत, वजन ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००७ रोजीचे पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमानुसार शासनखाती फी जमा करुन माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिली व उर्वरित माहितीकरिता शासनखाती फी जमा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीच्या दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीमतः दिनांक ०८-११-२००७ रोजी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास ती अपिलार्थी यांना पुरवावी व उपलब्ध नसल्यास तसे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०८-२००७ व दिनांक ०८-१०-२००७ रोजी प्रतिसाद दिला आहे, असे

दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०८-२००७ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये, अपिलार्थीस, त्यांनी नियमानुसार फी शासनखाती जमा करावी एवढेच सूचित केले आहे व अशाच प्रकारची सूचना त्यांनी त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये केली आहे. या पत्रामध्ये, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांनी अंदाजे एकूण किती रक्कम भरावयाची, संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहितीसाठीचा प्रतिपृष्ठ दर हे शुल्क कसे भरावयाचे याचे मार्गदर्शन त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये केल्याचे कोठेही आढळून येत नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे संभावित शुल्काचा संपूर्ण हिशोब त्यांनी अपिलार्थीस देणे गरजेचे होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न केल्याने, जन माहिती अधिकारी यांची दिनांक २१-०८-२००७ व दिनांक ०८-१०-२००७ ची दोनही पत्रे अवैध ठरत आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस ही माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाल्याने, तसेच जन माहिती अधिकारी यांची वर निर्देशित केलेली दोनही पत्रे वर नमूद केल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी लागेल, असे आयोगास सांगितले. या मुदतीत माहिती घेण्याची अपिलार्थीने तयारी दर्शविली आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलाथीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी, अपिलार्थी यांना या कालावधीमध्ये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित राहून, ही माहिती घेणे भाग आहे. माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांना प्रतिनिधी पाठविणे अनुज्ञेय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक    १८-१२-२००८                              राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण अर्जुन ठोंबरे, रा. जयभिमनगर, घाटी रोड, टाऊन हॉल, लाल मस्जीद, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३७

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. प्रदिप तुकाराम महाडीक, अपिलार्थी
मु. शेरी (बुद्रुक), पोस्ट कडा, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक ती माहिती, त्यांनी माहितीपोटीचे शुल्क रुपये २०० इतके त्यांच्याकडे मनीऑर्डरने

पाठवून देखील त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही, यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती पुरविली असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये २०० इतके त्याना परत करावे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात येऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) २० (२) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००७ ते मे २००७ या कालावधीशी संबंधीत मागणी केलेल्या माहितीमध्ये - आष्टी तालुक्यात दरमहा पडणारे नियतन, तालुक्यात अर्धघाऊक व किरकोळ विक्रेत्यांची संख्या व नाव, त्यांना दरमहा पडलेले नियतन, त्यांच्याकडे असलेले विक्री परवाने, विक्री पुस्तिका, साठा पुस्तिका, भेट पुस्तिका इत्यादी तपशीलवार माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या पत्राने आवश्यक ते शुल्क चलनाव्दारे भरुन माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. याच पत्रामध्ये त्यांनी शुल्क न भरल्यास, माहिती न मिळाल्यास त्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील याची नोंद घेण्याचे

अपिलार्थीस सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हा प्रतिसाद, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिला असून सदचे पत्र अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज व अपील यासंदर्भात अपिलार्थीस लिहिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना रुपये २०० ची मनीऑर्डर केली. सदर मनीऑर्डर अपिलार्थीने कडा येथील पोस्ट ऑफिसमधून केली असून यासंदर्भातील पुरावा म्हणून पोस्ट ऑफिस कडा या कार्यालयाची दिनांक २६-०९-२००७ रोजीची, ०८९४ क्रमांकाची पावती त्यांनी आयोगास दाखविली. त्याचबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मनीऑर्डर प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ टपाल अधीक्षक, बीड यांच्या कार्यालयाचे दिनांक १०-०६-२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००७ रोजी पाठविलेली मनीऑर्डर दिनांक ०१-१०-२००७ रोजी पोच केल्याचे नमूद केले आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला असल्याचे व सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-१०-२००७ रोजी एकूण ४९ पृष्ठांची माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीव्दारे संबंधीत अर्धघाऊक विक्रेत्यांच्या वेगळ्या कालावधीशी संबंधीत नियतनाची माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ माहितीतील अर्धघाऊक किरकोळ विक्रेत्याकडे असलेले विक्री परवाने, विक्री पुस्तिका, साठा पुस्तिका व भेट पुस्तिका याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे व यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी मूळात प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे दिनांक २४-०७-२००७

पूर्वी माहिती देणे अथवा यासंदर्भात आपला निर्णय अपिलार्थीस कळविणे हे क्रमप्राप्त होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई त्यांनी केलेली नाही. अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहितीसाठी पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर व एकूण रक्कम हा तपशील कळविलेला नाही. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कोणत्या शिर्षाखाली भरावयाचे याचे मार्गदर्शन त्यांनी अपिलार्थीस केलेले नाही. अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाव्दारे माहिती मागविली असतांना देखील अपिलार्थीस माहिती या विभागाकडून हस्तगत करावी, अशा अर्थाचे बेजबाबदार उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमातील कलम ७ (१) व (७) (३) (क) चा नि:संशयपणे भंग केल्याचे येथे दिसून येते. अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर देखील अवैध प्रतिसाद दिला असल्याने, अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय ठरते, त्यामुळे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये २०० हे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस परत करावे लागेल. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मार्च २००७ ते मे २००७ या विशिष्ट कालावधीची माहिती मागविली असून, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मागील कालावधीची माहिती दिल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अर्धघाऊक किरकोळ विक्रेत्याकडे असलेले विक्री परवाने, विक्री पुस्तिका, साठा पुस्तिका व भेट पुस्तिकाच्या प्रती त्यांना पुरविल्या नाहीत, एकूण या सर्व प्रकारावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री पटली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच त्यांना, १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांना प्राप्त झालेले शुल्क रुपये २०० इतके त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले रुपये २०० इतके शुल्क हे याच कालावधीमध्ये त्यांना परत करावे.

४. विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदिप तुकाराम महाडीक, मु. शेरी (बुद्रुक), पोस्ट कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३८

निर्णय दिनांक १८-१२-२००८

१ श्री. बाबासाहेब विठ्ठल हावळे, अपिलार्थी
मु. मुर्शदपूर (घाट) पो. पोत्रा, तालुका बीड,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
उपविभाग क्रमांक १, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती जन

माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी अशी दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असता त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०८-२००७ रोजीचे पत्र देऊन अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून यासंदर्भात खुलासा मागविला असल्याचे कळविले व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा प्राप्त होताच त्याप्रमाणे कारवाई केली जाईल असे अपिलार्थीस आश्वासित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही कारवाई झाली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना परत दिनांक २०-०९-२००७ रोजी अपिलाचा निर्णय व माहिती मिळण्याबाबत विनंती अर्ज केला. या अर्जाच्या अनुषंगाने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २५-०९-२००७ रोजी पूर्णपणे बनावट व दिशाभूल करणारे पत्र लिहिले आहे. या सर्व घटनेमध्ये प्रशासकीय अधिका-याने अकारण विलंब लावला, माहिती अधिका-याने योग्य न्याय न दिल्याने चुकीची व अनावश्यक खोटी माहिती पुरवून न्यायतत्वाचा घात केला असल्याने त्यांना योग्य दंड आकारुन कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात्रापोत्रा साठवण तलावाबाबत सन २००४ ते दिनांक ३०-०६-२००७ या कालावधीशी संबंधीत एकूण दोन मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तलावाच्या बुडीत क्षेत्रातील शेतक-यांना जायमोक्यावर हजर राहण्यासाठी देण्यात आलेल्या नोटीशीच्या प्रती, शेतक-याची पोच प्रत गावनिहाय व मुद्दा क्रमांक २ वर याच साठवण तलावाचा संयुक्त मोजणी अहवाल, त्या साठवण तलावाकरिता भुसंपादन करतांना केलेला संयुक्त मोजणी अहवाल, स्थळ पंचनामा व संयुक्त मोजणी अभिलेखात नोंद केलेल्या स्थळपंचनाम्याची शेतक-यांची पोच असलेल्या स्थळ पंचनाम्याची सत्यप्रत गावनिहाय - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलबध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या स्थळप्रतीवर सही केली आहे. या प्रतीचे अवलोकन केले असता सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात श्री. बी. एस. वैद्य या व्यक्तीने दिनांक २६-०७-२००७ रोजी टंकलिखित केले असून पत्र पाठवितांना त्याची ०९-०७-२००७ अशी तारीख जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने टाकली आहे. यावरुन असे सिध्द होते की, मागील तारीख टाकून अपिलार्थीस जी माहिती देण्यात आली ती दिनांक २६-०७-२००७ रोजी तयार ठेवली होती व ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरुन संयुक्त मोजणी अहवाल करतेवेळी त्यांच्या कार्यालयातर्फे नोटीस देण्यात आलेल्या नाहीत असे अपिलार्थीस कळविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे मागितलेली उर्वरित माहिती, स्थळ पंचनामा व स्थळ पंचनाम्याची शेतक-यांची पोच असलेली सत्यप्रत ही माहिती जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात उपलब्ध असते.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेल्या माहितीचा काही भाग जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अथवा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५

दिवसांच्या आत या अर्जाची प्रत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अथवा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे देणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस मागील तारीख टाकून दिनांक ०९-०७-२००७ रोजी माहिती दिल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. मूळात अपिलार्थीच्या अर्जाची प्रत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे ५ दिवसात न पाठविण्याची चूक जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाली असल्याने व अपिलार्थीस कालापव्यय न करता माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी तालुका निरीक्षक / जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना असे आदेशित करण्यात येते की, या कामी त्यांनी जलसंपदा विभागाच्या संबंधीत उप अभियंत्यास अपिलार्थीस त्वरित माहिती देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.

उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे बनावट पत्र तयार केल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी दर्शविलेल्या अशा प्रकारच्या त्याच्या कार्यशैलीमध्ये नितांत सचोटीचा अभाव असल्याचे सिध्द होत असल्याने सचिव (जलसंपदा) यांना त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी यासंदर्भात कोणताही लेखी पुरावा आयोगाकडे सादर केला नाही हे पाहता, त्यांच्या या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबासाहेब विठ्ठल हावळे, मु. मुर्शदपूर (घाट) पो. पोत्रा, तालुका बीड, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, उपविभाग क्रमांक १, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, (तहसील कार्यालय) बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ अधीक्षक भूमी अभिलेख, श्रीरामनगर जवळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३९

निर्णय दिनांक १९-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. लगडे पांडुरंग ज्ञानेश्वर,<br>मु. आनंदपूर, पो. वडवाळी, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आनंदपूर,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाची काहीच दखल घेतली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली

आहे. अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८० ते २८-०९-२००७ या दिनांकापर्यंतच्या कालावधीमधील ग्रामपंचायत आनंदपूर हद्दीत ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १८६ बाबत माहिती मागितली होती, असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदर मिळकत पूर्वी ग्रामपंचायतच्या मालकीची होती व त्यानंतर या मिळकतीच्या मालकी हक्कामध्ये झालेल्या फेरच्या प्रती, छगन सोमाजी राजगुरु, राजेंद्र छगन राजगुरु यांचे नांवे ग्रामपंचायत हद्दीत किती जागा आहे, तसेच त्यांनी काही जागेवर अतिक्रमण केलेले आहे काय ? केले असल्यास त्याबाबत ग्रामपंचायतने त्यावर केलेली कारवाई - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज जरी ग्रामसेवक यांना उद्देशून केला होता तरी सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना पंचायत समिती, पैठण मार्फत दिनांक ०५-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सरळ न देता त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्याकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी व दिनांक २६-१०-२००७ रोजी सादर केली व पंचायत समितीकडून अपिलार्थीस त्याच दिवशी माहिती प्राप्त झाली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे व त्यांना या अपील अर्जासंदर्भात निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व्यक्तिशः दिली असल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा प्रथम अर्ज जरी ग्रामसेवक यांना उद्देशून केला असला तरी तो अर्ज ग्रामसेवकास पंचायत समितीकडून ७ दिवस इतक्या विलंबाने प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सरळ माहिती देण्याऐवजी त्यांनी ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांना प्रथमतः दिनांक २३-१०-२००७ रोजी दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतरही काही माहिती एक महिना विलंबाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण यांनी अपिलार्थीस दिनांक २३-१०-२००७ व दिनांक २७-११-२००७ रोजी रोजी पुरविली म्हणजेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण यांनी विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील "तसेच त्यांनी काही जागेवर अतिक्रमण केलेले आहे काय ? " ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील कलम २ (च) च्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८० ते २००७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागविली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त १९९४-९५ या सालाचीच माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त एवढीच माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. यावरुन ग्रामपंचायतने त्यांच्या हद्दीतील मिळकतीचे अभिलेख व्यवस्थितपणे जतन न करुन ठेवल्याचे दिसून येते. तसेच वेळोवेळी झालेल्या ग्रामसेवकाच्या बदल्या, त्या होत असतांना संबंधीत ग्रामसेवकांनी आपल्या कार्यभाराचे हस्तांतर त्यांच्यानंतर येणा-या ग्रामसेवकास केले नसल्याचे दिसून येते. गट विकास अधिकारी व जिल्हा परिषदेचे इतर अधिकारी यांनी ग्रामपंचायतीच्या अभिलेख्याचे निरीक्षण करणे हा त्यांच्या नियमित कर्तव्याचा एक भाग आहे, तथापि जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतच्या कार्यालयाची नियमीतपणे तपासणी करण्याचा प्रघात

औरंगाबाद जिल्हा परिषदेत बहुधा नसावा, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. आज सुनावणीस हजर राहिलेल्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी, त्यांनी ज्या पध्दतीने त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडले त्यावरुन त्यांची अकार्यक्षमताच आयोगास जास्त प्रमाणात लक्षात येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जास दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट तिकिट न लावता तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जावर ग्रामसेवकाने गट विकास अधिकारी यांच्याकडे मार्गदर्शन मागितले असता गट विकास अधिका-याने त्यांना मार्गदर्शन केल्याचे आढळून येत नाही. याच प्रकरणा-प्रमाणे बरीच प्रकरणे गेल्या दोन वर्षामध्ये राज्य माहिती आयोगाकडे आली असता एखादा अपवाद वगळता कोणत्याही ग्रामसेवकाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे व्यवस्थितपणे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्याचबरोबर ग्रामसेवकाचे नियंत्रण अधिकारी या नात्याने गट विकास अधिकारी यांनी देखील त्यांचे कर्तव्य पूर्ण केल्याचे अभावानेच आढळून येत आहे. बदलत्या परिस्थितीत अशा प्रकारे माहिती मागविण्याची अर्जदारांची वाढती संख्या लक्षता घेता व हा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींची, वर्षातून किमान एकदा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, काही प्रमाणात उप मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा तत्सम इतर अधिका-यांच्या पातळीवर वार्षिक तपासणी करुन घेण्यासंदर्भात व माहितीच्या व्यवस्थापनासंदर्भात त्यांनी आवश्यक ते परिपत्रक निर्गमीत करावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दिलेल्या माहिती व्यतिरिक्त उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस प्राप्त होईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी पहावे असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या मुदतीत विनामूल्य माहिती देतील असे पहावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लगडे पांडुरंग ज्ञानेश्वर, मु. आनंदपूर, पो. वडवाळी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आनंदपूर, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४०

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. हरिदास सखाराम बोरुडे, अपिलार्थी
अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, रिसोड,
तालुका रिसोड, जिल्हा वाशिम

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा महासंचालक, वाल्मी, तालुका औरंगाबाद,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व
भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४,
कांचनवाडी, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी त्यांच्या प्रतिनिधीसह उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व खोटी माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्याकडील विना दिनांकाच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "वाल्मी" या संस्थेमधील सहाय्यक प्राध्यापकांच्या निवडीबाबतची कागदपत्रे, पदांसाठी आलेल्या उमेदवारांनी जाहिरातीप्रमाणे पात्रता धारण केली आहे किंवा कसे व निवडीबाबत माहिती मिळण्याबाबत अर्ज केला होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती खाजगी बाब असल्याचे कारण दर्शवून त्या अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्राने या अपिलावरील आपला निर्णय अपिलार्थीस कळविला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाले काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, "वाल्मी" या संस्थेने निवड केलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना शासनाच्या तिजोरीतून दरमहा वेतन दिले जाते. "वाल्मी" ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण आहे त्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संबंधीत उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती ही बाब सार्वजनिक माहिती ठरते व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती देण्याचे त्यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी प्रथमतः नाकारले आहे, तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये एका उमेदवाराने पी. एच. डी. ही अर्हता धारण केली असल्याचे नमूद केले आहे, तथापि पी. एच. डी. या सनदेची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न दिल्याने त्यांच्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, "वाल्मी" या संस्थेमध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदी नियुक्त केलेल्या उमेदवारांची निवड ही चुकीच्या पध्दतीने झाली असल्याने त्यांची चौकशी होणे गरजेचे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांना दिनांक २०-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात दिनांक २२-०२-२००७ रोजी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये एक उमेदवार पी. एच. डी. असल्याचे त्यांनी अनावधानाने नमूद केले आहे. अपिलार्थीस सदर उमेदवार पी. एच. डी. नसतांना तो पी. एच. डी. असल्याचे कळविण्याची चूक त्यांच्याकडून अनावधानाने झालेली आहे. हा मुद्दा सोडल्यास त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे. शैक्षणिक पात्रतेच्या

प्रती ही संबंधीत उमेदवारांची खाजगी बाब असल्याने यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज केला त्यावेळी त्यांच्याकडे एकूण १५ अपिले प्रलंबीत होती. सदर अपील निर्णय देण्याची मुदत संपत आल्याने त्यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर निर्णय दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जावर तारखेचा कोणताही उल्लेख केला नाही. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे ३५ रुपये इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०२-२००७ रोजी भरल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिली हा मुद्दा सिध्द होऊ शकत नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व खोटी माहिती दिल्याचे म्हटले आहे. यातील "अपूर्ण" या अभिप्रायाचा विचार केला असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहिती देतांना जरी उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती पुरविल्या नसल्या तरी ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी एखादा विशिष्ट हेतू मनात ठेऊन अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरुन काही अर्थ काढला व ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस ते उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती

का देऊ शकत नाहीत याचे कारण त्यांनी दिले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूतः अपूर्ण माहिती दिली, हे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये एक उमेदवार पी. एच. डी. असल्याचे म्हटले आहे, तथापि वास्तवात सदर उमेवार यावेळी पी. एच. डी. करीत होते त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना तसे नमूद करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना एक उमेदवार पी. एच. डी. असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये त्यांची ही चूक आयोगासमोर कबूल केली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाच्या संबंधात उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रतीबाबत असे नमूद करण्यात येते की, एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्याकडे पद भरती करतांना विशिष्ट अर्हता प्राप्त उमेदवाराकडून माहिती मागविली असता व ही माहिती संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे प्राप्त झाली असता, ही माहिती संबंधीत उमेदवारांची खाजगी बाब राहू शकत नाही. विशेषतः उमेदवार निवडीसारख्या प्रक्रियेमध्ये निश्चितपणे पारदर्शकता असली पाहिजे, असे आयोगाचे मत आहे. मूलतः माहिती अधिकार अधिनियमाचा हेतू सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पारदर्शकता असणे असा आहे हे पाहता, "वाल्मी" या संस्थेकडे सहाय्यक प्राध्यापक या पदाच्यासाठी प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती ही त्यांची खाजगी बाब राहू शकत नाही याला पूरक म्हणून असेही नमूद करण्यात येते की, प्रत्येक अर्हताप्राप्त उमेदवार ज्यावेळी एखादी विशिष्ट शैक्षणिक पात्रता धारण करतो त्यावेळी त्यानी ही शैक्षणिक पात्रता धारण केल्याचे विद्यापीठाच्या किंवा इतर प्राधिकरणाच्या परीक्षेच्या निकालाव्दारे सर्वत्र जाहीर केले जाते या अर्हतेवर निवड झाल्यास संबंधितांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून नियमित वेतन दिले जाते ज्याचा मूळ स्त्रोत जनसामान्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे अथवा शासनाकडे भरलेला "कर" असू शकतो, याचबरोबर प्राप्त अर्हतेच्या अधिकारावर अर्जदार वेगवेगळ्या प्राधिकरणाकडे नोकरीसाठी पुढील शिक्षणासाठी अर्ज करताना, मतदार यादीत नोंदणी करताना व इतर अनेक अन्य प्रकरणात त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रती

सादर करीत असतात. एवढ्या विविध स्तरावर इतक्या मोकळेपणाने ही माहिती उपलब्ध असण्याची शक्यता लक्षात घेता शैक्षणिक अर्हतेच्या प्रती ही बाब उमेदवाराची खाजगी बाब असू शकत नाही हे सिध्द होत आहे, या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जातील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या सत्यप्रती अपिलार्थीस आता द्याव्या लागतील हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील जो भाग त्यांनी अपिलार्थीस पूर्वी पुरविला नाही त्या भागाची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने निवड केलेल्या उमेदवारांच्या भरतीबाबत आक्षेप घेतला असून, निवड केलेले उमेदवार बी. टेक प्रथम श्रेणी ऐवजी व्दितीय श्रेणी उत्तीर्ण असल्याचे नमूद केले आहे व प्रकरणाची चौकशी करण्याची आयोगास विनंती केली आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, अधिनियमातील तरतुदी व माहिती आयोगाच्या कक्षा विचारात घेता, अशा प्रकारांची आयोगातर्फे चौकशी करणे, या माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, तथापि अपिलार्थीच्या भावना लक्षात घेता सचिव (जलसंपदा) यांनी "वाल्मी" संस्थेच्या विचाराधीन प्रकरणी निवड केलेल्या उमेदवारांच्या निवडीच्या निर्णयाबाबत आपल्या स्तरावर, आवश्यकता वाटल्यास, योग्य ती कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ०२-०३-२००७ च्या पत्राव्दारे एका उमेदवाराच्या पी. एच. डी. या सनदेबाबत चूक झाल्याचे कबूल केल्यानंतर, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांच्यावर रुपये २५००० इतकी शास्ती लावण्याची अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिली हे या प्रकरणी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस चुकीची माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब, सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांच्या यादीतील शैक्षणिक अर्हतेच्या साक्षांकीत प्रती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हरिदास सखाराम बोरुडे, अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, रिसोड, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र.

५०४, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४१

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. पवन सावळाराम मुर्शदपुरे, अपिलार्थी
प्लॉट नं. ४० गल्ली नं. ३, प्रकाशनगर (पश्चिम),
मुकूंदवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (प) विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिली नाही, जन माहिती अधिकारी यांनी

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश मानले नाहीत व माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "मा. उपविभागीय अभियंता सा. बा. / (प.) उपविभाग कन्नड तथा मा. श्री. बी. जी. पवार यांना जा. क्र. /तांशा/माहिती/फा.१५८/५२२८ दि. २७-७-२००५ च्या मा. कार्यकारी अभियंता याच्या पत्राने दि. ०१-०६-२००५ ते २२-०६-२००५ या कालावधीची ५,७५० रुपये दंडाची शिक्षा लागू झाली. ती रक्कम वसुल केल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत" या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली असल्याने अपिलार्थीचा दिनांक ०९-०७-२००७ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २७-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनी युक्तिवाद केला. सदर युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, श्री. बी. जी. पवार यांना कार्यकारी अभियंता यांनी ५,७५० रुपये इतका दंड दिनांक

२७-०७-२००५ रोजीच्या आदेशाव्दारे लावला होता, तथापि कार्यकारी अभियंता यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करुन नंतर अपिलार्थीस दंडाची रक्कम न आकारण्याचे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. कार्यकारी अभियंता यांनी श्री. बी. जी. पवार यांना त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल दंड लावला होता. वस्तुतः कार्यकारी अभियंता यांना जन माहिती अधिका-यास शास्ती लावण्याचे कोणतेही अधिकार नसल्याने मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील दिनांक २७-०७-२००५ रोजीच्या संदर्भातील आदेश अवैध होते, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी तो आदेश नंतर रद्द केला. वस्तुतः अपिलार्थीचा दिनांक ०९-०७-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस यासंदर्भात माहिती देणे आवश्यक होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक २७-०८-२००७ रोजी झालेल्या सुनावणीनंतर दिली आहे, जी माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अपेक्षित होते ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजी दिली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रथम प्रतिसाद पूर्णतः चुकीचा असून, ही माहिती पुरवितांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीट अवलोकन देखील केले नसावे, असे या पत्रातील मजकूर पाहता दिसून येते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्यासंदर्भात असे दिसून येते की, कार्यकारी अभियंता हे श्री. बी. जी. पवार यांना शास्ती लावण्यासाठी सक्षम नव्हते, त्यामुळे त्यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करुन श्री. बी. जी. पवार यांना शास्ती लावलेला निर्णय रद्द केला त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही वस्तुस्थिती नमूद करण जरुरीचे होते तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे ही वस्तुस्थिती नमूद न करता अपिलार्थीस दुस-या

अर्जासंदर्भात कळविले. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यशैलीत कर्तव्यपरायणतेचा अभाव असल्याचे स्पष्ट होते. सबब अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पवन सावळाराम मुर्शदपुरे, प्लॉट नं. ४० गल्ली नं. ३, प्रकाशनगर (पश्चिम), पो. मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) विभाग,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २१४२/०७ व २१४३/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४२ व २१४३

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. कमलकिशोर काळूराम बजाज, अपिलार्थी
'स्मृती' शिल्पनगर, आर. टी. ओ. रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक २१४२/२००७ प्रतिवादी
जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभाव
आश्रम, पैठण रोड, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सचिव, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभाव ट्रस्ट,
पैठण रोड, औरंगाबाद

३ अपील क्रमांक २१४३/२००७
जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक,
नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार एकाच माहितीकरिता दोन सार्वजनिक प्राधिकरणाविरुध्द दिनांक २८-११-२००७ रोजी दाखल केलेली दोन स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. सदर दोन्ही अपिले अपिलार्थीने त्यांच्या ज्या मूळ अर्जासंदर्भात केली आहेत त्या दोन्ही अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती एकसारखीच असल्याने या दोन्ही अपील अर्जांची सुनावणी आज रोजी एकत्रित घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर महानुभाव आश्रम व औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ३१-०८-२००७ व १४-०८-२००७ रोजी श्रीकृष्ण विद्यामंदिर या शाळेच्या बांधकामासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आश्रमातर्फे बांधलेल्या शाळेसंदर्भात मनपाची बांधकाम परवानगी, शाळेच्या जागेचे पी. आर. कार्ड, जागेच्या मालकीचे खरेदीखत / दानपत्र व ७/१२ चा उतारा - या मुद्दयांचा समावेश आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी महानगरपालिकेकडे केलेल्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून बांधकाम परवाना क्रमांक, संचिका क्रमांक, दिनांक व परवानाधारकाचे नाव इत्यादी तपशील त्यांना पुरविण्याचे सूचित केले, तर संबंधीत शाळेने त्यांच्या दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन त्या "संस्थेच्या जागेबाबत बांधकाम परवानगी बाबत वगैरे कागदपत्रे सांभाळण्याची जबाबदारी ही संस्थेची आहे शाळेची नाही" असे उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी व संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे दिनांक १५-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी, महानगरपालिका यांनी दिनांक २६-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १७-१०-२००७ रोजी पारित केले व शाळेच्या सचिवांनी प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता आपले आदेश दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या पत्राने पारित केले. औरंगाबाद महानगरपालिकेमधील जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०५-०२-१९९४ पूर्वीचे तीन वर्षाचे बांधकाम परवाना रजिस्टर तपासून बांधकाम परवानगी दिली आहे किंवा कसे याबाबत अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले आहे, त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस संबंधीत बांधकामाची परवानगी दिली नसल्याचे कळविले व सचिव, श्रीकृष्ण विद्यामंदिर महानुभव ट्रस्ट यांनी दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीवर त्यांना जाणून बुजून त्रास देण्याचे आरोप केले व अपिलार्थीविरुध्द दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचे संकेत दिले. या दोनही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दोन स्वतंत्र अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली.

अपिलार्थीच्या मूळ अर्जांचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आश्रमातर्फे बांधलेल्या शाळेमध्ये मनपाची बांधकाम परवानगी, शाळेच्या जागेचे पी. आर. कार्ड, जागेच्या मालकीचे खरेदीखत / दानपत्र व ७/१२ चा उतारा या माहितीची मागणी केल्याचे दिसते. अपिलार्थीने या दोन्ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती एकाही जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध असणे शक्य नव्हते. मनपाकडे बांधकाम परवानगी संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध असणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत आहे तर संबंधीत शाळेकडे जागेचे खरेदीखत / दानपत्र असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पी. आर. कार्ड व ७/१२ उतारा ही माहिती भूमी अभिलेख कार्यालयाकडून / संबधीत तलाठी यांच्याकडून अपिलार्थीस मिळू शकेल. या प्रकरणी अपिलार्थीने ऑगस्ट २००७ मध्ये या दोन्ही प्राधिकरणाकडे मूळ माहितीसाठी अर्ज केलेला आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती

त्यांना त्वरित उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी महानगरपालिका यांनी अपिलार्थीस ७/१२ चा उतारा व पी. आर. कार्ड ही माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. संबधीत शाळेच्या सचिवांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, त्यांच्या शाळेचे खरेदीखत ज्या आश्रम प्रमुखाच्या ताब्यात होते त्यांचे २००५ साली निधन झाले व यासंदर्भातील कागदपत्रे त्यांच्याच ताब्यात होती, तथापि आता ३० दिवसांच्या आत त्यांच्या शाळेकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे तपासून ते अपिलार्थीस दानपत्र / खरेदीखत विनामूल्य देण्यास तयार आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी, महानगरपालिका व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. वरील दोनही प्राधिकरणांनी, विचारलेल्या माहितीतील जी माहिती दुस-या प्राधिकरणाशी संबंधीत होती त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठविल्याचे दिसून येत नाही, परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घकाळ वंचित राहिल्याचे दिसून येते. दोनही जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य अधिनियमातील तरतुदीप्रमाणे व्यवस्थित पार न पाडल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आजपर्यंत प्राप्त होऊ शकली नाही, हे अशा प्रकारे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ७/१२ उतारा व पी. आर. कार्ड ही माहिती जर मनपाकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी ही माहिती संबंधीत तलाठी व तालुका / जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याशी संपर्क साधून ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे योग्य होइल, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील क्रमांक २१४२/०७ व २१४३/०७ ही मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर व जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगररचना, महानगरपालिका यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली त्यांचेशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कमलकिशोर काळूराम बजाज, 'स्मृती' शिल्पनगर, आर. टी. ओ. रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभाव आश्रम, पैठण रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभाव ट्रस्ट, पैठण रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४५

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. उत्तमराव माधवराव दौड, अपिलार्थी
श्रीकृष्णनगर (हनुमान मंदिराजवळ), सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभाग (ग्रामीण) कन्नड जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या पत्राची सत्य झेरॉक्स प्रत

आयोगास सादर केली असून या पत्रात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाडे त्यांचे अपील सुनावणीसाठी घेण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आता राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेण्याची आयोगास विनंती केली असल्याने व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिल्याने व यासंदर्भातील योग्य तो पुरावा (जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांच्या सहीचे इतिवृत्त) जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केला असल्याने अपिलार्थीचे आज रोजी विचाराधीन असलेले व दिनांक १७-११-२००७ रोजी नोंदविलेले, व्दितीय अपील क्रमांक २१४५/२००७ खारीज करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. दिनांक १७-११-२००७ रोजी नोंदविलेले, व्दितीय अपील क्रमांक २१४५/२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उत्तमराव माधवराव दौड, श्रीकृष्णनगर (हनुमान मंदिराजवळ), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

मर्यादित, उपविभाग सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग (ग्रामीण) कन्नड जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४६

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. किशोर गणपतराव चव्हाण, अपिलार्थी
किशोर मंगल केंद्र, जाधव मंडी, जबरे हनुमान
मंदिराशेजारी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून यामध्ये जन माहिती, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शहाजी राजे भोसले स्मारक बांधकामाविषयी एकूण पाच मुद्दयांव्दारे स्पीड पोस्टाने माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दिनांक २९-०९-२००७ रोजी पारित केला. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे व त्याचा अनुपालन अहवाल त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार जन माहिती अधिका-याने दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वेरुळ येथील शहाजी राजे भोसले स्मारक समितीचे ते सदस्य असून जन माहिती अधिकारी यांना मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी या स्मारकाच्या कामाची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस बरोबर घेऊन जाण्याचे सूचित केले होते, तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधीत अधिका-यांनी त्यांना, या स्मारकाच्या कामाच्या पाहणीसाठी कधीही बरोबर नेले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी या स्मारकाच्या संरक्षित भिंतीचे काम टप्पा दोनमध्ये हाती घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांना कळविले, तथापि आज रोजी प्रत्यक्ष स्थळी जन माहिती अधिकारी यांनी संरक्षित भिंतीचे काम केलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. मुख्य अभियंता यांनी सूचना

दिल्याप्रमाणे येथून पुढे कामाची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्याबरोबर घेऊन जाण्यास ते तयार आहेत. स्मारकाच्या संरक्षित भिंतीविषयी त्यांनी आयोगास असे अवगत केले की, स्मारकाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत वेळोवेळी झालेल्या बदलामुळे वाढ झाली व अद्यापपावेतो त्यांनी या प्रकल्पाकरिता उपलब्ध झालेला निधी व प्रशासकीय मान्यतेची मर्यादा लक्षात घेऊन संरक्षित भिंतीचे काम हाती घेतले नाही. संरक्षित भिंतीचे काम या प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक तीनमध्ये करण्यात येणार असून या कामाच्या रुपये २.२५ कोटी इतक्या रकमेस शासनाकडून त्यांना नुकतीच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यावेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचविण्यात आले की, त्यांनी अपिलार्थीस टप्पा दोनच्या कामाच्या सर्वसाधारण गोषवा-याची प्रत द्यावी, ज्यामध्ये अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या टप्पा दोनमधील कामाची व्याप्ती व त्याची किंमत ही माहिती बाबनिहाय मिळू शकते. अपिलार्थीने ही बाब आजच्या सुनावणीमध्ये मान्य केली आहे. आता अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे ज्या पाच मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्यापैकी मुद्दा क्रमांक २, ४ व ५ ची माहिती, मूळात ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या "माहिती" या शब्दाच्या संज्ञेच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने या मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णय व कृतीबाबत कारणे, स्पष्टीकरण व खुलासा अशा प्रकारची माहिती विचारल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल कारणे अथवा स्पष्टीकरण मागणे हे मूळात अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीसाठीचा अर्ज केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अर्जदारास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढ्यापुरती ही प्रक्रिया सीमीत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत माहिती दिल्याचे दिसून येते.

वरील परिच्छेदाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी बहुंतांश माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा व स्पष्टीकरण अशा स्वरुपात अपिलार्थीने अपेक्षिली आहे जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस धरुन नाही. उर्वरित दोन मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास दिनांक ३०-०८-२००७ रोजीचा दिलेला प्रतिसाद हा चुकीचा आहे. त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती न देता वेगळ्याच विषयावर अपिलार्थीस माहिती दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या आदेशावर त्यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्रामध्ये काहीशी बरोबर माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्यावर असलेला आक्षेप त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केला असून त्यांचे मुख्य म्हणणे असे आहे की, ते शहाजी राजे भोसले स्मारक समितीचे सदस्य असूनही जन माहिती अधिकारी हे त्यांना कामाच्या पाहणीकरिता, मुख्य अभियंता यांनी सूचना देऊनही, बरोबर घेऊन गेले नाहीत. यासंदर्भात अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या गा-हाण्याचा निपटारा करुन घ्यावा. सुनावणीमध्ये ठरलेल्या या प्रस्तावास अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १९-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर गणपतराव चव्हाण, किशोर मंगल केंद्र, जाधव मंडी, जबरे हनुमान मंदिराशेजारी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४७

निर्णय दिनांक १९-१२-२००८

१ श्री. किशोर गणपतराव चव्हाण, अपिलार्थी
किशोर मंगल केंद्र, जाधव मंडी, जबरे हनुमान
मंदिराशेजारी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक आयुक्त-१, महानगरपालिका,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उप आयुक्त महसूल, महानगरपालिका,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय झाल्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये, महानगरपालिकाने दिनांक २० नोव्हेंबर २००४ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीतील नोकर भरतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ५७ पदांपैकी किती स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य दिले आहे त्यांची पूर्ण नांवे, पत्ते व पदनाम, ५७ जागांपैकी किती स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांनी परीक्षा दिल्या व किती स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य पास झाले त्यांची संख्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना नोकरीमध्ये प्राधान्य दिले नसल्यास त्याची कारणे व भविष्यामध्ये कार्यालयीन जागा उपलब्ध असल्यास स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य देणार आहात का - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस महानगनरपालिकेने भरती केलेल्या ५७ पदांमध्ये स्वातंत्र्य सैनिकांकरिता जागा भरल्या नाहीत असे उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १३-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नियमानुसार देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसंदर्भात काहीही न कळविल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना, जन माहिती अधिका-यास जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांनी अपिलार्थीस आजतागायत माहिती पुरविली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून

दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे. शासनाचे स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य देण्याचे आदेश असतांनाही महानगरपालिकेने याप्रमाणे कारवाई केली नाही व अपिलार्थीस यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी काहीही न कळविल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती न पुरविण्याची कारणे ते आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. त्याचे कारण त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची प्रथम मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी दिलेला प्रथम प्रतिसाद चुकीचा आहे, कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये "या एकूण पदापैकी किती स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य दिले आहे, त्यांची पूर्ण नांवे व पत्ते" अशी माहिती विचारली होती. मनपाने कथित नोकरभरती करतांना स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना कोणतेही प्राधान्य दिले नव्हते, असे जन माहिती अधिका-याने आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य दिले गेले नसल्याचे अपिलार्थीस कळविणे, हे अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांना माहिती देतांना सुसंगत ठरले असते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी "स्वातंत्र्य सैनिकांकरिता जागा भरण्यात आल्या नाहीत" असे अपिलार्थीस कळविले. औरंगाबाद महानगरपालिकेने, झालेल्या कथित भरतीमध्ये मूळात स्वातंत्र्य सैनिक असा वेगळा आरक्षित प्रवर्ग ठेवला नव्हता. त्यामुळे अपिलार्थीस आता जरी ही माहिती पाहणे आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित रहावे व जन माहिती अधिकारी यांनी या नोकरभरती प्रकरणी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे अपिलार्थीस

तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत, जेणेकरुन अपिलार्थीच्या मनातील शंकांचे निरसन होऊ शकेल असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही ती माहिती त्यांनी आता अपिलार्थीस २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे स्वातंत्रसैनिकांच्या पाल्यांना नौकरीमध्ये प्राधान्य दिले नसल्यास त्याची सविस्तर कारणे व जन माहिती अधिकारी यांचे भविष्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य देण्याचे धोरण याविषयी माहिती विचारली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही भविष्यातील असल्यामुळे व या माहितीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली कारणे ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती माहिती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असे ग्राह्य धरले तरी या प्रकरणी त्यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा ४ दिवसांचा विलंब लागल्याचे दिसून येत आहे. सदर कर्मचारी हे आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची अथवा शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची कारवाई आता आयोगास करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील सन २००४ मध्ये झालेल्या नोकरभरती संदर्भातील सर्व अभिलेखे हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत

विनामूल्य पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत व अपिलार्थीस जी माहिती आवश्यक वाटेल ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर गणपतराव चव्हाण, किशोर मंगल केंद्र, जाधव मंडी, जबरे हनुमान मंदिराशेजारी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त महसूल, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५८
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. शेख हफीज शेख उस्मान : अपिलार्थी
रा औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळ्ब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार दि. १८.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे औरंगाबाद जिल्हयातील जून, १९९६ ते जुलै २००७ या कालावधीमध्ये निर्गमित झालेल्या रॉकेल परवान्यासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -परवाना धारकाचे नाव,पत्ता, परवान्यासाठीचा अर्ज प्राप्त झाल्याची तारीख, परवाना दिल्याची तारीख, संबंधित परवाना धारक हा शारीरिक दृष्टीने विकलांग आहे किंवा कसे, परवाना धारकाची वर्गवारी व या विषयासंदर्भातील इतर काही माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हयातील तहसील कार्यालयाकडून संकलीत करण्याचे काम चालू असल्याचे कळविले.तथापि मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसांच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. ५.९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.९.२००७,११.१०.२००७,व १५.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी सतत गैरहजर असल्याने त्यांनी दि. १५.१०.२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी निर्णय दिला. त्यांनी या निर्णयामध्ये अपिलार्थीचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही कालावधीची अट (माहिती पुरविण्याचा निश्चित कालावधी) जन माहिती अधिकारी यांना घातल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि.

१८.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितांकडून उपलब्ध करुन त्यांना देण्याचे आश्वासित केले व त्यानंतर दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये, औरंगाबाद जिल्हयात कोणाच्याही नावाने नव्याने केरोसीन परवाना निर्गमित केला नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये त्यांनी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नसल्याचा निष्कर्ष काढला आहे, असा निष्कर्ष कोणत्या आधारे काढला असे विचारले असता, त्यांनी असे सांगितले की, सदर निर्णय त्यांनी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन घेतला. त्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी त्यांच्याकडे उपस्थित नव्हता.

वरील संपूर्ण घटनाक्रम पाहता, मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक अशी आहे, ही माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.९.२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर, दि. ११.९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिला आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे श्रम लागणार असल्याची अशी कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. मूळात शासनाने १९९० सालापासून रॉकेल परवाने देण्याचे बंद केल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले असल्याने व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देखिल ते स्वत: जबाबदार अधिकारी असल्याने ही माहिती त्यावेळी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल जन

माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमांच्या तरतुदीअन्वये त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख हफीज शेख उस्मान, रा. घर नं.३-१-२९, बारुदगरनाला, औरंगाबाद-४३१००१

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६७
निर्णय दिनांक २०-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजाराम श्रीधर भोंडे,<br>रा.पैठण जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,नगरपरिषद,<br>पैठण जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये, त्यांना उशिरा माहिती दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी दंडात्मक कार्यवाही केली नाही, तसेच त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या श्री. शिंदे यांनी दि. ४.८.२००७ पर्यंत कोणतीही रक्कम न देता त्यांना खोटी माहिती दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलामध्ये दिलेला निर्णय

बेकायदेशीर असल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद यांनी माहिती उशिरा दिली आहे, असे आपल्या आदेशात नमूद करुनही त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही व ही दंडात्मक कार्यवाही केली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपील केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ४.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार श्री. सुरेश (सूर्यभान) बाबूराव शिंदे पैठण यांच्या माहितीसाठीच्या अर्जातील माहिती मिळण्यासाठी आकारलेल्या शुल्काची काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये अपिलार्थीने, - २१ पानांची माहिती देऊन रु.१०००/- इतक्या शुल्काची आकारणी कशी केली व कोणत्या नियमाच्या आधारे केली - याचा तपशील विचारला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.६.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते.सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती केली आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.८.२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील त्यांना माहिती मिळाल्याने निकाली काढले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यावर शास्ती न लावल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ४.८.२००७ रोजी पूर्ण माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत करुन दिले. अपिलार्थीस माहिती देण्यास लागलेल्या विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे ती द्यावी किंवा कसे या संभ्रमात ते पडल्यामुळे ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत, असे सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'अ' वगळता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती त्यांना देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास मूळात त्यांच्या कृतीचे समर्थन करणारे खुलासे करणे अभिप्रेत नाही परंतु ही वस्तुस्थिती जरी असली तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहीत मुदतीत त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात जो प्रतिसाद देणे आवश्यक होते, तो प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीस दिला नाही, असे दिसून येते. ही माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब येथे संभवत नाही, केवळ ईच्छाशक्तीच्या अभावामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरविली नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याचे त्यांचे वरील युक्तिवादामध्ये दिलेले कारण आयोगास मान्य नाही. ते जर अपिलार्थीस माहिती देण्याबाबत त्यावेळी संभ्रमित होते तर त्यांनी यासंदर्भात त्यांच्या वरिष्ठांचे मार्गदर्शन घेणे गरजेचे होते, तथापि अशाप्रकारची कार्यवाही देखिल त्यांनी केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर निर्णय घेण्याची ईच्छाशक्ती त्यांच्याकडे नव्हती, हे एकमेव कारण येथे उरत आहे. अपिलार्थीने

मागणी केलेली माहिती त्यांना दि. ३.७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देय असताना त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ४.८.२००७ रोजी देऊन अपिलार्थीस माहिती देण्यास ३१ दिवसांचा विलंब लावल्याचा येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे.जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याबाबतचा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणे शक्य नाही.जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांच्या सहायकांकडून त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रथमतः प्राप्त करुन घ्यावयाची होती. ती त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना विलंब लागला. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी, जे अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार आहेत व ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे, हे सर्वजण एकत्रितपणे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जबाबदार ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी व त्यांचे, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना सहाय्य करणारे सर्व सहायक यांना एकत्रितपणे मिळून विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण ३१ दिवसांसाठी रु.७७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्ती रकमेचा शासकीय कोषागारात त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरणा करावा.

**लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीच्या रकमेची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व सदर शास्तीच्या रकमेचा संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून ३१ दिवस एवढया विलंबाने वंचित ठेवल्यामुळे त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.७७५०/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

३) उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यामध्ये शास्तीच्या रकमेची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व वरील आदेशाचे अनुपालन विहित मुदतीत होईल, असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदीरामागे,दुर्गावाडी पैठण-४३१ १०७

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपकोषागार अधिकारी, पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६९
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. हरिनारायण मनोहर गवळी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१०.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांच्या दि.३०.०८.२००७ रोजीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील अर्ज प्राप्त होऊनही माहिती दिली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे

दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २५.७.२००७ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.३.२००२ च्या शासन आदेशानुसार जी मूळ मंजूर पदे (पायाभूत पदे) आहेत, त्यामध्ये शासन मान्यतेशिवाय योजनेत्तर योजनेमध्ये जी अनधिकृत पदे वेळोवेळी वाढविली आहेत, अशा वाढीव पदांची शाळानिहाय माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.८.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांना या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून अपिलार्थीचे अपील परस्पर शिक्षण विभागाकडे प्राप्त झाले व त्या अपिलावर शिक्षण विभागाने दि. १४.९.२००७ रोजी उत्तर दिले. शिक्षण विभागाची ही कृती चुकीची आहे. या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः निर्णय होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची ते सुनावणी घेण्यासाठी तयार आहेत. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय मान्य नसल्यास,ते अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिनारायण मनोहर गवळी, गिता निवास,धनमंडी, जुना बाजार रोड, पवन आर्टच्यामागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७०
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. लक्ष्मण अर्जुन ठोंबरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासकीय अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल),
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ'
महानगरपालिका,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी: शहर अभियंता, महानगरपालिका,औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी (प्रतिनिधी), जन अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थी यांनी दि.३.९.२००७ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दि.१३.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द

केले असून त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये, त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दामहून दिली नसल्याचे, म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील वडारवाडीतील सार्वजनिक रहदारीचा रस्ता खुला करुन मिळण्याबाबत त्यांच्याकडे दि. २२.११.२००३,२९.१२.२००३, ८.१.२००४, २७.१.२००४,१०.२.२००४ व २२.३.२००४ रोजी दिलेल्या अर्जावर झालेल्या चौकशीच्या अहवालाच्या सत्यप्रतींची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.९.२००७ रोजी या विषयावर प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २६.९.२००७ रोजी पारित केले. सदर आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती १५ दिवसांच्या आत नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाकडे केलेले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी संदर्भित केलेल्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर कोणतीच कार्यवाही केली नव्हती, तर त्यांनी

अपिलार्थीस तसे प्रथमतः व नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर मुदतीत का कळविले नाही, याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित प्रतिनिधी आयोगास देऊ शकले नाहीत. आजच्या सुनावणीमध्ये आयोगास पुढे असेही स्पष्ट झाले की, अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही आजपावेतो केलेली नाही.

वास्तविकतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला तक्रार अर्ज हा सार्वजनिक हिताचा होता. जर संबंधित जन माहिती अधिकारी यांना काहीच कार्यवाही करणे शक्य नव्हते तर त्यांनी तसा उल्लेख करुन अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जासंदर्भात वेळीच कळविले असते तर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुन जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील करणे या सर्व गोष्टी कराव्या लागल्या नसत्या. अपिलार्थीच्या सार्वजनिक स्वरुपाच्या तक्रारीची महानगरपालिका,औरंगाबाद कशाप्रकारे विल्हेवाट लावते, याचे हे प्रकरण म्हणजे उत्तम उदाहरण ठरेल यात काही शंका नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा ऑक्टोबर २००५ पासून अंमलात येऊनही अपिलार्थीच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास तीस दिवसांच्या आत उत्तर देण्याचे सौजन्य जन माहिती अधिकारी यांनी दाखविले नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी जे त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी आहेत, त्यांच्या आदेशाचे देखील पालन त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. याचा परिणाम म्हणून अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीकरिता कोणत्याही कारणाशिवाय वंचित राहिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अर्जास व प्रथम अपील निर्णयानंतर कोणतीही कार्यवाही न करण्यासाठीचे कोणतेही कारण समर्थनीय राहू शकत नाही. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित कालावधीत माहिती न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या

तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. आज उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तीन दिवसांच्या आत देण्याचे आयोगास आश्वासित केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणात काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची जन माहिती अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने त्यांना विलंबाच्या

प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण अर्जून ठोंबरे, घ.नं.१-२१-६४४,जयभीमनगर, घाटीरोड, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ', महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७१
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. सतीशकुमार शेषराव साळवे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
महाव्यवस्थापक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ म. , औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ म. ,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: जिल्हा व्यवस्थापक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या
जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबाद
जिल्हा कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॐश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलामध्ये दिलेला निर्णय बेकायदेशीर असल्याने त्यांनी सदर अपील केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ५.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित शासकीय योजनेची व बीज भांडवलाच्या अनुदानाबाबत काही माहिती मागितली होती. सदर माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.१४.६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले निर्णय दि. १४.८.२००७ रोजी पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील दप्तरी दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, "ॲड.साळवे यांना माहिती मिळाल्याचे त्यांनी त्यांच्या दि. १६.७.२००७ च्या लेखी युक्तिवादात स्पष्टपणे नमूद केलेले आहे" जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणीही उपस्थित नाहीत. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबादतर्फे एक लिपीक श्री.आर.जी.गव्वल आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित आहेत. त्यांनी महामंडळातर्फे दि. १९.१२.२००८ या दिनांकाचे एक पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये माहिती अधिकारी श्रीमती वानरे, जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबाद या विभागाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या महत्त्वाच्या कामानिमित्त दौऱ्यावर असल्यामुळे त्या आयोगाच्या सुनावणीस दि. २०.१२.२००८ रोजी उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशीर वाटत असल्याचे विवेचन आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये लेखी स्वरुपात केले नाही अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना सादर केलेल्या दि. १६.७.२००७ रोजीच्या लेखी युक्तिवादात म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे गृहीत धरण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबादतर्फे दि. १९.१२.२००८ रोजी आयोगास दिलेल्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी या (श्रीमती वानरे या जन माहिती अधिकारी आहेत, असे महामंडळाच्या उपस्थित प्रतिनिधीने सांगितल्यावरुन) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबादच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमासाठीच्या महत्त्वाच्या कामानिमित्त दौऱ्यावर असल्याचे नमूद केले आहे. यावरुन वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास माहिती अधिकार अधिनियमाचे गांभीर्य फारसे पटले नसल्याचे दिसून येते. वास्तविकतः एकदा आयोगाची सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर, श्रीमती वानरे यांना त्या, स्वतः जन माहिती अधिकारी असल्याने, आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य होते. तथापि त्यांना महामंडळाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाच्या कामाचे महत्त्व अधिक वाटल्याने त्या आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहिल्या नाहीत.आयोगास, श्रीमती वानरे यांची आयोगासमोरील सुनावणीस स्वतः उपस्थित न राहता, या अपिलासंदर्भात कोणतीही माहिती नसलेल्या लिपीकास पाठवून देण्याची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा सिध्द करते, असे वाटत आहे. त्यामुळे सचिव (सामाजिक न्याय) यांना आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी श्रीमती वानरे यांच्यावर

त्यांना आवश्यक वाटल्यास या प्रकरणी शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी व अशा प्रसंगाची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने त्यांच्यास्तरावरुन योग्य त्या मार्गदर्शनपर सूचना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत,त्यांच्या कार्यक्षेत्रातील महामंडळांना द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतीशकुमार शेषराव साळवे,घर नं.५-५-३४, ज्युब्ली पार्क, भडकल गेट,साळवे निवास,औरंगाबाद-४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) जुहू सुप्रीम शॉपींग सेंटर, पहिला माळा,गुलमोहर क्रॉस रोड क्र.९,जे.व्ही.पी.डी.स्कीम (उत्तर),विलेपार्ले पश्चिम,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७२
निर्णय दिनांक २०-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भास्कर नारायणराव लहाने,<br>रा.अहमदपूर जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,अहमदपूर जि. लातूर.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय<br>आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे कलम ७(१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी

माहिती दिली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करावी व या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेले शुल्क त्यांना परत करण्यात येऊन या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांचा झालेला खर्च त्यांना परत देण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने  जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२७ अन्वये दि. २८.३.२००३ व २१.७.२००५ रोजी दिलेल्या नोटीशीसंदर्भात एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार आहे व त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२८०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १६.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.९.२००७ रोजी अंतिम सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि.२१.९.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जानुसार मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयास उपलब्ध असलेली सर्व माहिती ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशित केले व जी जास्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे, त्या पृष्ठयर्थ एकूण १०४/- रोजी  अपिलार्थीस परत करण्याचे आदेश त्यांनी या आदेशाद्वारे दिलेले आहेत. सदर अपिलाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दि.९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असल्याचे व ती आवश्यक ते शुल्क रु.२८०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करुन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचविले. परंतु नगर परिषदेचे शिपाई श्री. शिवाजी केशव मुंढे हे सदर पत्र अपिलार्थीकडे घेऊन गेले असता अपिलार्थीने प्रथम दि.१४.८.२००७ रोजी ते स्वीकारण्यास नकार दिला.तद्नंतर दि. १६.८.२००७ रोजी संबंधित शिपायाने सदर पत्र अपिलार्थीच्या पत्नीस दि. १६.८.२००७ रोजी हस्तांतरित केले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ योग्य तो पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केलेला आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांनी दि. ४.९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष अपिलार्थीस माहिती दिली व माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने दि. २७.९.२००७ रोजी रु.२८०/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.९.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे दिलेल्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीकडून जादा घेतलेली रक्कम त्यांनी अपिलार्थीस दि. ५.१०.२००७ रोजी परत केली. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी हेतूतः दडविली नाही. अपिलार्थीने माहितीची मागणी व्यक्तिशः केली असल्याने, ही माहिती त्यांच्याकडे तयार असल्याची माहिती त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिली. परंतु अपिलार्थीने सदर पत्र स्वीकारण्यास प्रथम नकार दिल्याने तसेच त्यांच्या दि.९.८.२००७ रोजीच्या पत्राचा स्वीकार दि. १६.८.२००७ रोजी करुनही तद्नंतर अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित झालेले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेला विलंब हा त्यांच्या स्तरावर झालेला आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून या माहितीसंदर्भात त्यांना नगरपरिषदेने पाठविलेले पत्र

स्वीकारण्यास टाळाटाळ केली. त्यांच्या या कृतीद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्याकरिता ते फारसे गंभीर नसावेत,असे अनुमान करण्यास काही हरकत नसावी. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे माहिती तयार असल्याचे पत्र देखील स्वीकारण्यास अपिलार्थी तयार नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी,दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांच्या या म्हणण्याप्रित्यर्थ युक्तिवाद करण्यास व जन माहिती अधिकारी यांच्या विधानांचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगाच्या सुनावणीस उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना ती व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले होते. कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता, ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे अपिलार्थीवर असते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित राहून स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर असूनही या प्रकरणी अपिलार्थीने त्यांची जबाबदारी येथे नीटपणे पार पाडल्याचे दिसून येत नाही. वास्तविकतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार आहे, हे अपिलार्थीस कळविणे, जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही, एवढे असूनही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे व माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना त्यांनी त्यांच्याकडील दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे

देऊनही प्रथमतः अपिलार्थीने हे पत्र नगर परिषदेच्या शिपायाकडून स्वीकारले नाही. शेवटी हे पत्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या पत्नीस दि. १६.८.२००७ रोजी द्यावे लागले. हे पत्र देऊनही अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष काढला आहे, याचे कारण देताना त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्यासमोर दि. ४.९.२००७ रोजी माहिती दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे हे गृहीतक चुकीचे आहे. कारण वर वर्णिल्याप्रमाणे अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेणे ही अपिलार्थीची जबाबदारी आहे. व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती घेऊन त्यांच्याकडे पाठपुरावा करणे, हे अधिनियमाद्वारे अभिप्रेत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याची जन माहिती अधिकारी यांनी स्वतःहोऊन कल्पना देऊनही या पत्राची प्रत स्वीकारण्यास अपिलार्थीने टाळाटाळ केली. त्यांना दि. ४.९.२००७ रोजी माहिती प्राप्त होऊनही त्यांनी माहिती पोटीचे शुल्क दि. २७.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले. जी अनावश्यक माहिती, जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क अपिलार्थीस पुरविली, त्या शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.१०.२००७ रोजी परत केली आहे, हे पाहता,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर विलंब लावला, हा मुद्दा येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीस विलंबाने माहिती मिळण्यास ते स्वतःच जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

वरील संपूर्ण घटनाक्रम पाहता, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी पार पाडली असल्याने व अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी असद्हेतुपूर्वक नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये केलेली विनंती मान्य करण्याजोगी नसल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायण लहाने,भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७३
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. तेझाड गोरखनाथ बाबुराव, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम
स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी
श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,
कोपरगाव जिल्हा अहमदनगर.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.)
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं ुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे त्यांचा अर्ज व अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याचे नमूद केले असून आपल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षित केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या शाळेतील उपशिक्षिका श्रीमती उषा मधुकर मोरे यांच्याबद्दल जून २००२ ते जुलै २००६ या कालावधीमधील काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली होती. तथापि त्यांचा माहितीसाठीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांनी न स्वीकारता तो अपिलार्थी यांच्याकडे तसाच परत पाठविला, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या प्रकरणी त्यांनी दि. २२.८.२००७ रोजी संबंधित संस्थेकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचे हा अपील अर्ज स्वीकारण्यास संबंधित संस्थेने देखील नकार दिला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ योग्य तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी नकार दिल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.७.२००७ रोजीच्या अर्जामध्ये श्रीमती उषा मधुकर मोरे, उपशिक्षिका यांच्या शाळेतील त्यांच्या सेवेविषयी एकूण ९ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षासंदर्भात असल्यामुळे अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेऊन कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याची विचारणा अपिलार्थीस केली असता, अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली आहे, तो त्रयस्थपक्ष म्हणजे त्यांची पत्नी असून ते व त्यांच्या पत्नी यांच्यामध्ये एक न्यायालयीन दावा प्रलंबित आहे. न्यायालयीन कामकाजासाठी व त्यांची बाजू स्पष्टपणे व सत्यस्वरुपात मांडण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या ९ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्यातील मुद्दा क्र.७,८ व ९ या मुद्यांशी

संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने ही माहिती प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांच्याकडे मागताना प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी अशा स्वरुपात मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी अपिलार्थीने विचारलेली ही माहिती सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्यास्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासंदर्भात निर्णय घेणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे, त्यामुळे अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ ते ९ शी संबंधित माहिती प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित ६ मुद्यावरील माहिती - या माहितीचे स्वरुप पाहता, ती अपिलार्थीस प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कुल,कोपरगाव जिल्हा अहमदागर यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरते. सबब प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कुल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १ ते ६ या मुद्यांशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी व त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज स्वीकार करणे भाग आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी. आज सुनावणीस श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कुल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर या विद्यालयातील संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा संस्थेचे पदाधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. त्यांच्या शाळेवर व संस्थेवर शासनाचे प्रशासकीय नियंत्रण आहे, हे आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयामध्ये स्पष्ट केले असून, या निर्णयाप्रमाणे उपरोक्त प्रकरणी देखील त्यांच्या शाळा व संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे. सबब त्यांनी ही माहिती अपिलार्थीस आयोगाने दिलेल्या मुदतीमध्ये द्यावी, या

आदेशाची येथे पुनरुक्ती करण्यात येत आहे. वरील पार्श्वभूमीवर प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या दि.२७.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाची प्रत स्वीकृत करावी व हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि. २७.७.२००७ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते ६ शी संबंधित माहिती विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या दि.२७.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाची प्रत स्वीकृत करावी व हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि. २७.७.२००७ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते ६ शी संबंधित माहिती विनामूल्य पुरवावी.

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक),जि.प.अहमदनगर यांनी प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर हे वरील आदेश क्र.२ चे पालन करतील, असे पहावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तेझाड गोरखनाथ बाबुराव,द्वारा तेझाड एन.पी.,भिमनगर,भावसिंगपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी श्री.शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,शारदानगर,कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७४
निर्णय दिनांक २०-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख हबीब पाशा<br>रा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट,चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असून जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे त्यांनी पालन केले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने दि. १७.५.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची तपासणी करण्याची व इतर सहकारी सोसायटीबाबत एकूण ४ मुद्यांवर लेखी स्वरुपात माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीमध्ये -एकूण नोंदणीकृत सहकारी संस्थांची संख्या, अवसायनातील एकूण सहकारी संस्था, लेखा परिक्षण अहवाल न देणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या व सहकारी संस्थांचे निरीक्षण अहवाल- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या दि. १७.५.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.५.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीसाठी त्यांच्या कार्यालयात दि. २२.५.२००७, २३.५.२००७ व २४.५.२००७ रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २३.५.२००७ रोजी राहून कागदपत्रांची तपासणी केली व उपस्थित राहिल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांना परत दि.२३.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते ४ शी संबंधित माहितीची मागणी केली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १४.६.२००७ रोजी पुरविली. या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत झालेल्या सहकारी संस्थांची संख्या, अवसायनातील एकूण सहकारी संस्थांची संख्या व अपिलार्थीस उर्वरित मुद्यांसंदर्भात माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.७.२००७ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि.१७.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस अपील मान्य करुन अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती अधिनियमानुसार तात्काळ देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंतिमतः दि. १८.१०.२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांनी अपेक्षिलेली संपूर्ण माहिती त्यांना दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १७.५.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दि. १८.५.२००७ व १४.६.२००७ रोजी पुरविली आहे. तसेच त्यांच्याकडे प्रथमतः उपलब्ध नसलेली उर्वरित माहिती त्यांनी नंतर तयार करुन अपिलार्थीस दि. १८.१०.२००७ रोजी पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती देण्यास वेळ का लागला याचे कारण विचारले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अनेक अभिलेख्यांचा संदर्भ घेऊन संकलीत करुन तयार करावयाची होती, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यास इतका कालावधी लागला, असे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगाचे निदर्शनास आणून दिलेली वस्तुस्थिती पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे बराचसा भाग उपलब्ध नव्हता. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ७०० पैकी ६६४ सोसायटीसंदर्भात जी माहिती उपलब्ध होती ती त्यांनी अपिलार्थीस दि. १८.५. व १४.६.२००७ रोजी पुरविली आहे व उर्वरित ३० सोसायटीसंदर्भातील माहिती दि. १८.१०.२००७ रोजी दिली आहे. माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाच्या जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या समर्थनाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर लागलीच जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी पूर्णतः माहिती पुरविली आहे. या संपूर्ण घटनाक्रमात जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेला प्रतिसाद मुदतीत व विशेष प्रयत्न करुन दिला आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्हेतूने नाकारल्याचे अथवा ती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वर उल्लेख केल्याप्रमाणे पूर्ण स्वरुपात पुरविली असल्याने अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील कोणत्याही मुद्यावर निर्णय देण्यासाठी कोणतेही कारण उरत नाही, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख हबीब पि.पाशा गुलाम रसूल, घर नं.१-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००५
निर्णय दिनांक २०-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुभाष रतनसिंग महेर<br>रा औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथ.)<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी ॲुश्रीं गुळुब येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०६.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने, माहिती देण्याची त्यांची विनंती नाकारली असल्याचे, नमूद केले आहे. त्याचबरोबर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेली कर्तव्ये योग्य दृष्टीने पार न पाडल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची

विनंती केली असून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी, अशीही आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.७.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जून २००२ ते नोव्हेंबर, २००६ या कालावधीतील- जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्रा.शा.शाळा, गारखेडा परिसर,औरंगाबाद या शाळेस अधीक्षक, शालेय पोषण आहार, पंचायत समिती (वर्ग-२) औरंगाबाद यांनी दि.१९.१०.२००६ रोजी भेट दिली असता, त्यांना आढळलेल्या अनियमिततेबाबतच्या झालेल्या चौकशीच्या अहवालासंदर्भातील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेचे मुख्याध्यापकाने जून २००२ ते ऑक्टो.२००६ या कालावधीतील तांदळाच्या मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून या कालावधीत तांदुळ पुरवठा केलेल्या कागदपत्रांच्या व मिळालेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती, शाळेने मागणी केलेल्या तांदळाचे परिमाण व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले अनुदान,तांदुळ शिजवून अनुदानाच्या केलेल्या खर्चाचे विवरणपत्र व व्हाऊचर्स, अधीक्षक,शालेय पोषण यांनी दि. १९.१०.२००६ रोजी शाळेस भेट दिली असता आढळून आलेला तांदुळाचा साठा व यातील अनियमिततेबाबत केलेल्या पंचनाम्याची प्रमाणित प्रत, शाळेत चौकशीच्या व भेटीच्या वेळी आढळून आलेल्या एकूण तांदुळ साठयाची प्रमाणित माहिती आणि याविषयी चौकशी करुन केलेल्या वस्तुस्थितीदर्शक अहवालाची व कागदपत्रांची प्रमाणित प्रत, या शाळेतील जून २००२ ते ऑक्टोबर, २००६ या कालावधीतील विद्यार्थी उपस्थिती पत्रकाच्या (गोषवारा/रजिस्टर) प्रमाणित प्रती, शाळेत तांदूळ शिजविण्यासाठी दिलेल्या करारपत्रकाविषयीच्या कागदपत्रांची प्रमाणित माहिती, जून २००२ ते दि.७.११.२००६ या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी

दिलेल्या तांदळाच्या मानधनाच्या धनादेशाची संपूर्ण माहिती व अनुदान खर्च केलेल्या विवरणपत्रांची व कागदपत्रांची प्रमाणित माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण ८ मुद्यांपैकी ६ मुद्दे संबंधित संस्थेशी संबंधित असल्याने ही माहिती संबंधित संस्थेकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. हा अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. २०.१.२००७ रोजी प्राप्त झाला.अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२.२.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीने मागितलेली उर्वरित माहिती संबंधित शाळेकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले व या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांना देऊन त्यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. २.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती 'जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था' या शिक्षण संस्थेशी संबंधित आहे, ती माहिती शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात यावी,असे कळवून त्यांनी सदर पत्राची प्रत संबंधित मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळा गारखेडा परिसर,औरंगाबाद यांना दिली होती. तथापि

संबंधितांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. त्यांच्याकडील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती त्यांनी अपिलार्थीस दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ८ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण २ मुद्यांची (मुद्दा क्र.४ व ५) माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २१.१२.२००६ रोजी दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १,३,४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. या मुद्यांपैकी मुद्दा क्र.४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीपेक्षा विलंबाने दिली व मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊन त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही, असे त्यांनी आज आयोगास सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.६,७,८ पैकी मुद्दा क्र. ७ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी शाळेच्या तपासणीच्या वेळी हस्तगत केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व्यतिरिक्त मुद्दा क्र.६, ७ अंशतः व ८ या मुद्यांशी संबंधित माहिती संस्थेकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. मुद्दा क्र.७ ची अपिलार्थीने मागणी केलेल्या करारपत्रांच्या हस्तगत कागदपत्रांच्या विषयी विचारले असता,असे सांगितले. त्यांनी ही कागदपत्रे संबंधित शाळेस परत केली आहेत, असे सांगितले.अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मिश्र स्वरुपाची असून त्यातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवणे हे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने ज्या प्राथमिक शाळेकडील माहिती मागितली आहे ती प्राथमिक शाळा स्वतः एक स्वतंत्र असे सार्वजनिक प्राधिकरण आहे. या शाळेला

शासनाकडून विविध अनुदाने दिली जातात व तिच्यावर शिक्षणाधिकारी यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असल्यास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत संबंधित संस्थेकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील या तरतुदीनुसार त्यांना भाग होते, तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी ओलांडून गेल्यानंतर त्यांनी दि. २१.१२.२००६ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती पूर्णतया चुकीची आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२.२.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहेत. त्यामध्ये प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने जरी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१.२००७ रोजी अपील केल्याचे म्हटले आहे तरी सदर अपील प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २०.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या हातून कोणत्याही प्रकारे अनियमितता घडली आहे, असे आयोगास वाटत नाही. संबंधित शाळा हे स्वतंत्र व वेगळे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे, अपिलार्थीस ती माहिती संबंधित शाळेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत वेगळा अर्ज करुन मागणे सहज शक्य होते, ती माहिती त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे मागण्याचे कोणतेही कारण आयोगास सकृत दर्शनी दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची प्रत, अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत न पाठवून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित शाळेकडून प्राप्त करुन घेण्याची सूचना त्यांनी अपिलार्थीस केली, अपिलार्थीस सर्वसाधारणतः जी माहिती दि. ६.१२.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी प्राप्त होणे अभिप्रेत होते, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस २० दिवसांच्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारे अधिनियमातील कलम ६(३)(एक) व कलम ७(१) चा भंग करुन त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या त्यांच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.औरंगाबाद यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणात, केवळ जन माहिती अधिकारी यांच्या चुकीमुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून ते दीर्घकाळ वंचित राहिल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरावावी. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ शी संबंधित माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाही असे म्हटले आहे, या संदर्भात त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या मुद्यावरील माहितीचा त्यांच्या कार्यालयात परत नव्याने शोध घेऊन अपिलार्थीस वरील मुदतीत माहिती द्यावी व जर या माहितीशी संबंधित अभिलेखे गहाळ झाले असतील तर ते अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचारी/अधिकारी यांची आहे, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यावर आवश्यक वाटल्यास फौजदारी तक्रार दाखल करावी.

अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल. संबंधित संस्थेने गट शिक्षण अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पूर्णतया सहाय्य करावे अन्यथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.औरंगाबाद यांनी संबंधित शिक्षणसंस्थेवर शालेय शिक्षण विभागाच्या आचार संहितेप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष रतनसिंग महेर,द्वारा बाळासाहेब वाळुज, सी-५२, न्यू विशाल नगर,गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळा, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५७
निर्णय दिनांक २०-१२-२००८

१ श्री. पारस नंद यादव : अपिलार्थी
रा. जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,जाफ्राबाद जि.जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी हे अपील केले असल्याचे म्हटले आहे व या अपील अर्जासोबत त्यांच्या मूळ अर्जाची प्रत सादर करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे दि. १.१.२००७ ते ३०.६.२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या रोहयोच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" रो.ह.यो. अन्तर्गत प्राप्त झालेला पतमर्यादा ज्याकामावर खर्च करण्यात आली त्यार्सव कामावरिल - मजुराचे एक मस्टर,गावनिहाय कामनिहाय देण्यात यावे"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १०.९.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ४.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री फार मोठया प्रमाणात वळवावी लागणार असल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ७(९) अन्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. १६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.१०.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.६.२००८ रोजी माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली. माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीचे दि. १०.६.२००८ रोजीचे तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांना उद्देशून लिहिलेले पत्र उपलब्ध अभिलेख्यामध्ये असल्याचे दिसून आले आहे. या पत्रामध्ये तालुका कृषि अधिकारी यांना त्यांचा प्रथम अर्ज निकाली काढण्याची विनंती अपिलार्थीने केली आहे.

खुद्द अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा प्रथम अर्ज निकाली काढण्याची दि. १०.६.२००८ रोजी विनंती केली असल्याने त्यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर निर्णय घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. हे पाहता व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत आता प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पारस नंद यादव, संपादक-'जनता करे पुकार', महात्मा गांधी रोड,देवगिरी बँकेच्या खाली,कृष्णा कॉम्प्लेक्स,जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २०२५, २०२६, २०२७, २०२८, २०२९, २०३०, २०३१, २०३२, २०३३, २०३४, २०३५, २०३६ व २१४९/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०२५, २०२६, २०२७, २०२८, २०२९, २०३०, २०३१, २०३२, २०३३, २०३४, २०३५, २०३६ व २१४९

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ श्री. लक्ष्मण तानका देवरे, अपिलार्थी
अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ,
८५, नवी पेठ, जळगांव

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २०२५/०७ | |
| | जिल्हाधिकारी, धुळे | जिल्हाधिकारी, धुळे |
| प्रत्यक्ष | तहसीलदार (सं.गां.यो.), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे | निवास उपजिल्हाधिकारी, धुळे |
| २ | अपील क्रमांक २०२६/०७ | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, धुळे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे |
| प्रत्यक्ष | कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, धुळे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद धुळे |

| | | |
|---|---|---|
| ३ | अपील क्रमांक २०२७/०७ | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव |
| प्रत्यक्ष | -- | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, जळगांव |
| ४ | अपील क्रमांक २०२८/०७ | |
| | जिल्हाधिकारी, जळगांव | जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव |
| प्रत्यक्ष | सरकारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव | अपर जिल्हाधिकारी, जळगांव |
| ५ | अपील क्रमांक २०२९/०७ | |
| | कुलगुरु यांचे कार्यालय, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव |
| प्रत्यक्ष | जनसंपर्क अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव |
| ६ | अपील क्रमांक २०३०/०७ | |
| | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव |
| प्रत्यक्ष | जनसंपर्क अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | |
| ७ | अपील क्रमांक २०३१/०७ | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, कोल्हापूर | -- |
| ८ | अपील क्रमांक २०३२/०७ | |
| | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| प्रत्यक्ष | प्रमुख लिपिक, सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे |
| ९ | अपील क्रमांक २०३३/०७ | |
| | जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार | जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार |
| प्रत्यक्ष | अव्वल कारकून, सर्वसाधारण संकीर्ण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार | निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार |
| १० | अपील क्रमांक २०३४/०७ | |
| | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| प्रत्यक्ष | | निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे |
| ११ | अपील क्रमांक २०३५/०७ | |
| | विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद |
| प्रत्यक्ष | तहसीलदार (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | -- |
| १२ | अपील क्रमांक २०३६/०७ | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड | मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड |
| प्रत्यक्ष | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), | -- |

जिल्हा परिषद, नांदेड

१३ अपील क्रमांक २१४९/०७

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी, नाशिक, पुणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे |

## निर्णय

उपरोक्त तेरा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी उपस्थित आहेत, अपील क्रमांक २०२६, २०२८, २०२९ व २०३०/०७ मधील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपील क्रमांक २०२५, २०३२, २०३३, २०३५ व २०३६/०७ मधील जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपील क्रमांक २०३१/०७ मधील जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपील क्रमांक २०२७/०७ मधील जन अपिलीय अधिकारी तर अपील क्रमांक २०३३/०७ मधील जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपील क्रमांक २१४९/०७ संदर्भात तत्कालीन उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, पुणे हे उपस्थित आहेत. अपील क्रमांक २०३४/०७ मधील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे एकाच माहितीकरिता दिनांक १०-०५-२००७ रोजीची दोन, दिनांक १९-०५-२००७ रोजीची तीन, दिनांक ०६-११-२००७ रोजीची तीन व दिनांक १६-०३-२००७, २२-०६-२००७, ०६-०७-२००७, १८-०७-२००७ व ०५-१०-२००७ रोजी दाखल झालेली प्रत्येकी एक अशी एकूण तेरा व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने, काही प्रकरणांत त्यांना त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे आजपर्यंत माहिती मिळाली नाही, काही प्रकरणात मिळालेली माहिती खोटी आहे, अपील क्रमांक २०२७/२००७ व क्रमाक २०२९/२००७ मध्ये अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे

माहिती प्राप्त झाली नाही, अपील क्रमांक २०३०/२००७ मध्ये निर्णयाप्रमाणे कारवाई न करता खोटी माहिती दिली आहे, काही प्रकरणात त्यांचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) प्रमाणे स्थानांतरित केला नाही, अपील क्रमांक २०२८/२००७ मध्ये जन अपिलीय अधिकारी यांचेसमोर सुनावणी झाली तथापि निकाल मिळाला नाही, अपील क्रमांक २०३४/२००७ मधील प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांचे म्हणणे ऐकून न घेतल्याने त्यांनी लेखी निवेदन दिले तथापि त्यांच्या लेखी निवेदनातील मुद्यांचा विचार न करता जन अपिलीय अधिकारी यांनी निकाल दिला, अपील क्रमांक २०३१/२००७ व २०३५/२००७ मधील संबंधितांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज स्वीकारला नाही, तसेच त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेले शासन निर्णय मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशान्वये निघाले आहेत, प्रतिवादींनी सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्याने मा. राज्यपाल यांचा अवमान झाला असून सदर आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने त्यांना माहिती मिळत नाही, असे नमूद केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्याचे आदेश व्हावेत, संबंधित अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार कायद्यातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी व त्यांनी मूळ अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मिळावी, अशी आयोगास अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या सर्व प्रकरणांमध्ये त्यांच्या मूळ अर्जांमध्ये महाराष्ट्र शासन निर्णय क्र. राचिप्र-३३९३/अनौसं क्र.-९६/९३/२९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, दिनांक ६/१०/९३ नुसार महात्मा ज्योतिबा फुले यांचे शासकीय फोटो लावणेबाबत व महाराष्ट्र शासन निर्णय क्र. राछाप्र-३३९९/१२१९/२९ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, दि. ३ जानेवारी २००० नुसार सावित्रीबाई फुले यांचे शासकीय फोटो लावणेबाबत वेगवेगळया कालावधीशी संबंधीत, खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

अपील क्रमांक २०२५/०७ व २१४९/०७ मध्ये -

"१. जिल्ह्यातील एकूण शाळा मा. विद्यालये, कॉलेज शासकीय निमशासकिय कार्यालयापैकी कीती ठिकाणी शासन निर्णयाप्रमाणे फोटो लावलेले नाहीत.

२. फोटो न लावलेल्यांची पत्त्यासह यादी. "

अपील क्रमांक २०२६/०७, २०२७/०७, २०३१/०७, २०३२/०७, २०३३/०७, २०३४/०७ व २०३६/०७ मध्ये -

"१. शासकिय मुद्रनालयाकडे किंवा शासकीय डेपोकडे आपण महात्मा ज्योतिराव फुले व क्रांती ज्योति सावित्रीबाई फुलेंचे किती फोटोंची मागणी शासकीय मुद्रणालयाकडे मागणी केली होती. त्याचा तपशिल.

२. ४० X ५० आकाराचे रंगीत शासकीय फोटो कितीठिकाणी लागले नाहीत त्यांची पुर्ण पत्ता व फोन नंबरसह यादी मिळावी. "

अपील क्रमांक २०२८/०७, २०२९/०७, २०३०/०७ व २०३५/०७ मध्ये -

"१. शासकिय मुद्रनालयाकडे किंवा शासकीय डेपोकडे आपण महात्मा ज्योतिराव फुले व क्रांती ज्योति सावित्रीबाई फुलेंचे किती फोटोंची मागणी शासकीय मुद्रणालयाकडे केली होती. त्याचा तपशिल.

२. शासकीय मुद्रणाल्यातून आणलेले महात्मा ज्योतिराव फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे फोटो किती ठिकाणी लागलेले नाहीत, त्यांची पूर्णपत्ता व फोन नंबर सह यादी मिळावी.

३. कार्यसन अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई - ३२, यांचे पत्र क्रमांक राछाप्र- ३३९९/२२१९/२९ दिनांक २७ मे २००३ प्रमाणे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेंचे शासकिय मुद्रणालयातून आणलेले फोटो किती ठिकाणी लागले याचा महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या अहवालाची प्रत मिळावी. "

**अपील क्रमांक २०२५/०७**

अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-११-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे उपरोक्तप्रमाणे माहितीची मागणी केली होती. जिल्हाधिकारी, धुळे यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अधिका-यांकडून माहिती मागविली तर जिल्ह्यातील इतर विभाग प्रमुखांकडे अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत पाठवून त्यांच्या कार्यालयाची माहिती अपिलार्थीस नियमानुसार विहित मुदतीत परस्पर पुरविण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांची अद्यायावत माहिती संकलित करुन त्यांना पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे व जिल्ह्यातील इतर कार्यालयांची माहिती पुरविण्यास संबधित कार्यालय प्रमुख हे सक्षम असल्याने त्या त्या कार्यालयांकडे स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस कळविले. जिल्हाधिकारी, धुळे यांनी दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या अधिनस्त कार्यालयांची माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते.

**अपील क्रमांक २०२६/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, धुळे यांनी त्यांच्या दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी संबंधितांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून ५ दिवसाच्या आत संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे कळविले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या पदनामाचाच केवळ उल्लेख करुन अग्रेषित केल्याची दिसून

येते व अशाच प्रकारे दिनांक ०१-०३-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या विषयासंबंधीची माहिती जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत असलेली कार्यालये इ. कडून संकलीत करण्याची कार्यवाही सुरु असून सदरची माहिती अधिनस्त ग्रामीण कार्यालयांकडून घ्यावयाची असल्याने ती संकलित करण्यास विलंब होऊ शकतो तरी माहिती संपूर्ण संकलित झालेनंतर तात्काळ पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले.

**अपील क्रमांक २०२७/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा. प्र.) जिल्हा परिषद, जळगांव यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देऊन त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती देण्यात आली असल्याने त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. या पत्राचे अवलोकन केले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी संदर्भामध्ये अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे नमूद केल्याचे दिसून येते.

**अपील क्रमांक २०२८/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक नसलेल्या प्रथम अर्जान्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. प्रकरणाशी संबंधित पत्रव्यवहारांवरुन सदर प्रथम अर्जाचा दिनांक ०५-०५-२००७ असा होता, असे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

**अपील क्रमांक २०२९/०७ व २०३०/०७**

या दोनही प्रकरणात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या स्वतंत्र प्रथम अर्जान्वये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन विद्यापीठासंदर्भातील माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते.

**अपील क्रमांक २०३१/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा. प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी त्यांच्या दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी खातेप्रमुख, जिल्हा परिषद यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत पाठवून त्यांनी मागणी केलेली माहिती विनाविलंब त्यांच्याकडे सादर करण्यास कळविले. या पत्राची प्रत संबंधीत गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी व तालुका वैद्यकीय अधिकारी यांना पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत पाठवून देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन सदरची माहिती जिल्हास्तर व तालुकास्तरावरील माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी कालावधी लागणार असल्याने मुदतवाढ देण्याची अपिलार्थीस विनंती केली. त्यानंतर दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कोल्हापूर मुख्यालयासंदर्भातील माहिती अपिलार्थीस पाठवून तालुका स्तरावरील माहिती पाठवून देणेबाबत संबंधित तालुका प्रमुख यांना कळविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा. प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अपिलार्थीस कळविले.

**अपील क्रमांक २०३२/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी पुणे यांचे प्रमुख लिपीक यांनी दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देऊन इतर शासकीय कार्यालयांची माहिती संबंधित शासकीय कार्यालयांना परस्पर अर्ज करुन मागवून घेण्याचे अपिलार्थीस सूचित करुन, त्यांचा अर्ज निकाली काढला.

**अपील क्रमांक २०३३/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

**अपील क्रमांक २०३४/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

**अपील क्रमांक २०३५/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस दिली व त्यांच्या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत पाठवून त्यांना याबाबतची माहिती पुरविण्याचे कळविण्यात आल्याचे अपिलार्थीस कळविले.

**अपील क्रमांक २०३६/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा. प्र.) जिल्हा परिषद यांनी दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी (जिल्हा परिषद, नांदेड) यांना अर्जदारास माहिती देण्याचे सूचित केले.

**अपील क्रमांक २१४९/०७**

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जिल्हाधिकारी, नाशिक, पुणे, अमरावती, नागपूर व औरंगाबाद यांच्याकडे एकाच अर्जाव्दारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासंबंधी माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून दिनांक २१-११-२००६ रोजी प्रा. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांना प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास

सांगितले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद पुणे यांनी दिनांक २९-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रतिसाद देऊन "माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम क्रमांक ३ मधील तरतुदीनुसार संदर्भिय पत्रान्वये आपण मागविलेली माहिती नागरिक या नात्याने मागणी केलेली नाही. सदरची माहिती संकलितरित्या या कार्यालयात उपलब्ध नाही", असे कळविले.

अपिलार्थीचे वरील सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये, अपील क्रमांक २०२५, २०२६, २०२७, २०२८, २०२९, २०३०, २०३१, २०३२, २०३३, २०३४, २०३५, २०३६ व २१४९/०७ शी संबंधित, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ०४-०३-२००७, ०८-०३-२००७, ०५-०२-२००७, १८-०६-२००७, ०६-०७-२००७, ०६-०७-२००७, २३-०३-२००७, ०८-०३-२००७, ०५-०३-२००७, २३-०२-२००७, ०९-०८-२००७, २३-०३-२००७ व ०६-१२-२००६ रोजी स्वतंत्र प्रथम अपील दाखल केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, यापैकी अपील क्रमांक २०२५, २०२६, २०३१, २०३५, २०३६ व २१४९/०७ यामधील प्रथम अपिलावर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. तथापि अपील क्रमांक २०३१/२००७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा. प्र.) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी त्यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये, शासकीय माहिती अधिकारी यांचेकडून पुरविण्यात आलेल्या माहितीच्या विरोधात त्या विभागासाठी असलेल्या अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करणे आवश्यक असल्याचे अपिलार्थीस कळविले.

अपील क्रमांक २०२७, २०२८, २०२९, २०३०, २०३२ व २०३३/०७ या प्रकरणामध्ये सुनावणी घेऊन संबधित जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केल्याचे दिसून येते.

यामध्ये अपील क्रमांक २०२७/०७ मध्ये, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०४-०३-२००७) अपिलावर दिनांक २४-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचा दिनांक २२-१२-२००६ रोजीचा अर्ज नियम ६ (३) नुसार संबंधीत जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या विभागांच्या खातेप्रमुखांकडे वर्ग करावा व संबंधित विभागाने सदरची माहिती अपिलार्थीस परस्पर एक महिन्याच्या आत देण्याच्या सूचना दिल्या. सामान्य प्रशासन विभाग कार्यालयाने फक्त तालुका स्तरावरील कार्यालयांची माहिती गोळा करुन अपिलार्थीस एक महिन्याच्या आत द्यावी असे सूचित केले. सदर आदेशानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, जळगांव यांनी त्यांच्या दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याचे दिसून येते.

अपील क्रमांक २०२८/०७ मध्ये, जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक ३०-०७-२००७ रोजी अंतिम सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये सर्व कार्यालयांना परिपत्रक पाठवून त्यासंबंधिची माहिती अर्जदार यांना परस्पर कळविण्याबाबत माहिती अधिकारी यांनी सत्वर कार्यवाही करावी व जिल्हाधिकारी कार्यालयातील यासंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत द्यावी, असे सूचित केले. जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे फोटो लावलेल्या कार्यालयांची यादी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते.

अपील क्रमांक २०२९ व २०३०/०७ मध्ये जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी दिनांक ०२-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी माहिती अपिलार्थीस परस्पर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ परिपत्रकान्वये कळविण्यात यावे, असे सूचित

केले. त्यानुसार विद्यापीठाने दिनांक २४-०८-२००७ अन्वये परिपत्रक निर्गमित केल्याचे दिसून येते.

अपील क्रमांक २०३२/०७ मध्ये जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ३०-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले दिनांक ०७-०४-२००७ रोजीचे आदेश दिनांक ०९-०४-२००७ रोजी पारित केले. अपिलार्थी यांच्या अपिलात तथ्य नसल्याचा निष्कर्ष काढून "अपील काढून टाकणेत येत आहे. ", असे त्यांनी आदेश दिले.

अपील क्रमांक २०३३/२००७ मध्ये जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी दिनांक ०४-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २४-०४-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी - अपिलकार यांना दिनांक २०-१२-२००६ रोजी माहिती कळविण्यात आली आहे, तसेच प्रस्तुत मागणी केलेली माहिती संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा त्यांच्या अधिपत्याखाली येणा-या संस्था यासाठी त्यांनी नियुक्त केलेले माहिती अधिका-यांकडून अपील अर्जदार यांना प्राप्त होऊ शकते, या कारणास्तव अपिलकार यांचा दिनांक १२-०३-२००७ रोजीचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे नमूद केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपीले दाखल केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे तोंडी व लेखी निवेदनामार्फत अपिलनिहाय खालीलप्रमाणे युक्तिवाद करण्यात आला.

**अपील क्रमांक २०२५/०७ बाबत-**

जिल्हाधिकारी, धुळे यांचे दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रानुसार पाठविलेली माहिती खोटी आहे. तहसीलदार, धुळे, विभागीय अधिकारी, धुळे, तहसीलदार शिरपूर, विभागीय

अधिकारी शिरपूर यांच्या कार्यालयास भेट दिली असता शासकीय फोटो लावलेले आढळून आले नाहीत.

**अपील क्रमांक २०२६/०७ बाबत-**

अर्जात नमूद केलेल्या मुद्दयावर कोणत्याही माहिती अधिकारी किंवा सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही, माहिती अधिकारी व अपील अधिकारी अत्यंत बेजबाबदार असल्याचे दिसून आले आहे.

**अपील क्रमांक २०२७/०७ बाबत-**

अर्जात नमूद केलेल्या कोणत्याही मुद्दयावर आजपर्यंत माहिती दिली नाही. अपील अधिकारी यांनी स्पष्ट आदेश देऊनही सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

**अपील क्रमांक २०२८/०७ बाबत-**

अर्जातील मुद्दयावर आजपर्यंत माहिती दिली नाही. संबंधीत शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची व माहिती देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचीच आहे परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही.

**अपील क्रमांक २०२९ व २०३०/०७ बाबत-**

दिनांक ०२-०८-२००७ रोजी कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांच्या कार्यालयास भेट दिली असता म. ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा शासकीय फोटो लावलेला आढळून आला नाही. आजपर्यंत माहिती दिली नाही.

**अपील क्रमांक २०३१/०७ बाबत-**

अर्जात नमूद केलेल्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी मा. राज्यपाल यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्यावर निश्चित केलेली आहे. म्हणून सदर

शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसंबंधी माहिती देण्याची जबाबदारी फक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची आहे. परंतु त्यांनी ती माहिती देण्यास नकार दिला आहे.

**अपील क्रमांक २०३२/०७ बाबत-**

जिल्हाधिकारी पुणे यांच्या कार्यालयात फोटो लावलेला नाही.

**अपील क्रमांक २०३३/०७ बाबत-**

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन घेतले त्यावर कोणतीही चर्चा केली नाही, म्हणणे ऐकून घेतले नाही व अपिल निकालात लेखी निवेदनातील मुद्दे यांचा विचार न करता निकाल दिला.

**अपील क्रमांक २०३४/०७ बाबत-**

माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी जिल्हाधिकारी ठाणे यांनी माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला. माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना जबाबदारीची जाणीव करुन देण्यासाठी दिनांक २८-०३-२००७ रोजी लेखी पत्र समक्ष दिले तथापि त्याची दखल त्यांनी घेतली नाही.

**अपील क्रमांक २०३५/०७ बाबत-**

दिनांक ०९-०८-२००७ रोजी पाठविलेले प्रथम अपील स्वीकारले नाही. अर्जावर 'आयुक्त कार्यालयाशी संबंधीत नाही' असा शेरा दिनांक १३-०८-२००७ रोजी देऊन अर्ज परत पाठविला. माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

**अपील क्रमांक २०३६/०७ बाबत-**

अर्जात नमूद केलेल्या मुद्दयांवर माहिती दिली नाही, प्रथम अपील अर्जावर अपिलीय अधिका-याने निकाल दिला नाही. माहिती देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, नांदेड यांची आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी माहिती न देता अर्ज इतर अधिका-यांकडे पाठविला.

**अपील क्रमांक २१४९/०७ बाबत-**

फोटो लावले नाहीत त्या कार्यालयांची यादी पाहिजे ती मिळाली नाही.

अपिलार्थीने वरील सर्व प्रकरणातील संबधित अधिका-यांवर कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी व त्यांना आकारलेल्या दंडाच्या रकमेतून ५० टक्के रक्कम त्यांना भरपाईपोटी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

उपरोक्त सर्व प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने एकाच विषयावरील एकाच प्रकारच्या माहितीकरिता वेगवेगळ्या जन माहिती अधिका-यांकडे माहिती मागितली असून अपिलार्थीने जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ इ. कार्यालयातील जन माहिती अधिका-यांना संपूर्ण जिल्ह्यांची व त्यांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण माहिती मागितली आहे. प्रत्येक शासकीय प्राधिकरणामध्ये अनेक जन माहिती अधिकारी प्रत्येक पातळीवर नेमले गेलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ च्या तरतुदीनुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. प्रत्येक जन माहिती अधिका-यांचे स्वतंत्र अस्तित्व असून ते संबंधीत प्राधिकरणाच्या शाखेचे जन माहिती अधिकारी म्हणून स्वतंत्ररित्या कार्यरत आहेत, असे असतांना अपिलार्थीने एकाच विभाग प्रमुखाकडे त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या अर्जावर जिल्हाधिकारी, नंदुरबार व ठाणे कार्यालय वगळता उर्वरित सर्व जन माहिती अधिकारी यांनी कारवाई केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जासंदर्भात ज्या शासन परिपत्रकाचा संदर्भ दिला आहे त्या दिनांक ०६-१०-१९९३ रोजीच्या परिपत्रकाचे अवलोकन करता हा निर्णय शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने पारित केला असून या निर्णयामध्ये सर्व मंत्रालयीन

विभागांना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या छायाचित्राच्या प्रती शासकीय ग्रंथागारातून घेऊन जाण्यासाठी व छायाचित्र चौकट करुन शक्य तितक्या लवकर प्रदर्शित करण्याचे या कार्यालयांना सूचित केले होते. अपिलार्थीने त्यांच्या प्रत्येक अर्जामध्ये निर्देशित केलेल्या दिनांक ०३-०१-२००० च्या निर्णयामध्ये देखील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या छायाचित्राचा समावेश करुन याच सुचनांची पुनरावृत्ती करण्यात आली आहे. अपिलार्थीस या सुचनेप्रमाणे ज्या कार्यालयाकडून कारवाई झाली नाही अशाच कार्यालयांची संख्या, नांवे व पत्ते इत्यादी माहिती संबंधितांकडून अपेक्षित आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती ज्या स्वरुपात आहे ती त्याच स्वरुपात अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. शासनाच्या या सूचनाचे पालन जरी काही कार्यालयांनी केले असले तरी काही शासकीय कार्यालयांनी या शासनाच्या सुचनांचे पालन केलेले नाही. शासन निर्णयाचे पालन न केल्याबद्दल संबंधीतांवर काय कारवाई करावयाची, या शासन निर्णयाचे पालन करण्याविषयीच्या पुढील घडामोडीमध्ये लक्ष घालणे हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत नाही, त्यामुळे याकरिता अपिलार्थीस संबंधीत विभाग प्रमुखाकडे रितसर अर्ज करुन त्याची दाद मागावी लागेल असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी बहुतांश कार्यालयाने शासनाच्या या आदेशाची अंमलबजावणी केल्याचे आढळून आले. ज्या कार्यालयांनी महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे फोटे लावले आहेत ते अपिलार्थीस मान्य नाहीत. त्यांच्या मते हे फोटो शासनातर्फे पुरविल्या गेलेल्या फोटोशी जुळत नाहीत. यासंदर्भात देखील ब-याच जन माहिती अधिका-यांनी अशी अडचण सांगितली की, शासकीय ग्रंथालयात अथवा मुद्रणालयातून त्यांना महात्मा ज्योतीबा फुले व श्रीमती सावित्रीबाई फुले यांचे फोटो उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे त्यांनी बाजारातून त्यांचे फोटो आणून त्यांच्या कार्यालयात लावले आहेत हे पाहता, बहुतांश सर्व जन माहिती अधिका-यांचा कारवाईचा कल त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्त्रोत्राव्दारे शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे असल्याचे दिसून येते. या प्रकरणी शासनाच्या विविध विभागाकडून ग्रामस्तरावर देखील जन माहिती अधिकारी यांची आता नियुक्ती झाली असल्याने व प्रत्येक जन माहिती

अधिकारी त्यांच्या कार्यालयापुरता स्वतंत्रत: नेमला गेला असल्याने अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अलहिदा प्राप्त करुन घेणे गरजेचे होते, तथापि अपिलार्थीने ही कारवाई केलेली नाही. या जन माहिती अधिका-यांनी (ठाणे व नंदुरबार वगळता) अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याशी संबंधीत अशा सर्व संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचा सकारात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येते. याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या परिपत्रकांचे अवलोकन करता या शासनाने त्यांच्याकडील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिलेल्या सूचना असल्याचे दिसून येते. या सूचनांचे अनुपालन करण्यासाठी कोणताही कालावधी निश्चित केलेला दिसून येत नाही. महात्मा ज्योतिबा फुले व श्रीमती सावित्रीबाई फुले यांचे फोटो शासकीय कार्यालयात लावणे अशा अर्थाची कोणती विशिष्ट योजना असल्याचे यामध्ये दिसून येत नाही तसेच या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व उपकुलगुरु यांना या परिपत्रकामध्ये कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत त्यामुळे सर्व शासकीय कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व श्रीमती सावित्रीबाई फुले यांचे फोटो स्त्रोत्रांच्या उपलब्धतेप्रमाणे लावणे ही या सूचनांचे अंतीम अनुपालन होईपर्यंत सतत चालणारी प्रक्रिया आहे असे आयोगाचे मत आहे. याच कारणामुळे या जन माहिती अधिका-यांकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्यांनी मागणी केलेली माहिती सहजरित्या उपलब्ध असणे सहजासहजी शक्य नव्हते कारण अपिलार्थीने किती कार्यालयात फोटो लावलेले नाहीत अशा नकारात्मक स्वरुपात माहिती विचारली आहे याचा अर्थ प्रत्येक विभाग प्रमुखास त्यांच्या अधिपत्याखालील एकूण कार्यालयांची संख्या, त्यातील फोटो लावलेल्या कार्यालयांची संख्या ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यापूर्वी ज्ञात असणे हे ओघाने आलेच. म्हणजेच या परिपत्रकातील सूचनेच्या अनुपालनाचे संनियंत्रण (monitoring) करणे हे देखिल ओघाने त्यांना क्रमप्राप्त होते, तथापि वर नमूद केल्याप्रमाणे ही एक निश्चित योजना नव्हती, सूचनांच्या अनुपालनाचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी या परिपत्रकामध्ये कोणावरही निश्चित केलेली नाही. केवळ त्यांनी फोटो लावले नाहीत, लावलेले फोटो अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे

प्रमाणित स्वरुपात नाहीत म्हणून त्यांना दिलेली माहिती खोटी आहे हा अपिलार्थीचा युक्तिवाद अशा प्रकारे आयोगास मान्य नाही. या सर्व प्रकरणाशी संबंधीत कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे कोणाही जन माहिती अधिका-याने (ठाणे व नंदुरबार वगळता) अपिलार्थीस माहिती देण्यासाठी मुद्दामहून टाळाटाळ केल्याचे अथवा त्यांना असद्‌हेतूने माहिती देण्यासाठी टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी अपिलार्थीने याच माहितीसाठी त्यांनी यापूर्वी वेगळा अर्ज केला असता अपिलार्थीस ही माहिती पुरविली असल्याचे नमूद केले आहे. एकदा माहिती दिल्यानंतर तीच माहिती अपिलार्थीस परत देण्याची आवश्यकता नाही असे जन माहिती अधिकारी यांना वाटल्यावरुन त्यांनी या अर्जाव्दारे मागणी केलेली ही माहिती अपिलार्थीस दिली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही धारणा चुकीची असून अपिलार्थीने एकाच माहितीसाठी जरी कितीही वेळा अर्ज केले तरीही, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे शुल्क भरण्यासाठी तयार असेल तर ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास कोणतीच हरकत नव्हती. सबब जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची पार्श्वभूमी लक्षात घेता, सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमध्ये महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे फोटो लावण्याबाबत हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत शासन परिपत्रकाची पुनरुच्चार करुन आवश्यक त्या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना देणे सुसंगत राहील, असे आयोगाचे मत आहे. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांना, त्यांनी या प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी तसेच त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कलम २० (१) व २० (२) नुसार दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अशी तरतूद नसल्यामुळे अपिलार्थीचे अपील क्रमांक २१४९/०७ वगळता उर्वरित अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

अपील क्रमांक २१४९/०७ मधील अपिलार्थीच्या दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, हा एकच अर्ज त्यांनी जिल्हाधिकारी, नाशिक, पुणे, अमरावती, नागपूर व औरंगाबाद यांना उद्देशून केल्याचे दिसून येते तसेच या प्रकरणी त्यांनी त्यांच्या दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाची प्रत आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलासोबत जोडली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील प्रथम अपील हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केले नसल्याने, अपिलार्थीचे अपील क्रमांक २१४९/०७ खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०२५/०७, २०२६/०७, २०२७/०७, २०२८/०७, २०२९/०७, २०३०/०७, २०३१/०७, २०३२/०७, २०३३/०७, २०३४/०७, २०३५/०७ व २०३६/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक २१४९/०७ खारीज करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार व ठाणे यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. जिल्हाधिकारी, ठाणे यांना, त्यांनी या प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास, संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण तानका देवरे, अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ, ८५, नवी पेठ, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सं गा. यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा. प्र. वि.) जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा सरकारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, सर्वसाधारण संकीर्ण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, धुळे

१६ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१७ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१८ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१९ जन अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२० जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२१ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२२ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२३ जन अपिलीय अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२४ जन अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२५ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२६ जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२७ जिल्हाधिकारी, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९७

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ श्री. कु-हाडकर सुकेशराज सदाशिवराव, अपिलार्थी
श्री. क्लिनीक, गणपती चौक, बोलठाण,
तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना अंतीमतः दिनांक ०३-०३-२००७ रोजी माहिती प्राप्त झाली, ही माहिती देण्यासाठी

जन माहिती अधिकारी यांनी ९३ दिवस विलंब लावला त्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्या दिनांक २५-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एस. आर. परशुरामी, वैद्यकीय अधिकारी वर्ग-२, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेहेळगांव तालुका नांदगाव यांच्यासंदर्भात एकूण ३ मुद्यांव्दारे काही माहिती विचारली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून विचारलेल्या माहितीमध्ये, श्री. एस. आर. परशुरामी यांना बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसची छायांकीत प्रत, श्री. एस. आर. परशुरामी, वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ यांनी उपरोक्त नोटीशीला सादर केलेला खुलासा व नोटीशीसंदर्भात श्री. एस. आर. परशुरामी यांच्या वेतनासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव यांनी पाठविलेल्या ऑगस्ट २००४ च्या हजेरीपटाची माहिती, या मुद्दयांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पाठविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व ती अपूर्ण असल्याचे वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीसंदर्भातील निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविला किंवा कसे याची संबंधीत अभिलेख्यात कोणतीही नोंद नाही, तथापि सदर आदेश दिनांक ०३-०३-२००७ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांच्या व्दितीय अपील अर्जावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशाव्दारे अपिलार्थीस विनाविलंब ८ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २५-११-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस ज्या पत्राव्दारे प्राप्त झाली त्या दिनांक ३१-१२-२००६ रोजीच्या माहितीवर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील करतांना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती दिल्याचे कारण त्यांनी दर्शविले आहे, तथापि ही माहिती अपिलार्थीस अपूर्ण का वाटते किंवा ती माहिती अपूर्ण कशी आहे याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा परिषदेच्या उपस्थित प्रतिनिधीस यासंबंधी आयोगास कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन दाखविता आली नाहीत व आयोगाने विचारलेल्या प्रश्नांना कोणतीही समाधानकारक माहिती त्यांना देता आली नाही. मूळात या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना प्रत्यक्ष हजर राहण्यासाठी बोलाविले असता ते आज सुनावणीस विना परवानगी गैरहजर आहेत. त्यांच्या कार्यालयातील अत्यंत अकार्यक्षम कर्मचा-यांना त्यांनी आयोगासमोर सुनावणीसाठी पाठविले आहे. त्यांच्याकडे आयोगास आवश्यक असलेली कोणतीही कागदपत्रे केवळ २/३ पाने वगळता उपलब्ध नाहीत, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय केव्हा पारित केला हे देखील संबंधीत कर्मचारी आयोगास सांगू शकले नाहीत. यावरुन नाशिक जिल्हा परिषदेची माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणी विषयीची अनास्था दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-१२-२००६ नंतर माहिती पाठविली किंवा कसे हे देखील उपस्थित कर्मचारी आयोगास सांगू शकले नाहीत अथवा यासंदर्भात कोणतेही कागदपत्र आयोगास सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना ९३ दिवस इतक्या विलंबाने माहिती

पाठविल्याचे नमूद केले आहे. सदर ९३ दिवसांची गणती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून नोंदली आहे. त्यातील ३० दिवसांचा अनुज्ञेय कालावधी वगळता या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ६३ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाली, असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीस विहित तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव असल्याचे सिध्द करुन व पर्यायाने स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, उपरोक्त प्रकरण संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याकडून हे प्रकरण हाताळले गेले त्या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. (अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे)

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीस उपस्थित न राहता, विना परवानगी गैरहजर राहिले व आयोगाकडे सुनावणीसाठी माहिती अधिकार अधिनियमाचे कोणतेही ज्ञान नसलेले अत्यंत अकार्यक्षम कर्मचारी पाठविले. यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन / सचिव (सामान्य प्रशासन विभाग) यांना, असे सूचित करण्यात येते की, त्यांनी राज्यातील सर्व माहिती अधिकारी व अपिलीय अधिका-यांना आयोगाकडील सुनावणीस विना परवानगी गैरहजर न राहण्याच्या व अत्यावश्यक असेल तेव्हाच त्यांच्या प्रतिनिधींना सुनावणीसाठी पाठविण्याची व पाठविलेल्या प्रतिनिधींना प्रकरणाची संपूर्ण माहिती असल्याची खात्री करुन घेऊन मगच त्यांना पाठवावे, अशा प्रकारच्या सूचना निर्गमीत कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या विषयाशी संबंधीत कागदपत्रे हाताळणारे त्यांच्या कार्यालयातील व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कु-हाडकर सुकेशराव सदाशिवराज, श्री. क्लिनीक, गणपती चौक, बोलठाण, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (सामान्य प्रशासन विभाग) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९८

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ सौ. पुनम योगेश चौधरी, अपिलार्थी
व्दारा : श्री. भास्करराव काळे,
प्लॉट नं. १२ 'ओम' शंकरनगर, सैफ प्रोव्हीजन जवळ,
कासमवाडी रिक्षा स्टॉपजवळ,
जिल्हा पेठ, जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही मिळाली नसल्याचे नमूद करुन भ्रष्टाचार उघडकीस येण्याच्या भितीमुळे त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दाम टाळाटाळ केल्याचे नमूद करुन त्याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-१९९५ ते ३१-१२-२००६ या कालावधीशी संबंधीत एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक २९-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जळगांव जिल्हा परिषदेने या कालावधीमध्ये इतर मागासवर्गीयांची प्रत्येक जाहिरातीनुसार भरलेल्या स्वतंत्र पदांची संख्या, मुद्दा क्रमांक २ व्दारे या जागा निश्चित किती वर्षापासून जादा आहेत, जागा जादा होण्याची कारणे, जादा जागा होण्यास जबाबदार अधिका-याचे नांव व पद, दिनांक ३०-१२-२००६ रोजी किती पदे जादा आहे व जादा पदे कमी होऊन इतर मागासवर्गीयांची पदे जिल्हा परिषदेमध्ये कधी रिक्त होईल तो दिनांक - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे अपिलार्थीस कळवून माहिती तयार होताच ती अपिलार्थीस सत्वर देण्यात येईल असे त्यांना पुढे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३१-०५-२००७ रोजी आपले आदेश दिले. सदर आदेश दिनांक ०४-०५-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून निर्गमित झाल्याचे दिसून येते. या आदेशाव्दारे जन अपिलीय

अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना ४ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणातील प्रथम अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, त्यांनी हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून मिळविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना संबंधित अधीक्षकाकडून टाळाटाळाची उत्तरे देण्यात आली तदनंतर त्यांची हेटाळणी करण्यात आली. त्या स्वतः परभणी जिल्हा परिषदेमध्ये सह शिक्षिका या पदावर कार्यरत असून त्यांना जळगांव येथे बदली करुन घेण्याच्या दृष्टीने ही माहिती मिळाल्यास त्यांना यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करता येईल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असून, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याचे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांच्या कार्यालयामधील कर्मचा-यांचे त्यांना सहाय्य घ्यावे लागत होते. ते या पदावर दिनांक ३१-०५-२००८ पासून आले असून यापूर्वी श्री. पवार नावाचे शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०१-२००७ रोजी प्राप्त झालेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००७ रोजी, अधिनियमाव्दारे विहित मुदतीत दिलेला प्रथम प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा आहे. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने विलंब लागण्याची शक्यता नाकारता

येत नसल्याचे कळविले व माहिती तयार झाल्यावर त्यांना देता येईल असे कळविले. या आश्वासनानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती दिली. ही माहिती व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली कथित माहिती ही अपूर्ण आहे, कारण अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीमध्ये त्यांनी "उर्वरित वर्षातील जाहिरातीनुसार किती पदे भरलेली आहेत याची माहिती पूर्णपणे संकलीत होताच अलहिदा स्वतंत्रपणे पुरविण्याची दक्षता घेतली आहे" असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यांच्या या विधानावरुन अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती, अपूर्ण स्वरुपात मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील ५ उपमुद्दयांचे अवलोकन करता असे दिसून येते की, ज्यातील उपमुद्दा क्रमांक 'अ' ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली आहे व उप मुद्दा क्रमांक ड शी संबंधीत पुरविलेली माहिती चुकीची आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००६ रोजीची माहिती विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०८-०३-२००७ रोजीची माहिती पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस पुरविलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता दुरुस्त करणे भाग आहे. उर्वरित उपमुद्दयांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपमुद्दा क्रमांक 'ब' व्दारे "जागा जादा होण्याची कारणे" अशी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे तर उप मुद्दा क्रमांक 'इ' व्दारे इतर मागासवर्गीयांची पदे जळगांव जिल्हा परिषदेमध्ये कधी रिक्त होईल अशी भविष्यकाळातील माहिती विचारली आहे. उप मुद्दा क्रमांक 'क' व्दारे त्यांनी "जादा जागा होण्यास जबाबदार अधिका-याचे नांव व पद" ही माहिती विचारली आहे. मूळात जादा जागा भरण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत किंवा कसे याची निश्चिती जळगांव जिल्हा परिषदेने केली नसल्याने किंवा जादा जागा निर्माण होणे हा प्रकार एखादी

अनियमितता आहे किंवा कसे हे जिल्हा परिषद जळगांवने ठरविले नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देय ठरु शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अर्जदाराने विचारलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देणे अशा प्रकारची कारवाई या अधिनियमाव्दारे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाची अथवा त्यांच्या कोणत्याही कृतीची अर्जदाराने कारणे विचारणे व ती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा 'इ' चे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील माहिती मागितली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत नाही, कारण पद कधी रिक्त होईल हे कोणासही सांगता येणार नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होणार नाही. तथापि अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती सत्वर देण्यात येईल असे प्रथमतः आश्वासित केले व तदनंतर दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना उर्वरित माहिती स्वतंत्रपणे पुरविण्यासाठी दक्षता घेत असल्याचे म्हटले आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रानंतर त्यांनी अपिलार्थीस आजतागायत म्हणजे सुमारे दीड वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यावरही माहिती देण्यासाठी दक्षता घेतल्याचे व कोणताही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. आज सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ६० दिवसाच्या आत देणे शक्य होईल असे आयोगास सांगितले, तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी जी उपेक्षा केली आहे ती दुर्लक्षित करण्यासारखी खचितच नाही असे आयोगास वाटते. सध्याचे जन माहिती अधिकारी हे या पदावर रुजू होऊन ७ महिने

होऊनही अपिलार्थीस ही माहिती अद्यापपर्यंत मिळू शकली नाही हा माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचा पराभव आहे, असेच येथे खेदाने म्हणावेसे वाटते. यासाठी या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व संबंधीत कर्मचारी ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे सर्वजण एकत्रितपणे या प्रकरणी जबाबदार ठरत आहेत. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधीत सहाय्यक यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी मूळात आजपर्यंत झालेला विलंब असमर्थनीय आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ६० दिवसाच्या आत माहिती पुरविण्याची आयोगाकडे केलेली विनंती आयोग मान्य करीत नसून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ मधील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणा-या जन माहिती अधिकारी यांच्या सहाय्यकांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. पुनम योगेश चौधरी, व्दारा : श्री. भास्करराव काळे, प्लॉट नं. १२ 'ओम' शंकरनगर, सैफ प्रोव्हीजन जवळ, कासमवाडी रिक्षा स्टॉपजवळ,
जिल्हा पेठ, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९९

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ श्री. मोहनलाल मिन्होमल कुकरेजा, अपिलार्थी
विन्नीज् कलेक्शन, १२, गुरुकृपा बिल्डींग,
पुर्बाई राजेंद्र कॉम्प्लेक्स, नाशिक रोड - ४२२ १०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (अतिक्रमण),
नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा आयुक्त,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गुरुकृपा इमारत, शॉप क्रमांक १२, राजेंद्र कॉम्प्लेक्स, नाशिक रोड समोरील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी संबंधितांना अतिक्रमणे हटविण्याप्रीत्यर्थ दिलेल्या नोटीशीची प्रत, अतिक्रमणे हटवितांना सहाय्य घेण्यासाठी पोलीस आयुक्तांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पत्राची प्रत व मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अतिक्रमणे हटविण्याचे काम कोणत्या दिनांकापासून सुरु करणार आहेत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, पोलीस आयुक्तांना त्यांनी पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत त्यांच्या कार्यालयातील रेकॉर्ड विभागाकडे शासकीय शुल्क भरुन हस्तगत करण्याचे सूचित केले. सदर प्रतिसाद अपूर्ण असून तो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल झालेल्या अपील सुनावणीसंदर्भात त्यांनी दिलेल्या आदेशानंतर दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी दिनांक २६-०२-२००७ रोजी दाखल केलेल्या अपील अर्जावर, दिनांक ०२-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात त्यांचे दिनांक १५-०३-२००७ रोजीचे आदेश पारित झाल्यानंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळू शकली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांना पोलीस आयुक्तांच्या पत्राची प्रत प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले, तथापि संबंधीत अतिक्रमणधारकांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या नोटीशीच्या प्रती त्यांना अद्यापही प्राप्त झाल्या नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. त्यांनी आयोगास पुढे अशीही माहिती दिली की, आता त्यांनी संदर्भित केलेली

अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत. त्यांनी आयोगास अशी विनंती केली की, येथून पुढे या जागेवर अतिक्रमणे होणार नाहीत यासाठी आयोगाने जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या कारणाकरिता माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा आधार घेऊन त्यांच्याकडे माहिती मागितली होती ते अपिलार्थीचे काम आता झाले असून त्यांच्या दुकानासमोरील सर्व अतिक्रमणे आता मनपाने हटविली आहेत. अपिलार्थीने, त्यांना सूचित करुनही अपिलार्थीने सदर शुल्क भरले नाही, त्यामुळे ते त्यांना माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर व या अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश पारित केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिला. या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे त्यांना किती शुल्क व कोणत्या शीर्षाखाली भरावयाचे याची माहिती दिली नाही. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १-A संदर्भात त्यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. मूळात अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य देय ठरते. अपिलार्थीच्या दोन मुद्यांपैकी एका मुद्दयाची माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ - A शी संबंधीत माहिती अधिनियमतील कलम ७ (६)

नुसार विनामूल्य देय ठरते हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ - A शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास संबंधीत जागेवर यापुढे अतिक्रमण होणार नाहीत याची दक्षता महानगरपालिकेने घ्यावी अशा अर्थाचे आदेश देण्याची विनंती केली आहे, तथापि असे सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय बाबतीत हस्तक्षेप करणारे आदेश देण्याची अधिकारिता आयोगाला नसल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी जरी अपिलार्थीने पोलीस आयुक्तांचे पत्र त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले असले तरी ते पत्र जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कोणत्याही कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, त्यामुळे आता जन माहिती अधिका-यास या पत्राची प्रत देखील, थोडक्यात मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहनलाल मीनहोमल कुकरेजा, विन्नीस कलेक्शन, १२, गुरुकृपा बिल्डींग, पुर्बाई राजेंद्र कॉम्प्लेक्स, नाशिक रोड - ४२२ १०१.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक - ०२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१००

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ श्री. अब्दुल हमीद दुलारे, अपिलार्थी
रा. स. नं. ५४, घर नं. ६०, राहूलनगर, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०८-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी शिक्षण संचालक, पुणे यांच्या स्तरावर त्यांचे अपील चालविण्याची मागणी केली असता त्यांनी त्यांचा अपील अर्ज शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे पाठविला. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांना पूर्ण व समाधानकारक माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या अर्जावर कायदेशीर कारवाई केली नसल्याने त्यांच्यावरही दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांनी त्यांच्या दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे दिनांक ०१ जानेवारी २००६ ते ०७-०६-२००६ पर्यंत प्रशासनाधिकारी, अधिकारी व पदाधिकारी व कर्मचारी अशा किती लोकांच्या शासनातर्फे शिफारशीने प्रशासकीय बदल्या केल्या तसेच विनंतीने करण्यात आलेल्या बदल्याविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती एकूण सात मुद्दयांव्दारे मागितली होती.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत परंतु त्यांच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना राज्य स्तरावरील माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम उत्तर देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्याची एक प्रत शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे पाठविली. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची प्रत शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना दिनांक १३-०६-२००६ रोजी प्राप्त झाली व त्यानुसार त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००६ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविली. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षण संचालनालयाकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर देखील शिक्षण संचालनालयाने स्वतः कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचे सदर अपील त्यांच्याकडील नाशिक उप संचालकाकडे दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून दिले. तदनंतर शिक्षण उपसंचालकाने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १०-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण माहिती पुरविली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक ०७-०६-२००६ रोजीचा अर्ज मूळात शिक्षण संचालनालयातील माहिती अधिका-यांना उद्देशून केला होता, त्यामुळे अपिलार्थीस राज्यस्तरावरील संपूर्ण माहिती अपेक्षित असावी असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ हे दोन मुद्दे शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याचे दिसून येते. या मुद्दयावर शिक्षण उपसंचालक कार्यालयाने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे, मात्र उर्वरित पाच मुद्दयावर अपिलार्थीस शिक्षण उपसंचालकांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. या पाच मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती ही, अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस शिक्षण उपसंचालकाकडून देय होत नाही. आज रोजी सुनावणीस शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी किंवा चुकीची कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत. तथापि या प्रकरणी संपूर्ण कागदपत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, या प्रकरणी शिक्षण उपसंचालकांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्यावर असलेले, अपिलार्थीस माहिती देण्याचे उत्तरदायित्व, पूर्णपणे

व्यवस्थितपणे पार पाडलेले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण पाच मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत होते व उर्वरित दोन मुद्दे शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाशी संबंधीत होते. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे या प्रकरणी शिक्षण संचालनालयाने अपिलार्थीच्या या अर्जाची एक प्रत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते, तथापि त्यांनी असे न करता संपूर्ण माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून अपिलार्थीस घेण्याची सूचना दिली. त्यांची ही कृती सर्वथा गैर आहे. स्वतः शिक्षण संचालनालय व शिक्षण संचालक यांचे कार्यालय हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण असून त्यांनी आपल्या मुख्य कार्यालयाकरिता स्वतंत्र जन माहिती अधिका-यांची नेमणूक केलेली आहे हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ ते ५ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस शिक्षण संचालकांच्या जन माहिती अधिका-याकडून देय ठरते. अपिलार्थीने मूळ माहितीसाठी केलेला अर्ज व त्यांचे आयोगासमोर दाखल झालेले व्दितीय अपील यामध्ये व्यपगत झालेला कालावधी पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ ते ५ ची माहिती (मुद्दा क्रमांक ४ वगळून) जन माहिती अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी शिक्षण संचालनालयाने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची हाताळणी योग्य त-हेने न केल्याने व परिणामी अपिलार्थी त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय दीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ ते ५ शी संबंधीत (मुद्दा क्रमांक ४ वगळून) संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल हमीद दुलारे, रा. स. नं. ५४, घर नं. ६०, राहूलनगर, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०१

निर्णय दिनांक २२-१२-२००८

१ श्री. शांताराम नामदेव पवार, अपिलार्थी
रा. आडगांव, तालुका एरंडोल,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग,
एरंडोल, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा
विभाग, जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ

माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत उत्तर दिले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामीण पाणीपुरवठा स्वजलधारा योजनेंतर्गत आडगांव तांडा, तालुका एरंडोल जिल्हा जळगांव येथील ग्रामीण पाणीपुरवठ्याबाबत काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये, पाण्याच्या टाकीचे पाईपलाईन, इलेक्ट्रीक मोटार त्याचे इस्टीमेट, एम. बी., आतापर्यंत किती काम झाले व किती अपूर्ण आहे, झालेल्या कामाचे किती बील दिले, सदरच्या बिलाची रक्कम कोणत्या गावाच्या शाखेत जमा केली, सदर योजनेचे अध्यक्ष व सचिव कोण आहेत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना एका पत्राव्दारे देऊ केली असता, या माहितीमध्ये "एम. बी. इस्टीमेट मिळाली नाही म्हणून माहिती स्वीकारत नाही" असे अभिप्राय अपिलार्थीने त्यांच्या या पत्रावर नोंदविले व सदर पत्र जन माहिती अधिकारी यांना परत केले. या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, ही योजना संबंधीत गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने पार पाडली जाते. या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा समिती नेमली असून या समितीचे अध्यक्ष व सचिव हे दोघेही गावातील व्यक्ती आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची जबाबदारी केवळ तांत्रिक स्वरुपाची असून या योजनेवर तांत्रिक स्वरुपाची देखभाल करण्याचे काम त्यांच्याकडे दिले गेलेले आहे. या योजनेस तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत दिली जाते. या योजनेसाठी नकाशे व अंदाजपत्रके खाजगी अभियंत्यामार्फत करुन घेतली जातात व ह्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता यांच्याकडून तांत्रिक मान्यता दिली जाते. या कामासंदर्भात तयार होणा-या देयकाचे प्रदान संबंधीत समितीमार्फत केले जाते. अपिलार्थीने अपेक्षित केलेली

इस्टीमेटची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही, त्यांनी तांत्रिक मान्यता देऊन सदर प्रत संबंधीत गावाच्या समितीकडे पाठविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यांनी येथून पुढे अशा प्रकारच्या योजनांच्या तांत्रिक मान्यताच्या व अंदाजपत्रकाच्या प्रत त्यांच्याकडे ठेवणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. आजमितीस एम. बी. व इस्टीमेट हे ग्रामीण पाणीपुरवठा समिती कडेआहे, त्यामुळे अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून घ्यावी असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. या समितीवर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे नियंत्रण असल्याने अपिलार्थीस ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधीत पाणीपुरवठा समितीचे नियंत्रक या नात्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसाच्या आत पाठविणे गरजेचे होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई त्यांनी केली नाही हे पाहता, या प्रकरणी संबंधीत खाजगी अभियंत्यांनी ज्या परिमाणावर अद्यापपर्यंत देयके तयार केली आहेत त्या परिमाण पुस्तकाच्या प्रती (एम. बी.), अंदाजपत्रकाच्या प्रती उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांनी संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, एरंडोल यांच्याकडून प्राप्त करुन घ्याव्यात व त्या अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती एरंडोल यांनी या प्रकरणी उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा एरंडोल यांना सर्वतोपरी सहकार्य करुन त्यांना हे आदेश प्राप्त होताच २० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध होईल असे पहावे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती प्रथमतः नाकारली आहे, अपिलार्थी यांची ही कृती सर्वथा गैर असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती केवळ ती अर्धवट आहे असे समजून त्यांनी माहिती स्वीकारण्यास नकार दिला. त्यांना जरी ती माहिती सकृतदर्शनी अर्धवट वाटत असली तरी त्यावर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. त्यामुळे

जन माहिती अधिकारी यांच्याकडून देऊ करण्यात आलेली माहिती त्यांना स्विकारणे अनिर्वाय आहे अशी त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

आयोगाकडे ग्रामीण पाणीपुरवठा योजनासंदर्भात अनेक प्रकारचे तक्रार अर्ज प्राप्त होतात, त्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा समितीमध्ये एखाद्या शासकीय कर्मचा-याची नेमणूक करुन त्यांना यासंदर्भात माहिती अधिकारी व त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिका-यास जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्यासंदर्भात सचिव (पाणीपुरवठा) यांनी त्यांच्या पातळीवर योग्य तो विचार करुन आवश्यक त्या सूचना निर्गमीत कराव्यात असे येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. ग्रामीण पाणीपुरवठा समितीमध्ये एखाद्या शासकीय कर्मचा-याची नेमणूक करुन त्यांना यासंदर्भात माहिती अधिकारी व त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिका-यास जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्यासंदर्भात सचिव (पाणीपुरवठा) यांनी त्यांच्या पातळीवर योग्य तो विचार करुन आवश्यक त्या सूचना निर्गमीत कराव्यात.

औरंगाबाद
दिनांक २२-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शांताराम नामदेव पवार, रा. आडगांव, तालुका एरंडोल, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, एरंडोल, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, एरंडोल, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (पाणीपुरवठा) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१३
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. अनिल सावळाराम देशमुख, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासकीय अधिकारी
जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक अ.अ. व सहसंचालक, वाल्मी
प्रशासन विभाग,
जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः प्राध्यापक,
जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.३०.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"रु.८.९२ लाखा च्या गैर व्यवहाराच्या चुका कोणत्या कर्मचारी व अधिकाऱ्याने केल्या ? त्या अधिकाऱ्यास कोणत्या वरिष्ठ ऑफीसरने माफ केले ? त्या त्या अधिकाऱ्यांच्या नावासह मला माहिती देण्यात यावी ही सविनय विनंती"

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी १९८८ ते २००२ या कालावधीशी संबंधित होती. या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, "वाल्मी संस्थेच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या आर्थिक व्यवहारात रोख रकमेचा कुठलाही गैरव्यवहार झालेला नाही. वृत्त पत्रीय बातमी ही कुठल्याही गैर व्यवहाराचा पुरावा होऊ शकत नाही. भविष्य निर्वाह निधीचे सर्व व्यवहार हे धनादेशाद्वारे होत असल्यामुळे त्यात कुठल्याही प्रकारच्या रकमेचा गैरव्यवहार झालेला नाही." जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १६.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.९.२००७ रोजी निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १४.८.२००७

रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती योग्य व बरोबर असल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, "वाल्मी संस्थेचे अंशदान भविष्य निर्वाह निधी खाते व व्यवहार ऑगस्ट - २००१ मध्ये ऑक्टोबर-१९८३ च्या पुर्वलक्षी प्रभावाने सहाय्यक आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालय औरंगाबाद यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.(प्रत सादर) ऑक्टोबर-१९८३ पासून संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेल्या रकमेचा तपशील विहित नमुण्यात सहाय्यक आयुक्त भविष्य निधी कार्यालयाकडे पाठविण्यात येतो, त्या आधारे सहाय्यक अयुक्त यांच्याकडून तपासणी करुन संन १९८३-८४ ते २००६-०७ वर्षापर्यंतच्या अंतीम स्लीप कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. संस्थेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांनी त्यांच्या खात्यामध्ये असलेल्या रकमांनबाबत आजपर्यत कांहीही अक्षेप नोंदविलेला नाही.

तथापि संस्थेच्या सनदी लेखापाल यांनी सीपीएनएफ खात्यामध्ये तृटी निदर्शनास आणुन दिलेल्या होत्या. या तृटी अर्थिक व्यवहार अंतर्गत रोख रकमेच्या बाबत नव्हत्या तर केवळ रोख पुस्तके मधील घेण्यात आलेल्या नोंदी चुकीच्या आढळून आलेल्या होत्या. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रोख रकमेमध्ये कोणत्याही रकमा कमी/जास्त प्रमाणत जमा झालेल्या नव्हत्या. या तृटीस जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी संस्थे अंतर्गत करण्यात येत आहे. अंतीम कार्यवाही व निष्कर्षा अद्यापी प्रलंबीत आहे. या प्रकरणाचा व अर्जदाराने त्यां विरुध्द झालेल्या विभागीय चौकशीचा संबध लावणे संयुक्तिक व समर्थीनीय नाही"

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या वरील लेखी युक्तीवाद तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दि.१४.८.२००७

रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीसाठी कोणताही आधार नाही. जरी कार्यालयाची चुक झाली असेल, असे जरी गृहीत धरले, तरी या प्रकरणाची जोवर चौकशी होत नाही, तोवर या चुका कोणत्या कर्मचाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी केल्या, याचा निष्कर्ष बाहेर पडू शकत नाही. मूळात कोणावरही जबाबदारी निश्चित झालेली नसताना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना माफ करण्याचा देखील येथे प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचा पाया हा एका वर्तमानपत्रातील बातमीवर आधारित असा आहे व वर्तमानपत्रातील बातमी सत्य असल्याचे अपिलार्थीने गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. मूळात वर्तमानपत्रात छापून आलेली बातमीच चुकीच्या समजावर व निराधार असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्न संभवत नाही, असे त्यांच्या लेखी निवेदनावरुन समजून येते. मूळात अपिलार्थी यांची हव्या असलेल्या माहितीसंदर्भात काही प्रश्न अथवा शंका असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेखे तपासणी करण्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा, म्हणजे त्यांना आपल्या मनातील शंकांचे निरसन करता येईल अथवा याबाबत त्यांना पुढील कार्यवाही योजता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल सावळाराम देशमुख, ३२,एकदंत दर्गा रोड, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२०३७/२००७ व २०३८/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०३७ व २०३८
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. प्रदीप गुलाबराव पवार, : अपिलार्थी
रा.शिरपूर, जि. धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
उप अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम)
उपविभाग अक्कलकुवा जि. नंदूरबार
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उप अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम)
उपविभाग अक्कलकुवा जि. नंदूरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः कनिष्ठ अभियंता,
जिल्हा परिषद सा.बां. उपविभाग,
अक्कलकुवा, जि.नंदूरबार.

जन अपिलीय अधिकारीः उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग
अक्कलकुवा,जि.नंदूरबार

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०१.२००७ रोजी दाखल झालेल्या दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोन अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी दोन वेगवेगळया विषयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी मागितली आहे. या प्रकरणी पहिले अपील हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी केले असल्याने, या दोनही अपिलांची एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या दोन अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय यांच्याकडे दि. १६.१०.२००६ रोजी दोन्ही प्रकरणात प्रथम अपील केले असता त्यांनी प्रथमतः दि. १४.११.२००६ रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याचे सूचविले होते. परंतु त्या तारखेला ते हजर राहूनही त्यांना माहिती देण्यात आली नाही व त्यांना पुन्हा दि. २२.११.२००६ रोजी हजर राहण्याच्या सूचित करण्यात आहे. दि. २२.११.२००६ रोजी ठीक २.०० वाजता जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहिले असता, त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही अथवा कोणत्याही प्रकारचा खुलासा करण्यात आला नाही. तद्नंतर ते दि. ५.१२.२००६ रोजी याच दोन अर्जातील माहितीकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहिले असता, देखिल त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणतीही माहिती पुरविण्यासाठी कोणाचेही सहाय्य मिळाले नाही.अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ५.१२.२००६ रोजी हजर राहिल्याबद्दल जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिलेले पत्र व त्याच दिवशी त्यांच्या कार्यालयातील लिपीकाने दि. ५.१२.२००६ रोजी दिलेली पोच पाहता, अपिलार्थी हे

५.१२.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही, यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने दोन्ही द्वितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.८.२००६ रोजीच्या दोन अर्जांपैकी एका अर्जाद्वारे अक्कलकुवा तालुक्यातील जानेवारी,२००६ ते दि.२९.८.२००६ या कालावधीशी संबंधित संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत रस्त्याच्या कामाबाबत एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती, तर दुसऱ्या अर्जाद्वारे अक्कलकुवा तालुक्यातील जानेवारी,२००६ ते दि. २९.८.२००६ पर्यंत मौजे वडफळी ता.अक्कलकुवा जि.नंदूरबार येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या बांधकामासाठी प्राप्त अनुदानाचे व तदनुषंगीक खर्च व कामाबाबतच्या कागदपत्रांची एकूण ९ मुद्यांद्वारे माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केली होती. अपिलार्थीच्या दोन्ही अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही, तसेच उपस्थित जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता यांनी अपिलार्थीच्या या दोनही अर्जासंदर्भात त्यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याचे सांगितले. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणतेही कारण जन अपिलीय अधिकारी आयोगास सांगू शकले नाहीत. त्यांनी विचाराधीन प्रकरणाची नस्ती नंतर पाहिली असे आयोगास उत्तर दिले.

अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आजही आवश्यक आहे. तसेच त्यांनी  त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन ते दि. २२.११.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित होते. या घटनेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

अपिलार्थीने माहितीची मागणी ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती ते जन माहिती अधिकारी आज रोजी सुनावणीच्या वेळी गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी श्री. पी.के.शिरसाट (सध्या पंचायत समिती,नंदूरबार येथे कार्यरत ) हे अधिकारी कार्यरत होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता ते तयार करीत असून अपिलार्थीस ते ३० दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या दि. १६.१०.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेण्याची कारणे त्यांना विचारली असता त्यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयाच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. १५.११.२००६ रोजीच्या पत्राची स्थळप्रत दाखविली, या स्थळप्रतीवर तत्कालीन उपअभियंता यांनी असे अभिप्राय दिले आहेत की, अपिलार्थी हे दि. २२.११.२००६ रोजी त्यांना हजर राहण्याच्या सूचना देऊनही ते गैरहजर राहिले असल्याने सदर अपील निकाली काढण्यात येत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दोनही दि. २९.८.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरते.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याबद्दल या प्रकरणी सिध्द केले आहे. या उलट जन माहिती अधिकारी यांनी दोनही अर्जातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अद्यापही त्यांना पुरविली गेली नसल्याचे उपस्थित जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता यांनी आयोगास अवगत केले आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून आले नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यामध्ये फार अडचणी होत्या किंवा हे काम जिकीरीचे होते अथवा या कामासाठी माहिती यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. केवळ जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुर्दीविषयी असलेला अनादर व ईच्छाशक्तीचा अभाव हीच कारणे अपिलार्थीस माहिती न पुरविण्यामागे असावी, अशी आयोगाची खात्री झाली आहे. या अधिकाऱ्यांच्या मनात असो अथवा नसो माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झाली असल्याने व ते सार्वजनिक प्राधिकरणाचे नियमित कर्मचारी असल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमांच्या तरतुदीनुसार माहिती देण्याची जबाबदारी निश्चित केली असल्याने त्यांना माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम सात नुसार देण्याचा भाग आहे. तथापि त्यांनी आजतागायत म्हणजेच अंदाजे सव्वादोन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती न देणे ही बाब त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व बेपर्वा वृत्ती स्पष्ट केली, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास लागलेल्या या प्रदीर्घ विलंबाचे समर्थन उपस्थित उपभियंता आयोगासमोर करु शकले नाहीत किंवा या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकेल, असे आयोगास वाटत नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण २५,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा, विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास लावलेल्या विलंबास कोणत्याही समर्थन त्यांच्याकडे नाही, असे अनुमान काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,

अपिलार्थीने त्यांच्या मूळ दोनही अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत स्वतंत्रपणे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे दोनही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दोन्ही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती स्वतंत्रपणे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण २५,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रदीप गुलाबराव पवार,मानव आयोग कार्यालय, पोलीस स्टेशनच्या बाजूला, सिध्दार्थनगर, शिरपूर,ता.शिरपूर जि. धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,अक्कलकुवा जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०३९
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. दत्तात्रय कोंडाजी थेटे, : अपिलार्थी
रा.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहा. आयुक्त (कर),
उपआयुक्त कर यांचे कार्यालय,
महानगरपालिका, नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (कर),
महानगरपालिका, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: विभागीय अधिकारी,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.
जन अपिलीय अधिकारी: उपआयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दि. २०.१२.२००८ रोजीचे आयोगास उद्देशून दिलेले एक निवेदन आयोगासमोर सादर केले असून त्यामध्ये त्यांच्या दि. ५.१०.२००६ रोजीच्या द्वितीय अपील

अर्जावर नाशिक महानगरपालिकेने सर्व माहिती प्रदान केली असून त्यांचे समाधान झाले व त्यांची आता कोणतीही तक्रार राहिली नसल्यामुळे आयोगाकडील दि. २३.१२.२००८ रोजी सुनावणीस ठेवलेले अपील निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दि. ५.१०.२००६ रोजी नोंदविलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्यांचे निरसन झाल्याचे स्वतः कबूल केले आहे व आयोगास त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०३९ /०७,दि.५.१०.२००६ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय कोंडाजी थेटे,२, शितल 'अ' अपार्टमेंट राणेनगर, नाशिक-४२२ ००९.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४८
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. रमेश वालजी पानपाटील, : अपिलार्थी
रा. निकुंभे,पो.बुरझड, ता.जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपवनसंरक्षक, पश्चिम
धुळे वनविभाग,धुळे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
पश्चिम धुळे वनविभाग,
धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती विनामूल्य देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना द्यावेत व माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती

लावून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पाठीशी घातले असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकाराची योग्य जाणीवच नसावी म्हणून त्यांच्या या कृतीविरुध्द शासनाकडे अहवाल सादर करण्यात यावा व या प्रकरणी त्यांना नाहक खर्च करण्यास भाग पाडल्याबद्दल संबंधितांनी अपिलार्थीस रु.१५००/- इतकी नुकसानभरपाई द्यावी, आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.६.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील मजूरांच्या हजेरीपत्रकांबाबत सन १९९० ते १९९९ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"आपल्या कार्यालयाच्या पत्र क्र. ब/सवसं/माअ/९७ दि.२२/०६/२००६ अन्वये निर्गमित केलेल्या पत्रातील प्रपत्रात ज्या हजेरी पत्रकाच्या (प्रमाणकांच्या) आधारावर माहीती दिलेली आहे. त्या हजेरी पत्रकांच्या (प्रमाणकांच्या) झेरॉक्स प्रती तयार करुन त्यावर सत्यप्रतीचा दाखला देवून पुरवाव्यात ही विनंती "

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांची हजेरीपत्रके पाहण्यासाठी दि. १५.७.२००६ पर्यंत अपिलार्थीस मुदत वाढवून दिली व या मुदतीत हजेरीपत्रकाचे अवलोकन करण्यास वनक्षेत्रपाल धुळे यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. अपिलार्थीने लेखी स्वरुपात माहिती मागितली असता, अपिलार्थीस माहिती दाखविण्याचे प्रयोजन काय, असे जन माहिती अधिकारी यांना आज सुनावणीचे वेळी विचारले असता त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीस आता वाळवी लागली असून ही हजेरीपत्रके इतक्या जीर्ण अवस्थेत आहे की, त्यांची झेरॉक्स काढून घेणे शक्य नाही व

सदर हजेरीपत्रकाची ही जीर्णावस्था मा. उपलेखायुक्त यांनी देखील पाहिलेली आहे, असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १६.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्यसाबाबत त्यांच्याविरुध्द राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे दंडनीय कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करावा, अशी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केल्याचे दिसून येते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १५.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या हजेरीपत्रकाच्या प्रती सध्या अत्यंत जीर्णावस्थत असून त्यांना वाळवी लागली आहे. हजेरीपत्रकांना वाळवी लागल्याची खात्री उपलोकायुक्त यांनी देखील केली आहे. तसेच अपिलार्थी व इतर ६२ मजूरांचे, त्यांच्या सेवा नियमित करण्याचे प्रकरण सध्या शासनाकडे निर्णयास्तव प्रलंबित आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थी हे वन विभागात पूर्वी रोजंदारी मजूर म्हणून कार्यरत होते. अपिलार्थी त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या दि. २२.६.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिले

असून या पत्राच्या संदर्भात मा. उपलोकायुक्त, म.रा. यांच्यासमोर दि. १३.६.२००६ रोजी झालेल्या सुनावणीसंदर्भात आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या उपस्थितीबाबत सन १९८४ ते १९९९ या कालावधीतील उपस्थित दिवसांची माहिती दिली असून या माहितीबद्दल त्यांची काही हरकत असल्यास १५ दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना लेखी कळविण्याचे त्यांना सूचित केले आहे. अपिलार्थीच्या सेवा नियमित करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून सदर प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी विचाराधीन आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी उपलब्ध असली तरी, ती अत्यंत जीर्णावस्थेत आहे, याबाबत याच विषयावर आयोगाकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वाळवी लागलेले सदर हजेरीपत्रके आयोगास दाखविली आहेत. यावरुन या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती पुरविता येणे शक्य नाही, अशी आयोगाची खात्री झाली. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये आयोगास जन माहिती अधिकारी यांनी शास्ती लावण्याची विनंती केली आहे, अद्याप या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर नाकारल्याचे निश्चितपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची ही विनंती मान्य करता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पहाण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे कळविल्यानंतरही अपिलार्थी हे संबंधित कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.१५.९.२००६ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सर्व माहितीचा परामर्ष घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेचे पालन करुन संबंधित वनक्षेत्रपाल,धुळे

यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पहाणी करण्याशिवाय गत्यंतर नाही, ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहितीसाठी पुनश्च् संधी देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस पहाणीसाठी मूलतः उपलब्ध करुन दिलेली माहिती परत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व त्याप्रमाणे अपिलार्थीस लेखी कळवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलार्थीस पहाणीसाठी मूलतः उपलब्ध करुन दिलेली माहिती परत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश वालजी पानपाटील, मु.निकुंभे, पो.बुरझड ता.जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, धुळे वन विभाग,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,पश्चिम धुळे वनविभाग,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४९
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी, : अपिलार्थी
रा. धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नाही.

त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. १.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेतन पडताळणी पथकामार्फत दिल्या गेलेल्या वेतनासंदर्भात एकूण नऊ मुद्यांद्वारे काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाल्याप्रित्यर्थ संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित श्री.एम.झेड.बोरवले, कनिष्ठ लिपीकाची दि. ८.२.२००७ च्या पोचसही अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या या अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर उपलब्ध आहे.

आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १.१२.२००६ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब लागल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे शास्तीची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नव्हता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे प्रथम माहितीसाठीचा अर्ज पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला. अपिलार्थीने सादर केलेल्या पोचपावतीवरुन अपिलार्थीने दि.

५.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्र पाठविल्याचे दिसून येते, तथापि हे पत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाले नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्‍ आहे. त्यांच्या या विधानाप्रित्यर्थ त्यांनी आपल्या कार्यालयातील आवक नोंदवही त्यांच्यासोबत आणली आहे. परंतु मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे विचाराधीन पत्र प्राप्त झाले नाही, असे म्हणणे असल्यामुळे त्यांनी सोबत आणलेली आवक नोंदवहीची तपासणी आयोगाने केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी दि. १७.१२.२००८ रोजी संपूर्ण व सुसंगत माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जास त्यांच्या कार्यालयातील लिपीकाची सही असलेली प्रत दाखविली असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, संबंधित लिपीक यांना सहीबाबत विचारणा केली असता, संबंधित लिपीकाने ही सही केल्याचे आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे, अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे आता फक्त विलंबाचा प्रश्न निश्चित करण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.धुळे यांनी या प्रकरणात संपूर्ण चौकशी करुन आवश्यक वाटल्यास पोस्ट खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या साक्षी घेऊन जबाबदारी निश्चित करावी व आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येते. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी, ३५, आविष्कार कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५१
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
रा.बोदवड जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम),जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद सा.बां. उपविभाग,भुसावळ,
जि.जळगाव

जन अपिलीय अधिकारी: कार्यकारी अभियंता, बांधकाम
जिल्हा परिषद,जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०१.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता, जन अपिलीय अधिकारी व

कार्यकारी अभियंता यांना त्यांनी संपूर्ण सविस्तर माहिती दिलेली आहे परंतु प्रत्यक्षात रस्ता उपलब्ध नसून तो वाहतुकीसाठी बंद आहे. त्यामुळे सद्यस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे व दिलेली माहिती यामध्ये तफावत आहे. त्यांना कागदोपत्री उपलब्ध झालेली माहिती चुकीची,अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण, खरी आणि वस्तुस्थितीस धरुन माहिती देण्याची त्यांनी आयोगास विनंती करुन रस्त्यावर दाखविलेला खर्च कागदोपत्री दाखविला आहे, परंतु प्रत्यक्षात खर्चाप्रमाणे काम झाले नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २५.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९९८ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या अखत्यारीतील रस्त्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व रस्त्यांच्या नकाशासहीत माहिती, सदर रस्त्यावर १९९८-२००६ या कालावधीत कोणकोणती कामे केव्हा झाली आणि काम झालेला खर्च, काम कोणामार्फत व केव्हा पूर्ण झाले अथवा अपूर्ण झाले यामध्ये, या रस्त्यावर शासकीय पैशांचा भ्रष्टाचार झाला असल्यास,त्याबाबत दखल घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव,पत्ता आणि नियमानुसार पूर्ण काम झाले अथवा नाही, हे पहाण्याची जबाबदारी व कर्तव्य कोणाचे याची माहिती व त्या कर्तव्यात कसूर झाल्यास त्याची दखल घेणाऱ्या ऑफीस अधिकारी यांचे नाव, पोस्टाचा पत्ता ही माहिती व कार्यकारी अभियंता यांचे अधिकार व कर्तव्ये - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.११.२००६ रोजी प्रथम

अपील केले, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.११.२००६ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून यामध्ये असे म्हटले आहे की, "त्यांच्या प्रॉपर्टी समोरचा रस्ता प्र.जि.मार्ग १६ 'अ' म्हणून गाव शिवाराचे नकाशात दर्शविला आहे. सदर रस्ता कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीत व देखभाल दुरुस्तीसाठी आहे. सदर रस्ता ग्रामपंचायत बोदवड व जि.प.जळगाव, भुसावळ येथील अधिकाऱ्यांनी कर्तव्य वगळल्याने सदर रस्त्याचे अस्तित्त्व दिसून येत नाही,असे संबंधितांनी कबूल सुध्दा केले आहे, हे पाहता त्यांनी माहिती अर्जाप्रमाणे खरी माहिती द्यावी, अशी त्यांची अपेक्षा आहे. तसेच या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी ते सक्षम नसल्याने अथवा त्यांचे कर्तव्य वगळल्याने त्यांची योग्य ती दखल घ्यावी व माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली असून थातुरमातूर कागदपत्रांची पूर्तता केली आहे. त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये कोणा-कोणा मार्फत कोणकोणती कामे केव्हा पूर्ण झाली याची रस्त्याचे नकाशासह माहिती - ही माहिती मागितली होती. त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट आहे. प्रॉपर रस्त्याचा नकाशा नसताना कोणते काम कुठून कसे केले हा प्रश्न अनुत्तरीत राहतो, जिथे-जिथे काम झालेले आहे, त्याचा अधिकृत सही शिक्क्यानिशी अधिकृत रस्त्याचा नकाशा द्यावा".

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी त्यांच्या दि. २६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नकाशासह अपिलार्थीस पुरविली आहे. रस्त्याची माहिती

देताना सर्वसाधारणपणे जे नकाशे दिले जातात, अशाच नकाशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी हे वारंवार ज्या रस्त्याविषयीची माहिती मागत आहेत, तो रस्ता बोदवड गावातील हरिजन वस्तीस जोडणाऱ्या गावठाण हद्दीत असून या रस्त्यावर ग्रामपंचायतीची मालकी आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणे झाली असून ही अतिक्रमणे अपिलार्थीच्या मिळकतीस काही प्रमाणात बाधा पोहचवित आहेत. त्यामुळे अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी अर्ज करुन ही अतिक्रमणे काढण्यासाठी प्रयत्नशील असून एकाच विषयावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी वेगवेगळे अर्ज करुन त्यांच्या कार्यालयास वेठीस धरले आहे. प्रत्येक वेळेस अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती देऊनही, त्यांनी ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करतात व प्रत्येक वेळी या माहितीवर वेगवेगळी अपिले करीत असतात.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी सादर केलेले त्यांचे लेखी निवेदन, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या आजच्या लेखी युक्तिवादामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अर्धवट असल्याचे व रस्त्याचा नकाशा नसताना कोणते काम कुठून केले, हा प्रश्न अनुत्तरित राहतो, असे म्हटले आहे. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केलेले नकाशे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटी पुरविलेले नकाशे यामध्ये फरक असून सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कोणत्याही रस्त्याची माहिती देताना

ज्या पध्दतीने माहिती दिली जाते, त्या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. रस्त्याच्या देखभालीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रत्येक कामाची माहिती बार चार्टच्या (ABC चार्ट) स्वरुपात स्वतंत्रपणे उपलब्ध ठेवणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे अभिलेखे ठेवली आहेत किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले नाही. तथापि त्यांनी अशाप्रकारचे अभिलेखे ठेवले असल्यास त्याच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्यास अपिलार्थीस निश्चित कोठे काम झाले याची कल्पना येऊ शकेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्याद्वारे कार्यकारी अभियंता यांचे अधिकार व कर्तव्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. कार्यकारी अभियंता यांचे अधिकार व कर्तव्ये याची माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मॅन्युअलमध्ये दिलेली आहे, या मॅन्युअलमधील सदर पृष्ठाची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्र.१ मध्ये त्यांनी सर्व रस्त्यांचे नकाशासहीत प्रत द्यावी, अशी माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, 'नकाशाची प्रत' ही माहिती वगळता, अत्यंत मोघम स्वरुपाची माहिती आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्र.१ संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून रस्ते दर्शविणारा नकाशा देय ठरत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २६.१०.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सार्वजनिक बांधकाम खात्यातील मॅन्युअलवरुन द्यावी व मुद्दा क्र.३ च्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडील रस्त्याच्या बारचार्टच्या स्वरुपात उपलब्ध ठेवली असल्यास त्या बारचार्टच्या (ए.बी.सी. चार्ट) प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्यास ते

अपिलार्थीस योग्य ती माहिती प्राप्त होऊ शकेल, हे पाहता या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही असद्हेतुने टाळाटाळ केल्याचे आढळून न आल्याने त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जिल्हयाचा व तालुक्याचा नकाशा दिला असून या प्रकरणी रस्त्यावर काम झाले नाही म्हणून आयोगाने संपूर्ण विभागीय चौकशी करण्याची आयोगास विनंती केली आहे. या संदर्भात अपिलार्थीस असे अवगत करण्यात येते की, त्यांना या रस्त्याच्या कामासंदर्भात काही तक्रारी असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ अधिकारी अथवा सचिव(सार्वजनिक बांधकाम) विभाग,मुंबई यांच्याकडे अर्ज करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावावी.कारण त्यांनी अपेक्षिल्याप्रमाणे प्रशासकीय चौकशी करण्याची अधिकारिता आयोगास नाही.

माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांना ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर परत नव्याने माहिती तयार करुन अपिलार्थीस देण्याची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही.याची अपिलार्थीने नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.बोदवड मेनरोड,बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,भुसावळ जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५२
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
रा.बोदवड मेनरोड, जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम),जळगाव
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (बांधकाम)
जिल्हा परिषद,जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद सा.बां. उपविभाग,भुसावळ,
जि.जळगाव.
जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता, बांधकाम
जिल्हा परिषद,जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०१.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थी यांनी सदर अपील अर्जामध्ये, महाराष्ट्रातील अधिकृत नकाशात दाखविलेल्या व बोदवड गावातून जाणारा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१६ 'अ' यावर शासनाचे लाखो रु. खर्च झाले आहेत. परंतु प्रत्यक्षात रस्ताच उपलब्ध नसून वाहतुकीसाठी उपलब्ध नाही, सदर रस्त्यावर विविध नावाने कागदोपत्री रस्ते दाखवून खर्च केलेला आहे. तसेच या अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, बोदवड गावात जाणारा रस्ता भूमी अभिलेख यांचे नकाशाप्रमाणे वापरास उपलब्ध व्हावा. जिल्हा परिषद येथील अधिकारी हे सदर बाबतील उदासीन असून अकार्यक्षम असल्याचे जाणवते व त्यांच्या चुकीबाबत प्रत्यक्ष चौकशी करुन खरी व पूर्ण माहिती द्यावी व सदर रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध करावा द्यावा अशी विनंती केली आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्या दि.९.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे एकूण ४ मुद्याद्वारे प्रशासकीय विभागाशी संबंधित माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही रस्त्याचा उल्लेख नाही. या बाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या टप्प्यावर असे अवगत केले की, अपिलार्थीने दि. ९.१०.२००६ रोजी ग्राम विकास व जलसंधारण विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे माहितीसाठीच्या दोन वेगवेगळे अर्ज केले आहेत. आयोगाकडे तयांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील हे त्यांनी ग्राम विकास विभागाकडे केलेल्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा ग्राहय धरुन अपिलार्थीच्या सदर २०५२/२००७ या क्रमांकाच्या अपिलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दि. ९.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये ग्राम विकास व

जलसंधार विभागास उद्देशून केलेला अर्ज मंत्रालयीन विभागाकडून जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.११.२००६ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. अपिलार्थीने त्यांनी अर्जामध्ये एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली असून त्यातील पहिल्या मुद्याद्वारे - जिल्हा परिषद,जळगाव यांच्या अंतर्गत रस्त्याच्या कामात शासनाचा खर्च झाल्याचे दर्शविले आहे. तथापि सदर रस्ता अस्तित्त्वात नाही. त्यामुळे यातील भ्रष्टाचाराची चौकशी होऊन रस्ते बांधणे, सुव्यवस्थित ठेवण्यासाठी शासनाने अधिकार व कर्तव्ये ऑफीसची माहिती द्यावी - व दुसऱ्या मुद्याद्वारे - जिल्हा परिषद, जळगावच्या बांधकाम विभागावर सर्वोच्च नियंत्रण कोणाचे आहे व त्यात शासनाने प्रदान केलेले अधिकार व कर्तव्ये यांची माहिती- अशाप्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून दि. २४.११.२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय दि. ०८.०१.२००७ रोजी पारित केला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याने, निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवाद लेखी निवेदनाद्वारे आयोगास पाठविले असून त्यामध्ये - सदर रस्त्यावर जवळजवळ १ कोटी ३७ लाख रुपये कागदोपत्री खर्च केले आहे व सदर रस्त्यावर २०-२५ वर्षात काम झालेले सुध्दा नाही, असे नमूद करुन त्यांना माहिती अधिकार अधिनियमाद्वारे, खरी माहिती द्यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचे दि. ९.१०.२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. २२.११.२००६ रोजी प्रथमतः प्राप्त झाला व या अर्जाच्या

संदर्भाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित केलेल्या मुदतीत दि. २४.११.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे, त्यापैकी एका मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्ट उत्तरे दिली नाहीत व दुसऱ्या मुद्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याशी संबंधित जर नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज संबंधिताकडे हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे आवश्यक आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने या अर्जाद्वारे केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे असे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या पहिल्या मुद्यासंदर्भात स्पष्ट माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे.आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मागितलेली माहिती त्यांनी स्पष्टपणे द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे जिल्हा परिषदेवर सर्वोच्च नियंत्रण कोणाचे आहे व या संदर्भात संबंधितांना प्रदान केलेले अधिकार व कर्तव्य यांची माहिती विचारली होती. ही माहिती अर्थातच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,जळगाव यांना द्यावी लागेल, असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नाशिक यांनी करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड होते, अशातील बाब येथे संभवत नाही, याचप्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ८.१.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कोणती माहिती दिली याची तपासणी त्यांनी या अपिलवार निर्णय देताना केल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी येथून पुढे अशाप्रकारचे सदोष निर्णय देण्याचे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत कागदपत्रे दाखल करताना योग्य ती काळजी न घेता, त्यांच्या प्रथम अर्ज दाखल न करता त्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडील अर्ज जोडला व त्यांनी आज रोजी ज्या अर्जाच्या प्रित्यर्थ सादर केलेला लेखी युक्तिवाद आणि द्वितीय अपील अर्ज याचा अर्थाअर्थी कोणताही संबंध असल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी आपली अशाप्रकारची चुकीची कागदपत्रे दाखल करण्याच्या वृत्तीने आयोगाचे मनात गोंधळ निर्माण केल्याचे दिसून येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जळगाव यांनी मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत द्यावी.

४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.बोदवड मेनरोड,बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,भुसावळ जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,'बांधकाम भवन', त्र्यंबक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५३
निर्णय दिनांक २३-१२-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
रा.बोदवड मेनरोड, जि.जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम),जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद सा.बां. उपविभाग,भुसावळ,
जि.जळगाव.

जन अपिलीय अधिकारी: कार्यकारी अभियंता, बांधकाम
जिल्हा परिषद,जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०४.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर अनेक अपिलांची सुनावणी झाली आहे, तथापि त्यांचा अनुभव असा आहे की, ते कायदेशीर बाबींचा विचार न करता बेकायदेशीर बाबींचे समर्थन करतात व त्यानंतर संरक्षण देतात. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, सदर बाबीची विभागीय चौकशी करुन माहिती अर्जाप्रमाणे खरी व अचूक माहिती द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्या दि.७.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्र.जि.मा.१६/अ या रस्त्यावर झालेल्या खर्चासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. यामध्ये - प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१६'अ' हा रस्ता जिल्हा परिषदेकडे देखरेख व दुरुस्तीसाठी केव्हापासून आहे. सदर जागेच्या रुंदी, लांबी व रस्त्याच्या अधिकृत मूळ जागेचा नकाशा, सदर रस्त्याचे अस्तित्त्व केव्हापासून आहे व तो पूर्वी कोणत्या खात्याच्या अखत्यारीत होता याची नकाशासह व लांबी रुंदीसह माहिती, जि.प.कडे केव्हा,कोणत्या योजनेअंतर्गत वर्ग झाला व योजनेप्रमाणे कधी,केव्हा खर्च झाला, त्याची माहिती, बोदवड हरीजन वस्ती जोड रस्ता, ग्रामीण रुग्णालयाच्या बाजूने जाणारा रस्ता, प्र.जि.मा.१६'अ' व गट नं.१७४च्या लगत जाणारा रस्ता, त्याची लांबी,रुंदी व नकाशासह माहिती, हे ४ ही रस्ते कुठून कुठे कसे वाहतुकीसाठी उपलब्ध आहे, याची सर्व खरी,अचुक व पूर्ण माहिती, सदर चारही रस्ते बोदवड गावातून कोणत्या ठिकाणावरुन,कुठे व कसे जातात व त्याप्रमाणे ते वास्तविक स्थितीत आहेत काय, याची माहिती, तसेच कार्यकारी अभियंता यांचे कर्तव्य व अधिकाराप्रमाणे असावी, या रस्त्यावर जेव्हा जेव्हा बांधकाम झाले आहे, तेव्हाचा साईट प्लानचा नकाशा, जागेचा नकाशा, बांधकाम करणाराची नावे, क्षमता,ठेकेदाराचे नाव, त्यांना मंजूर केलेले निविदा-टेंडरची माहिती तारखेसह व काम पूर्ण झालेबाबतची माहिती,ही माहिती शासनास केव्हा,कोणी सादर केली,याबाबतची माहिती, सदर चारही रस्ते

वाहतुकीसाठी पूर्ण सुरक्षित आहे काय,सदर रस्त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी आणि अधीक्षक अभियंता यांची अधिकार व कर्तव्ये,याबाबत कायदेशीव व अचूक माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व जी माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही, ती माहिती संबंधितांकडून - जिल्हा परिषद बांधकाम भुसावळ, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,जळगाव व जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव यांच्याकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. या पत्राची एक प्रत त्यांनी उप अभियंता, उपविभाग,भुसावळ यांना अग्रेषित केले होते. या प्रकरणी उपअभियंता यांनी दि. ३.३.२००७ रोजी एकूण १० पत्रांचा संदर्भ देऊन अपिलार्थीस या संदर्भात उत्तर दिले की, "मुद्दा क्र.२,३ व ४ शी संबंधित माहिती आपणास यापूर्वीच देण्यात आलेली आहे, त्यामुळे सदर माहिती पुन्हा पुन्हा देणे संयुक्तिक नाही", जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.३.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर असल्याने व अपिलार्थीस यापूर्वीच माहिती पुरविली असल्याने, निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यांनी आयोगाकडे त्यांचा युक्तिवाद एका लेखी निवेदनाद्वारे आयोगाकडे सादर केला असून, त्यामध्ये त्यांनी ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली आहे, तो रस्ता अस्तित्त्वात नाही मात्र या रस्त्यावर शासनाचे १ कोटी ३७ लाख रुपये कागदोपत्री खर्च झाला व गेल्या २०-२५ वर्षात काहीही काम झालेले नाही. तसेच बोदवड ग्रामपंचायतीने केलेली काही अनियमितता त्यांनी या लेखी निवेदनामध्ये

नमूद केली असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेले व हाताने काढलेले नकाशे चुकीचे व दिशाभूल करणारे आहेत. त्यांना प्र.जि.मा.क्र.१६'अ' चा अधिकृत नकाशा हवा आहे. जन माहिती अधिकारी यांच्या माहिती पुरविण्यामध्ये हेतू स्वच्छ नाही व त्यांना अधिकृत नकाशा व खरी माहिती व वास्तविक माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे एकाच विषयाबाबत वारंवार एकाच प्रकारची माहिती मागवून त्यांच्या कार्यालयास नेहमी वेठीस धरत असतात. अपिलार्थी ज्या-ज्या वेळी माहितीची मागणी करीत असतात, त्या-त्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते त्यांच्या कार्यालयात तयार करुन पुरवितात, परंतु त्यांनी पुरविलेल्या माहितीने अपिलार्थीचे कधीही समाधान होत नाही व ते अपिलीय प्राधिकरणाकडे अपील करीत असतात. अपिलार्थी हे त्यांच्या स्वतःच्या खाजगी मिळकतीसमोरील अतिक्रमण काढून घेण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा वापर करीत आहेत. ते वेळोवेळी ज्या प्रकारची माहिती मागवित असतात ती माहिती त्यांच्या कल्पनेवर आधारित व 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत न बसणारी असते. अपिलार्थी हे वारंवार त्यांच्या कार्यालयात माहितीची मागणी करुन त्यांच्या कार्यालयीन कामामध्ये अडथळे निर्माण करीत आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री त्यांना प्रमाणाबाहेर वळवावी लागते. अपिलार्थीने त्यांच्यावर केलेले आरोप निराधार असून ते अपिलार्थीस प्र.जि.मा.१६'अ' वर ज्या ठिकाणी काम झाले आहे, ते काम दाखविण्यास तयार आहेत. वेळोवेळी रस्त्याची पहाणी करण्यासाठी त्यांना बोलावण्यात आले असता, अपिलार्थी हे रस्त्याची पहाणी करण्यासाठी कधीही उपस्थित राहत नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांचा लेखी युक्तिवाद, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी

आयोगाच्या असे लक्षात आले आहे की,अपिलार्थी हे एकाच रस्त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी माहिती मागवितात व राज्य माहिती आयोगाकडे देखिल एकाच प्रकारच्या माहितीसाठी वेगवेगळी अपिले करीत असतात.

अपिलार्थी यांच्या विचाराधीन अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना स्पष्टपणे उत्तरे न देता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पूर्वीच दिली असल्याचे व उपअभियंता यांनी त्यांना, त्यांनी यापूर्वी पाठविलेल्या सर्व पत्राचे संदर्भ दिले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपअभियंता यांनी संदर्भित केलेल्या पत्रांमध्ये खरोखरीच आहे किंवा कसे हे संबंधित कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास तपासता येणार नाही.अपिलार्थी हे वेळोवेळी एकाचप्रकारच्या माहितीची मागणी करित असल्याचे दिसून आले तरी, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.१.२००७ व १४.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती आयोगास मान्य नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) जळगाव यांनी कोणाचीही परवानगी न घेता, रस्त्यावर ग्रामीण रुग्णालय बांधून रस्त्याचे अस्तित्त्वच संपवून टाकले आहे. प्र.जि.मा.वर अनधिकृत बांधकाम करुन रस्ता बंद केलेला आहे. व सदर रस्त्यावर १९७६ ते १९८० चे दरम्यान काम रस्त्यावर काम झाल्याचे कबूल केले आहे, मात्र १ कोटी ३७ लक्ष रकमेचे सन १९९५ ते २००६ पावेतो कागदोपत्री झालेले आहे, प्रत्यक्षात रस्त्याचे काम झालेले नाही, परंतु खर्च मात्र केला आहे, अशा अर्थाची तक्रार करुन रस्त्याच्या जागेचा अधिकृत नकाशा मिळण्याची व माहिती अर्जाप्रमाणे मागितलेली खरी माहिती तपासून खात्री करुन घेण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, या संदर्भात त्यांच्या ज्या काही तक्रारी आहेत, त्या तक्रारींचे निराकरण त्यांनी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई अथवा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नाशिक यांच्याकडून करुन

घ्यावे. जागेच्या अधिकृत नकाशाबाबत अपिलार्थीस असे अवगत करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस ती देण्यासंदर्भात निर्णय घेण्याचा आहे. / (त्याच स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस ती देण्यासंदर्भात निर्णय घेणे अभिप्रेत आहे. ) सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या रस्त्याचे जे अधिकृत नकाशे उपलब्ध आहेत, ते त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पुरवावेत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ मधील अंशतः व मुद्दा क्र.४ शी संबंधित पूर्ण माहिती अपिलार्थीस देय नाही कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. अपिलार्थीच्या या प्रकरणात, त्यांनी जन माहिती अधिकारी व इतर कार्यालयातील अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहारावरुन अपिलार्थीस बोदवड गावठाणातील --रस्त्याच्या मूळ आखणी संदर्भातील नकाशा हवा असल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली आहे, त्या रस्त्याची मोजणी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून करुन घेतली तर, अपिलार्थीचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल, या सूचनेचा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगाव यांनी त्यांच्या पातळीवर कार्यवाही करण्याचा विचार करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती (मुद्दा क्र. ३ अंशतः व ४ वगळता) हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.बोदवड मेनरोड,बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,भुसावळ जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५५

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ श्री. इस्तियाक यासिन पटेल, अपिलार्थी
४, समराई अपार्टमेंट, हिरवे नगर, वडाळा रोड,
नागजी हॉस्पिटल पुढे, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपसंचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय
शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३,
महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ माहिती लपवून माहिती देण्याचे नाकारले आहे व त्यांनी ज्या गोषवारा स्वरुपात माहिती मागितली आहे तशाच प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे परंतु ती उपलब्ध झाल्यास बदल्यांमधील गोंधळ व गौडबंगाल सहज लक्षात येत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्याचे टाळले असल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे रुपये १०७९ इतकी फी भरुनही मागणी केलेली माहिती न देता अपुरी व चुकीची माहिती दिली. मागणी केलेली माहिती परिपूर्ण देत नसतांना त्यांना नाहक भुर्दंड देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना शुल्क भरण्यास सांगितले, त्यांचे आर्थिक नुकसान करण्याच्या दृष्टीने चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांसह माहिती न मागताही चुकीची माहिती त्यांना पाठविली असे नमूद करुन त्यांना उशिराने माहिती दिल्याने फी स्वीकारणे गैरवाजवी असल्याने ती त्यांना परत मिळावी, अशी त्यांनी आयोगास अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सन २००३ व २००६ मधील कार्यरत असलेल्या सर्व आस्थापनांतील कर्मचा-यांचा तपशील, प्रशासकीय व विनंती बदल्यासंदर्भातील माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. यापैकी पहिल्या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागितली आहे, मुद्दा क्रमांक २ व्दारे विनंती अर्जांचा विचार कोणत्या प्रकारे केला जातो व मुद्दा क्रमांक ३ व्दारे सन २००३ ते २००६ या कालावधीत किती कर्मचा-यांच्या बदल्या होऊन पुन्हा ते विनंती बदली ठिकाणी हजर राहिले अशी माहिती एका

विशिष्ट प्रपत्रात मागितली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक २९-११-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आवक नोंदवहीमध्ये २१७७१ या क्रमांकाने नोंदविला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०७९ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्याच्या कार्यालयात केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०१-२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रतिसाद दिला. त्यांच्या या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या अपिलातील प्रत्येक मुद्दयांचा ऊहापोह करुन अंतीमत: अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ व ३ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती एका विशिष्ट प्रपत्रात मागितली होती. तर मुद्दा क्रमांक २ व्दारे विनंती बदली अर्जाचा विचार कोणत्या प्रकारे केला जातो, ही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या प्रपत्रामध्ये माहितीची मागणी केली आहे त्या प्रपत्रामध्ये त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही, मात्र वरिष्ठ कार्यालयाकडे कर्मचा-यांच्या बदल्यांचे प्रस्ताव पाठवितांना त्यांच्या कार्यालयात केलेल्या

प्रपत्रामध्ये ही माहिती संकलीत केली जाते व यामध्ये अपिलार्थीच्या प्रपत्रातील मुद्दयांचा समावेश आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती तयार करण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागण्याची शक्यता होती, तसेच मुख्य माहिती आयुक्तांकडील श्री. हरीदास भिकाजी वाघाडे विरुध्द कुलसचिव डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांच्या अपील क्रमांक २००६/१२/०२ माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दिलेल्या निर्णयानुसार त्यांनी ही माहिती अपिलार्थीस वेगळ्याने तयार करुन दिली नाही. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दुस-या प्रप्रत्रामध्ये, ज्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील प्रपत्रातील बहुतांश मुद्दयांवरील माहीती उपलब्ध होती, त्या माहितीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देण्यास हरकत नव्हती. आज रोजी त्यांनी ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा, अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपेक्षित असलेला संपूर्ण तपशील उदा. संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर हे अपिलार्थीस कळविले नसल्याने त्यांच्या दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला असल्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस या माहितीपोटी घेतलेले शुल्क त्यांना परत करावे लागेल. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले एकूण शुल्क रुपये १०७९ त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत परत करावे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आयोगाचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीकडून या प्रकरणी माहिती देण्यापोटीचे जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले शुल्क रुपये १०७९ हे अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे.

औरंगाबाद

दिनांक २४-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. इस्तियाक यासिन पटेल, ४, समराई अपार्टमेंट, हिरवे नगर, वडाळा रोड, नागजी हॉस्पिटल पुढे, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## .राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५६

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ श्री. विशाल अशोक मोरे, अपिलार्थी

आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं. मनमाड,

तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी

बी. एड कॉलेज शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे

२ जन अपिलीय अधिकारी

तथा प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिवळे,

तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे

जन अपिलीय अधिकारी : सचिव, जनसेवा शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व अर्धवट माहिती दिली आहे. चुकीची माहिती मिळाल्याने त्यांनी अपील केल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर देण्यात आले नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने दडवून ठेवण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्यावर रुपये २५००० इतकी दंडाची कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्या बी. एड कॉलेजमध्ये सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षामध्ये धर्मेंद्र आत्माराम वेताळ, रोल नं. ५१ यांनी बी. एड साठी प्रवेश घेतला होता त्यावेळी त्यांनी ८५०० रुपये रक्कम मुंबई विद्यापीठात भरली होती. शासनाच्या शिक्षण विभागाच्या दिनांक १९ ऑगस्ट १९९५ च्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना सर्व स्तरावर निशुल्क शिक्षण देण्याबाबत निर्णय झाला असून श्री. धर्मेंद्र आत्माराम वेताळ यांची फी परत का पाठविण्यात आली नाही, फी अडविण्याचे कारण काय आहे याची तपशीलवार व मुद्दा क्रमांक २ व्दारे १९९८ ते २००० या कालावधीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या किती पाल्यांना फी परत मिळाली याबाबतची माहिती मागितली होती. या माहितीमध्ये त्यांनी फी परत दिली गेली नसेल तर का दिली नाही, याही मुद्दयाचा समावेश या माहितीमध्ये होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, "श्री. वेताळ धर्मेंद आत्माराम या विद्यार्थ्याने आमच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शै. वर्ष १९९८/९९ मध्ये प्रवेश घेतला होता. प्रवेशानंतर सदर विद्यार्थ्याचा माध्यमिक शिक्षक पाल्य म्हणून

फॉर्म भरुन घेऊन जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आलेला होता. सदर विद्यार्थ्याने जि. प. ठाणे यांच्याकडे दोन तीन वेळा फे-या मारल्या आहेत. तसेच आम्ही सुध्दा वारंवार विचारपूस करीत असतो. परंतू सदर शिष्यवृत्ती अद्याप मंजूर झालेली नसून मंजूर झाल्या-नंतर सदर विद्यार्थ्याला घरच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करण्यात येईल." जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात व अपील अर्जासंदर्भात त्यांनी संस्थेचे तत्कालीन प्राचार्य श्री. निंबाळकर यांना दूरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन तुम्हाला पूर्ण माहिती दिली, तुम्हाला जे काय करावयाचे असेल ते करुन घ्या, असे उत्तर दिले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे कॉलेज हे विनाअनुदानित कॉलेज आहे. बी. एड अभ्यासक्रमासाठी मुंबई विद्यापिठाने आयोजित केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दतीव्दारे प्रवेश दिला जातो. त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांकडून मुंबई विद्यापीठ रुपये ८५०० इतके शुल्क वसूल करुन घेत असते. तदनंतर ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते अथवा ज्यांची फी माफ करण्यात येते अशा विद्याथ्यांनी भरलेल्या रकमा त्यांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून महाविद्यालयास परत केल्या जातात व ही रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती संबंधितांना महाविद्यालयाकडून परत करण्यात येते. श्री. वेताळ यांच्या बाबतीत त्यांनी ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या कार्यालयाशी पत्रव्यवहार केला असून त्यांना शासनाकडून या प्रकरणी अनुदान प्राप्त झाल्यानंतर श्री. वेताळ यांना फी परत करण्याची कारवाई करण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद चुकीचा आहे. कारण अपिलार्थीने त्यांच्या फी परताव्यासंदर्भात माहिती मागितली असता त्यांना शिष्यवृत्तीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे, तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही स्वरुपात पुरविली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००७ रोजी पुरविलेली माहिती ही अपूर्ण व चुकीची ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेण्याचे व यासंदर्भात पत्रव्यवहार करण्याचे देखील सौजन्य दाखविले नाही. यावरुन या शिक्षण संस्थेच्या मनामध्ये माहिती अधिकार अधिनियमाविषयी किती अनादर आहे, याची सहज कल्पना येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने या अर्जातील अंशतः मुद्दा क्रमांक १ पूर्णतः व मुद्दा क्रमांक २ व्दारे जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारली असल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः माहिती अपिलार्थीस देय होत नाही कारण, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ मधील व मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः माहिती सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहिती मागितल्यास ती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय देणे व एकदा माहिती देण्याचा निर्णय झाला की, त्यांच्याकडे माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ पूर्ण व मुद्दा क्रमांक २ ची अंशतः माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, मात्र अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ व्दारे विचारलेली, १९९८ ते २००० या

कालावधीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या किती पाल्यांना फी परत मिळाली ही माहिती, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने देय ठरत आहे. ती माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास जन माहिती अधिकारी यांना आज रोजी आदेशित केले आहे. अपिलार्थीने संबंधीत कॉलेजकडे माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. निबांळकर नावाचे प्राध्यापक माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते ते आज रोजी सुनावणीस हजर नाहीत. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या ३० दिवसात त्यांचा कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विशाल अशोक मोरे, आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं. मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, जनसेवा शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५७

निर्णय दिनांक २४-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. संगिता दिलीप जाधव,<br>अगस्तीनगर, कॉलेज रोड, निफाड, तालुका निफाड,<br>जिल्हा नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक<br>बालविकास सेवा योजना कार्यालय, निफाड,<br>तालुका निफाड, जिल्हा नाशिक | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नाशिक | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार उप लोकआयुक्तांकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्ज उप लोकआयुक्त यांच्या कार्यालयातून राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे कधी आला हे या अपील अर्जावरुन, कोणताही शिक्का नसल्याने, आयोगास माहिती होऊ शकत नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-०३-२००७ रोजीच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, निफाड यांनी खोटी व अपूर्ण माहिती दिल्याने अपील केले होते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील निफाड केंद्राच्या अंगणवाडी सेविका पदासाठी दिनांक ३०-०६-२००६ रोजी घेतलेल्या मुलाखतीसंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मुलाखतीस हजर असलेल्या उमेदवारांचे हजेरीपत्रक, निवड प्रक्रियेचे इतिवृत्त, पात्र उमेदवारांचे निवड गुणतक्ते व दारिद्र्यरेषेखालील उमेदवारांची संख्या, महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०९-०२-२००५, दिनांक २८-१२-२००५ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडील पत्र क्रमांक ९३८, दिनांक १२-०९-२००६ च्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जामध्ये त्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी विषद केली. त्यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थी यांनी अंगणवाडी सेविका पदासाठी जिल्हा परिषद, नाशिक येथे अर्ज केला असता त्यांना तोंडी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते, तथापि तोंडी मुलाखतीस त्या गैरहजर होत्या व त्याप्रमाणे त्यांच्या गैरहजेरीचा मुलाखतीच्या अहवालामध्ये उल्लेख करण्यात आला, तथापि तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर या अहवालामध्ये खाडाखोड करुन हा अहवाल बदलून जिल्हा स्तरावर दुसरा अहवाल दिला आहे, यामध्ये अपिलार्थी ह्या मुलाखतीस हजर असल्याचे दाखविले. तदनंतर अपिलार्थी यांना नियुक्ती आदेश देण्यात आले, तथापि या प्रकरणी काही तक्रारी संबंधित प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर चौकशी करण्यात आली असून तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांना या प्रकरणी दोषी ठरविण्यात आले असून त्यांच्यावर विभागीय चौकशीची कारवाई चालू करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याविरुध्द न्यायालयात दावा देखील दाखल केला आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती (त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात) अपिलार्थीस पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थी यांनी त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील गुणपत्रके खोटी असल्याचे म्हटल्याने याबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी, ए. बा. वि. से. यो. प्रकल्प निफाड यांचे म्हणणे मागविले. जन अपिलीय अधिकारी यांना तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांच्याकडून त्यांचे म्हणणे न कळविल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी झाली नाही.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडे ज्या स्वरुपात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे, तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी आहे. ही माहिती खरी आहे किंवा कसे याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची कोणतीही सुनावणी घेतली नाही. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजी पुरविलेली माहिती खोटी आहे किंवा कसे याबाबतचा निवाडा न्यायालयामध्ये होईलच त्यामुळे अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या सत्यासत्यतेबाबत आयोगाचे कोणतेही भाष्य नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस दिली असल्याने अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आयोगाने वेगळा विचार करण्याचे कारण दिसून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे उपलब्ध करुन दिलेली माहिती खोटी कशी आहे याचे समर्थन करण्यासाठी आज आयोगासमोर अपिलार्थी या उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संगिता दिलीप जाधव, अगस्तीनगर, कॉलेज रोड, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५८

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ सौ. संगिता दिलीप जाधव, अपिलार्थी
अगस्तीनगर, कॉलेज रोड, निफाड, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक
बालविकास सेवा योजना कार्यालय, निफाड,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बालकल्याण),
जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार उप लोकआयुक्तांकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूपुरस्सर माहिती देण्यास टाळाटाळ करुन माहिती देण्यासाठी कोठलीही कार्यवाही केली नाही, माहिती उशिरा मिळाल्याने त्यांच्या आयुष्याचे अपरिमीत नुकसान झाले व जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील कार्यवाहीचा कोणताही अहवाल त्यांना प्राप्त झालेला नाही. संबंधीत दोन्ही अधिका-यांनी संगनमत करुन त्यांच्यावर अन्याय केला असल्याने तो उघड होऊ नये म्हणून ते एकमेकास पाठीशी घालत आहेत, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००६ रोजी घेतलेल्या निफाड गावाच्या अंगणवाडी सेविकेच्या मुलाखतीबाबत एकूण तीन मुद्दयांव्दारे काही माहिती मागविली होती. यातील एक मुद्दा त्रयस्थ पक्ष सौ. सुनंदा आहेर यांच्याशी संबंधीत होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती दिली व तदनंतर दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाची माहिती वगळून उर्वरित माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दिनांक २३-०२-२००७ रोजी पारित केला व जन माहिती अधिकारी यांना त्रयस्थ पक्षाची माहिती अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय सुनावणीमध्ये जाहीर केला असून अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या पत्राच्या प्रतीवर दिलेल्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पोच सहीवरुन दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक

२३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे एकूण १४ पृष्ठांची माहिती दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ३ टप्प्यात माहिती पुरविली गेली असून त्यांनी प्रथमतः दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत व तदनंतर दिनांक २२-०१-२००७ रोजी त्रयस्थ पक्षाच्या माहितीशिवाय उर्वरित माहिती अपिलार्थीस दिली व दिनांक २६-०२-२००७ रोजी त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०१-२००७ रोजी व दिनांक २६-०२-२००७ रोजीची माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडील संबंधीत दिनांकाच्या पत्रावर पोच सही देखील दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त झाला नसल्याचे म्हटले आहे, तथापि उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची सुनावणी घेतांना अपिलार्थी ह्या उपस्थित होत्या व त्यांच्या समक्ष जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय अपिलार्थीस ऐकविला. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय लिखित स्वरुपात कळविला असल्याचा कोणता पुरावा आहे काय, असे त्यांना आयोगाने विचारले असता जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपील निर्णय अपिलार्थीस कळविल्यापृष्ठ्यर्थ त्या कोणतीही कागदपत्रे आयोगास दाखवू शकल्या नाहीत, त्यामुळे त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या सुनावणीसंदर्भात दिलेल्या आदेशाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी. अपिलार्थीने केलेल्या व्दितीय अपील अर्जातील इतर मुद्दयांचे समर्थन करण्यासाठी त्या आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता मिळाली आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही टप्प्यावर टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही,

मात्र जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याचे त्यांचे म्हणणे या प्रकरणी सिध्द होत असून त्यांचे उर्वरित मुद्दे सिध्द होत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक २३-०२-२००७ रोजी घेतलेल्या निर्णयाची प्रत त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड टपालाने पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक २४-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संगिता दिलीप जाधव, अगस्तीनगर, कॉलेज रोड, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५९

निर्णय दिनांक २४-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. पोपट चिमणा पवार,<br>हायवे नं. ३१९ कळवण रोड,<br>मु. पो. बोरगांव तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, सुरगाणा, तालुका<br>सुरगाणा, जिल्हा नाशिक | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कळवण,<br>जिल्हा नाशिक | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी हे त्यांना सविस्तर माहिती देत नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००१ ते २००६ या कालावधीतील "शेतक-यांच्या विकासासाठी व दुर्गम भागाच्या विकासासाठी शासनाची आलेली ग्रॅड नोंदवहीसाठी शासनाने दिलेल्या रजिस्टरवरील सत्यप्रतींचा तपशील" या विषयावरील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" शेततळय, सपाटीकरण (मजगीकाम), दगडीबांध, सीमेटीबाध फळबागरोपवाटप, जिवन अमृत सीमेटटाकी, बियाने, किटकनाशक औषध, फळबागरोप व धान्य कुपन हे शेतक-यांना देण्यात आले की व्यापा-यांना ? उदारआर्थ मसालाईनीट, रसवतीगृह हे तालुक्यात किती लोकांना देण्यात आले. प्रत्यक्षात त्याकडे त्या साधेन आहेत का ?"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे सदर अपील माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपेक्षित असलेल्या प्रपत्रात नाही, व विहित प्रपत्रामध्ये जो तपशील सर्वसाधारणपणे अर्जदाराकडून अपेक्षिलेला आहे तो तपशील देखील या अपील अर्जामध्ये त्यांनी पुरविलेला नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जास संदर्भिय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला अपील अर्ज विहित नमुन्यात नसल्याने त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम व प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे त्याचा त्यांच्या मूळ अर्जाव्दारे बोध होत नाही. जन

अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज हा साध्या कागदावर केला असून त्यावर २० रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प डकविण्यात आलेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या विधानास अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या कथित प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन पुष्टी मिळते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडे सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमध्ये ज्या योजना कार्यान्वित होत्या त्यांची माहिती, अपिलार्थीस दिली आहे, हे पाहता व मूळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील ज्या प्रथम अपील अर्जाच्या निर्णयासंदर्भात केले आहे तो प्रथम अपील अर्ज, त्यांनी त्या अर्जाला २० रुपये इतके कोर्ट फी स्टॅम्प डकविले नसल्याने, अवैध ठरत आहे. अपिलार्थीच्या अवैध प्रथम अपील अर्जावर त्यांनी केलेल्या व्दितीय अपिलाची राज्य माहिती आयोगाने सुनावणी घेणे आयोगास इष्ट वाटत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अत्यंत मोघम स्वरुप ही सर्व वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पोपट चिमणा पवार, हायवे नं. ३१९ कळवण रोड, मु. पो. बोरगांव तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सुरगाणा, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०६१

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार, १२६, अपिलार्थी
इस्लामपुरा, लल्ले दुध डेअरी जवळ, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारे उत्तर देऊन माहिती दडविण्याचा प्रयत्न केला, जुजबी किरकोळ कारणे नमूद करुन त्यांची दिशाभूल

केली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी ही बाब जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणली असता त्यांनीही अपिलार्थीचे म्हणणे विचारात घेतले नाही व केवळ माहिती अधिका-याची बाजू उचलून धरली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झालेले नाही कारण संगमेश्वर सर्व्हे नंबर २९८, ३५२/१-२ फायनल प्लॉट नं. ९४ मधील ओपन स्पेसच्या १० टक्के जागा अध्यक्ष, जाणता राजा मित्रमंडळ, मालेगाव या संस्थेस सामाजिक कार्यासाठी दिली असल्याचे म्हटले आहे. या जागेचा वापर सामाजिक ऐवजी राजकीय कारणास्तव केला जातो. सार्वजनिक जागा हस्तांतरीत करण्यात येणारी संस्था ही नोंदणीकृत आहे किंवा कसे हे सुध्दा तत्कालीन नगरपालिका व विद्यमान महानगरपालिकेकडून पाहण्यात आलेले नाही. एखाद्या संस्थेची दुसरी संलग्न संस्था पहिल्या संस्थेने कराराने घेतलेल्या सार्वजनिक जागेचा वापर वेगळ्याच प्रयोजनासाठी करता येणार नाही कारण त्याची कोणतीही परवानगी घेणे आवश्यक नसते किंवा कसे इत्यादी बाबींचा खुलासा होणे गरजेचे आहे. मात्र सदर खुलासा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नाकारला गेला. सर्वांना समान कायदा या न्यायतत्वावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वस्तुनिष्ठ उत्तरे देणे आवश्यक होते, परंतु तसे झालेले नाही. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१-२००२ या कालावधीमधील महानगरपालिकेकडून हिंदु जिमखाना संस्थेस उपलब्ध करुन दिलेल्या जागेसंदर्भात एकूण ८ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - महानगरपालिकेने सर्व्हे नंबर २९८ मधील ओपन स्पेस हिंदु जिमखाना / जाणता राजा मित्रमंडळ या संस्थेस हस्तांतरीत केली आहे काय, ही जागा हस्तांतरीत केली असल्यास ती कुठल्या कार्यासाठी व किती कालावधीसाठी देण्यात आली, ही जागा ज्या कार्यासाठी देण्यात आली त्याच कार्यासाठी त्याचा वापर केला जातो काय, नसल्यास संबंधीत संस्थेच्या

पदाधिका-यांविरुध्द महानगरपालिकेने काय कारवाई केली, हिंदु जिमखाना ही जाणता राजा मित्र मंडळाची संलग्न संस्था आहे का, नगरपालिकेकडे जागा मागणीसाठी संस्थेने दिलेल्या प्रस्तावाची प्रत, तत्कालीन नगरपालिकेकडील जनरल बोर्ड ठराव क्रमांक १५९ दिनांक २९-१२-२००१ ची नक्कल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्देनिहाय काही माहिती पुरविली आहे. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २, ६ व ८ च्या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे रुपये २, ८ व २ इतके भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी कोणत्याही शुल्काचा भरणा केला नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे तर अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, या शुल्काचा भरणा मनपाकडे त्यांनी केला आहे, तथापि या संदर्भातील कोणताही पुरावा ते आयोगास उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १६-०३-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले असल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिकेकडून हिंदु जिमखाना संस्थेस उपलब्ध करुन दिलेल्या जागेबाबत एकूण आठ मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागविली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही

प्रश्नांना उत्तरे दिली आहेत व अपिलार्थीच्या इतर माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीचा दिनांक १४-१२-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्राप्त झाला असून या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०१-२००७ रोजी आठपैकी ५ मुद्यांवर माहिती देऊन तीन मुद्दयांवर माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क एकूण रुपये १२ इतके भरणा करुन ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यासंदर्भात कोणताही पुरावा ते आज रोजी आयोगासमोर देऊ शकले नाहीत, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने हे शुल्क भरल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीस आता जर ही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी महानगरपालिके-कडे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सूचित केल्याप्रमाणे, आवश्यक ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी अथवा त्यांनी महानगरपालिकेकडे आवश्यक ते शुल्क यापूर्वी भरले असेल तर त्याचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जेणेकरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देणे सुलभ होईल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या विधानाच्या समर्थनार्थ त्यांनी असे म्हटले आहे की, मालेगाव शहरातील स. नं. २९८, ३५२/१-२, फाईनल प्लॉट नं. ९४ मधील ओपन स्पेस जागा हिंदु जिमखाना / जाणता राजा मित्र मंडळ, मालेगाव या संस्थेस मनपाने दिलेल्या जागेचा वापर सामाजिक / राजकीय कारणास्तव करण्यात येत आहे, असे त्यांना समजले आहे. एका संस्थेने कराराने घेतलेल्या सार्वजनिक जागेचा वापर दुसरी संस्था करीत आहे. सदर वापर कायदेशीर आहे किंवा कसे याबाबत अपिलार्थीच्या मनात शंका आहे म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे वाटत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहिती विचारल्यास, जन माहिती अधिकारी

यांच्याकडे अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्याच स्वरुपात अर्जदारास देण्याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत निर्णय घेणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन महानगरपालिकेने ही जागा जाणता राजा मित्र मंडळास कोणत्या उद्देशाने दिली होती हे संबंधीत सामाजिक संस्था व मनपा यांच्यामध्ये झालेल्या करारावरुन त्यांना समजून घेता येईल. जर करारपत्रातील काही अटींचा खरोखरच भंग झाला आहे असे अपिलार्थीस वाटत असेल तर त्यांनी याचा मनपा अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडे वेगळा अर्ज / अपील करुन आपल्या गा-हाण्याचा निपटारा करुन घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अर्जदाराने प्रश्न विचारणे व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे देणे, अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य विहित वेळेत व योग्यरित्या पार पाडले असल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांना सादर केल्यास, विनामूल्य अथवा सदर शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ६ व ८ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्याचा पुरावा सादर केल्यास, विनामूल्य अथवा सदर शुल्क भरल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ६ व ८ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२४-१२-२००८	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार, १२६, इस्लामपुरा, लल्ले दुध डेअरी जवळ, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२	जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०६२

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे, अपिलार्थी
'मधुरमुरली', महावीरनगर, मालेगाव-कॅम्प,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागितलेली माहिती समाधानकारक व वस्तुनिष्ठपणे न देता नाममात्र उत्तरे देऊन त्यांची

दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. अतिक्रमण करणा-यांविरुध्द कारवाई का होत नाही, याचे उत्तर देण्याचे त्यांनी टाळले आहे, कारवाई करण्याची नस्ती आढळ होत नाही, अशी उत्तरे देऊन माहिती अधिका-याने हात झटकले. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देतांना कोठलीच संयुक्तीक व वस्तुनिष्ठ माहिती द्यावयाची नाही असा त्यांचा दृष्टीकोन होता. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मागणीवर पडदा घालण्याचे काम केले. सामान्य नागरिकांवर अतिक्रमण / नियमबाह्य बांधकामासाठी विनाविलंब व तात्काळ कारवाई होत असतांना संबंधित अतिक्रमणधारकांवर मात्र कारवाई का होत नाही. होणार असेल तर केव्हा होईल आणि आजवर का झाली नाही याची वस्तुनिष्ठ उत्तरे त्यांना प्राप्त झालेली नाहीत, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ ते २००५ या कालावधीतील मालेगाव महानगरपालिका हद्दीतील संगमेश्वर शिवारातील अनधिकृत बांधकामाबाबत एकूण सहा मुद्दयांव्दारे माहिती विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शिवा डेव्हलपर्स, मालेगाव यांना नोटीस देण्यात आली होती हे खरे आहे काय ? नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत बेकायदेशीर बांधकाम काढून टाकण्याचे निर्देश संबंधितास देण्यात आले होते हे खरे आहे काय ? दिलेल्या मुदतीत अतिक्रमण केलेल्यांनी ते बांधकाम पाडले नाही तर महानगरपालिका मालेगाव कारवाई करील व बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकील व बांधकाम पाडण्याचा खर्च शिवा डेव्हलपर्स यांच्याकडून वसूल करील असेही दिनांक १९-०९-२००५ च्या नोटीशीमध्ये म्हटले होते हे खरे आहे काय ? असल्यास त्याप्रमाणे सदरील इमारतीचे अतिक्रमित बांधकाम पाडण्याची कारवाई करण्यात आली आहे काय ? नसल्यास कारवाई का झाली नाही, याचा वस्तुनिष्ठ खुलासा व महानगरपालिकेच्या दिनांक १९-०९-२००५ च्या संबंधीत बांधकाम कर्त्याने दिलेल्या उत्तराची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-

०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण ६ पैकी ५ मुद्दयांवर माहिती दिली. या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०३-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील भागशः मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे व दिली असल्यास ती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे याबाबतचा खुलासा अपिलार्थी किंवा जन माहिती अधिकारी या दोघांपैकी कोणीही करु शकत नाही. तथापि या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या सहा मुद्दयांवरील माहितीपैकी पाच मुद्दयांव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये, अपिलार्थीने, जन माहिती अधिका-याचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित केले आहेत, जे अधिनियमातील तरतुदीस धरुन नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाची व्याख्या पाहता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल खुलासा अथवा स्पष्टीकरण देण्याची तरतुद यामध्ये अभिप्रेत नसल्याचे दिसून येईल. अपिलार्थीस एकूण सहा मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १ ते ५ या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देय न होता केवळ मुद्दा क्रमांक ६, या एकाच मुद्दयाची माहिती देय होते, तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०१-२००७

रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तरे दिली आहेत, मात्र अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मधील जी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरते तीच माहिती नेमकी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याचे दिसून येते. ही माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांना ३ दिवसांच्या आत या मुद्दयांवरील माहिती देण्याचे सूचित केले होते, तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे किंवा कसे व जन माहिती अधिकारी यांनी ती पुरविली आहे किंवा कसे याबाबत उपस्थित असलेले अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हे याबाबत काहीही स्पष्टीकरण करु शकत नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये मालेगाव शहरातील संगमेश्वर वार्डात सर्व्हे नंबर २९८, ३५२/१-२ व १ फायनल प्लॉट नं. ९४ मधील बेकायदेशीर बांधकामासंदर्भात अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. या मुद्दयांवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अथवा त्यांच्या कृतीबद्दल कारणे अपेक्षित असल्याचे दिसून येते. अशा प्रकारचे स्पष्टीकरण व कारणे अपिलार्थीस देणे हे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही, हे वरील परिच्छेदात स्पष्ट केले आहे. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत बांधकाम व्यावसायिकाने महानगरपालिकेच्या विरुध्द कथित अतिक्रमणासंदर्भात मा. उच्च न्यायालयाकडे दावा दाखल केला असल्याचे व त्यावर अद्याप मा. उच्च न्यायालयाकडून आदेश प्रलंबीत असल्याने त्यांनी या प्रकरणी कारवाई केली नसल्याचे आयोगास स्पष्ट केले. मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दांपैकी ५ मुद्दयांवर त्यांना माहिती प्राप्त झाली व उर्वरित एक मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा नाही याची माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी यांना नाही हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे, 'मधुरमुरली', महावीरनगर, मालेगाव-कॅम्प, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०६३

निर्णय दिनांक २४-१२-२००८

१ श्री. किशोर भबुतलाल शहा, अपिलार्थी
प्लॉट नं. २० + २१/३, पार्वतीनगर,
जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,
जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,
जळगांव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगांव
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमानुसार दिनांक ०१-०९-२००६ रोजी अर्ज केला असता त्यांना पोलीस निरीक्षक जिल्हापेठ यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिले. त्यानुसार त्यांनी दिनांक २३-०९-२००६ रोजी पोलीस निरीक्षक यांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पत्र पाठवून माहितीसाठी लागणारा खर्च कळविण्याबाबत विनंती केली. परंतु कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००६ रोजी अपील केले. परंतु या अपिलावरही त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक व पोलीस निरीक्षक जिल्हा पेठ जळगांव यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची व त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००६ ते ३०-०६-२००६ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, त्यांनी दिनांक ०७-०१-२००६, ०७-०४-२००६ व ३०-०६-२००६ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई तसेच अतिरिक्त पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या दिनांक ०२-१०-२००५ च्या ७४८३ क्रमांकाच्या पत्रावर त्यांनी केलेल्या कारवाईची माहिती मागविली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांचा अर्ज जिल्हापेठ पोलीस स्टेशन यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याचे कळवून, अपिलार्थीस जिल्हापेठ पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याचे दिसून येते. यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे ही वस्तुस्थिती निदर्शनास आणून त्यांच्या अर्जावर कारवाई संदर्भात माहिती देण्याची त्यांना विनंती केली होती.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीस पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन जिल्हापेठ यांनी दिनांक १५-०९-२००६ व दिनांक १५-११-२००६ रोजी पाठविलेली पत्रे सादर केली आहेत. या पत्रावरुन असे दिसून येते की, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन जिल्हापेठ यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०९-२००६ व १५-११-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीने संदर्भित केलेल्या ०७-०१-२००६, ०७-०४-२००६ व ३०-०६-२००६ शी संबंधीत माहिती दिलेली आहे. ही माहिती संबंधीत पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर जर अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असेल तर ती त्यांनी देण्यासंबंधी अधिनियमाव्दारे विहित तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे अभिप्रेत आहे. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसेल तर अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधीत आहे त्या कार्यालयाकडे त्यांना अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. अपिलार्थीस जी माहिती दिली ती जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नसलेल्या अधिका-याच्या सहीने व विलंबाने पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अतिरिक्त पोलीस महासंचालक, पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ७४८३, दिनांक ०२-१०-२००५ च्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली हे अद्यापपर्यंतही

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कळविण्यात आले नाही. अतिरिक्त पोलीस महासंचालक यांच्या दिनांक ०२-१०-२००५ रोजीचे पत्र म्हणजे अपिलार्थीचा दिनांक १४-११-२००५ रोजीचा अपर पोलीस महासंचालकाने पोलीस अधीक्षकाकडे पाठविलेला अर्ज असून या पत्रामध्ये अपर पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षकास योग्य ती कार्यवाही करण्यचे सूचित केले असून अपिलार्थीच्या दिनांक १४-११-२००५ रोजीच्या पत्रावर त्यांनी केलेल्या कारवाईबाबत अपिलार्थीस परस्पर कळविण्याची सूचना आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य अधिनियमाव्दारे अभिप्रेत असल्याप्रमाणे पार पाडले नाही, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत होऊनही संपूर्ण माहिती दिली नाही. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीचे कोणत्याही प्रकारे समर्थन असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आता शासन सेवेतून काढून टाकले असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम२० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश आयोगास देता येत नाहीत, मात्र या प्रकरणी संबंधीत अपर पोलीस अधीक्षक, जळगांव जे जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहेत त्यांनी देखील आपले कर्तव्य अधिनियमातील कलम १९ (६) नुसार पार पाडले नसल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची व त्यातील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची पोलीस महासंचालक यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या अर्जाच्या प्रतीसंदर्भात त्यांनी जो पत्रव्यवहार केला असेल त्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर भबुतलाल शहा, प्लॉट नं. २० + २१/३, पार्वतीनगर, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९५

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,
पंचायत समिती, शिंदखेडा, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन
उपविभाग, पंचायत समिती, शिंदखेडा,
जिल्हा धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिंदखेडा, जिल्हा धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देता उशीरा माहिती दिली व जी दिली ती अपूर्ण स्वरुपाची दिली तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतीही भूमिका घेतली नसल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या सिंचन विकास कामांची एकूण आठ मुद्दयांवर माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिीपोटीचे शुल्क रुपये ७ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या आपल्या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न केल्याने फेटाळून लावले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सर्वसाधारण वर्णनाच्या प्रती व्यतिरिक्त उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कामाच्या सर्वसाधारण वर्णनाची प्रत हा मुद्दा वगळता उर्वरित मुद्दयांची माहिती त्यांच्याकडे पाठवून दिली.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहिती पुरविली नाही, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कामाचे सर्वसाधारण स्वरुप वगळून उर्वरित माहिती दिनांक १८-०६-२००७ रोजी पोस्टाव्दारे पाठवून दिली. अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती आवश्यक असल्यास ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते, तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या सुचनेप्रमाणे केला नाही. परंतु मूळात हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविले किंवा कसे यासबंधीचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी, आयोगाने त्यांना लेखी पूर्वसूचना करुनही, सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा हा मुद्दा या कारणास्तव ग्राह्य धरता येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असा निर्णय दिला, मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा एक मुद्दा सोडून उर्वरित मुद्दयांची माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय सदोष आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०६-२००७ रोजी जरी काही माहिती पाठविली असली तरी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा पुरावा उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कथित दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस पुरवाव्या लागणा-या शुल्काचा संपूर्ण तपशील, जो

अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविणे अनिवार्य आहे, तो दिला नाही व परिणामी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला प्रथम प्रतिसाद मूलतः अवैध ठरत असल्याने त्यांच्याकडून आता अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना, ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने दडविल्याचे अथवा ही माहिती अपिलार्थीस देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा

प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०३

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, अपिलार्थी
रा. बोदवड मेनरोड, तालुका बोदवड,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६-अ याबाबतचे निश्चित कर्तव्य व अधिकार याबाबतची माहिती मागितली होती. परंतु माहिती निश्चितपणे न देता माहिती

देण्याबाबत टाळाटाळ केल्याचे नमूद केले असून त्यांना खरी व पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी अशी अपेक्षा त्यांनी या अपील अर्जामध्ये केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्या दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९० ते २००७ या कालावधीशी संबंधीत, प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६-अ (बोदवड गावातून जाणारा) विषयी एकूण ३ मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ प्रमाणे प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६- 'अ' बाबत अधीक्षक अभियंता यांचे शासनाने प्रदान केलेले अधिकार व कर्तव्य, सदर रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित असून सरकारी नोंद असलेला प्रमाणे उपलब्ध (अस्तित्वात) आहे काय याची माहिती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव व बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगांव हे कर्तव्यात कसूर करत असल्यास सदर रस्त्याबाबत कोणाचे कसे कर्तव्य आहे याची माहिती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचे कक्षेतील" - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत होती त्या प्राधिकरणाकडे - कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जळगांव - यांच्याकडे त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली व अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जळगांव यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सुचविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांना दिनांक १०-०५-२००७ रोजी

एक पत्र देऊन अधीक्षक अभियंता यांचे अधिकार व कर्तव्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीमध्ये ज्या भागामध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत त्या भागाची छायाप्रत अपिलार्थीस दिली. यामध्ये अधीक्षक अभियंता यांची कर्तव्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे अधिकार व कर्तव्याबाबत त्यांनी अपिलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत व त्यांनी आपले म्हणणे लेखी पत्राव्दारे पाठवून त्यामध्ये असे म्हटले आहे की, प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६-अ च्या मूळ जागेचा अधिकृत सहीशिक्यानिशी नकाशा जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मिळणे अपेक्षित आहे. सदर नकाशा गावशिवाराचा नकाशा आहे. त्याचप्रमाणे त्यांनी या लेखी पत्रामध्ये जन माहिती अधिकारी हे त्यांना खरी व वास्तविक माहिती देतील व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती, माहिती आयुक्तांनी तपासणी करुन अपिलार्थीस द्यावी, अशी अपेक्षा केली आहे. अपिलार्थीच्या मते जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या रस्त्याची लांबी व रुंदी यांचा निर्णय प्रत्यक्ष रस्ता पाहून घेतला जावा. या पत्रामध्ये त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, त्यांनी ज्या रस्त्याच्या नकाशाची मागणी केली आहे त्या रस्त्याचे अस्तित्व, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर जळगांव यांनी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता ग्रामीण रुग्णालय सदर रस्त्यावर बांधून, संपवून टाकले आहे. तसेच या रस्त्यावर सन १९७६ ते १९८० व १९९५ ते २००७ पावेतो फक्त कागदोपत्री काम झाले असून प्रत्यक्षात खर्च केला आहे, या रस्त्याचे काम केले नाही असे म्हटले आहे व अंतिमतः या रस्त्याचा गावशिवाराचा नकाशा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषद जळगांवशी संबंधीत असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी

अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्याकडे पाठविला. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जळगांव यांना यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस उपविभाग जिल्हा परिषद बांधकाम भुसावळ यांच्याकडून दिनांक ०३-०७-२००७ रोजी देण्यात आल्याचे आयोगास अवगत केले. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जळगांव यांनी या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट करतांना असे सांगितले की, बोदवड उजनी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६, अ हा त्यांच्याकडील अभिलेख्याप्रमाणे जामनेर-मुक्ताईनगर या प्रमुख राज्य मार्गापासून सुरु होतो. अपिलार्थी हे नेहमीच बोदवड उजनी रस्त्याची माहिती मागवित असतात. परंतु ज्या ज्या वेळी त्यांनी या रस्त्याची माहिती मागितली त्या त्या वेळी ती त्यांना क्रमांक १६-अ रस्त्याशी संबंधीत सत्य व अचूक माहिती दिली. सदर रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षापासून अस्तित्वात असून या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वेळोवेळी दुरुस्ती व देखभालीची कामे केली जातात. अपिलार्थी जो खर्च कागदोपत्री झाल्याचे म्हणत आहेत तो खर्च या रस्त्यावर झालेला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे बोदवड उजनी रस्ता हा नसून बोदवड गावातून गावशिवारातून जाणारा प्रजिमा आहे, असे आहे. गावठाण तळ या रस्त्यावर हरिजन वस्ती सुधार योजने अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत सन २००० साली काम केले गेले होते. अपिलार्थीस बोदवड ग्रामपंचायतीतील रस्त्याविषयी कामाची माहिती अपेक्षित आहे. याच विषयावर अपिलार्थी हे वेळोवेळी अर्ज करत असतात. या रस्त्यावर अतिक्रमण झाले असून अपिलार्थीस ती अतिक्रमणे हटवून हवी आहेत, तथापि ही अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी जिल्हा परिषद बांधकाम विभागाची नाही, ही जबाबदारी ग्रामपंचायत बोदवडची आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाव्दारे अनेक मुद्दयांसदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रासोबत

माहिती दिली आहे तर इतर मुद्दयासंदर्भात उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग भुसावळ यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती मान्य नाही. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांच्या मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत असलेली माहिती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी बरोबर पुरवली असल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा त्यांनी स्पष्टपणे उल्लेख केला नाही, तथापि अपिलार्थीस या मुद्दयाव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे कर्तव्यात कसूर करत असल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार कोणास आहेत अशी माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते, मात्र अपिलार्थीने निश्चित अशी माहिती या मुद्दयाव्दारे मागितलेली नाही. हे सर्व पाहता, या प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी त्यांच्या स्तरावर एक बैठक घेऊन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा त्यांनी अपिलार्थीकडून घ्यावा व त्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी अर्जातील मुद्दयासंदर्भात त्यांना असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये ज्या प्राधिकरणाकडे माहिती जशा स्वरुपात असेल तशा स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस देणे अशी प्रक्रिया मूळात अभिप्रेत आहे. अपिलार्थीस जर गावशिवाराच्या नकाशाची प्रत हवी असेल तर संबंधीत तलाठ्याकडे अर्ज करुन ते गावशिवाराच्या नकाशाची प्रत उपलब्ध करुन घेऊ शकतात. या अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती आयुक्तांनी व्यक्तिशः रस्त्याची लांबी रुंदी पडताळणी करण्याची अपेक्षा केली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीबाबत त्यांच्या काही शंका असतील तर ते यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे आपली तक्रार मांडू शकतात. अर्जदाराच्या वैयक्तीक गा-ह्याण्याचा अशा प्रकारे निपटारा करण्याची अधिकारिता आयोगाला नाही हे अपिलार्थीच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा

दिनांक ०३-०३-२००७ रोजीचा अर्ज अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात होती त्यांच्याकडे ५ दिवसाच्या आत न पाठविता सदर अर्ज ४ दिवसाच्या विलंबाने संबंधितांकडे पाठवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंब झाल्याचे व अंतिमतः अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे स्पष्ट झाले असल्याने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व संबंधित अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी या प्रकरणी ३० दिवसाच्या आत आपल्या कार्यालयामधून अपिलार्थीच्या प्रकरणाचा निपटारा करण्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणातील त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१२-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकमार गौरीशंकर अग्रवाल, रा. बोदवड मेनरोड, तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०४

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. दिलीपकमार गौरीशंकर अग्रवाल, अपिलार्थी
रा. बोदवड मेनरोड, तालुका बोदवड,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे नमूद करुन ती माहिती बरोबर असल्याबाबत आयोगाने तपासणी करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी हे अकार्यक्षम असून त्यांचा अपील निर्णय देण्यास ते उदासीन असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद करुन अंतिमत: त्यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने द्यावी अशी अपेक्षा त्यांनी या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या आपल्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९० ते २००७ या कालावधीशी संबंधीत प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६- 'अ' विषयी एकूण २ मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००७ रोजी या विषयावर प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००७ रोजी (प्रथम सुनावणीच्या आदल्या दिवशी) माहिती दिल्याने, निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयाची प्रत सोबत जोडलेली नाही, त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी उदासीन व अकार्यक्षम असल्याबद्दल आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपिलाचे केलेले सादरीकरण चुकीचे असून

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय जोडणे अनिवार्य आहे याची त्यांना प्रथमतः कल्पना देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही विचार न करता दिल्याचे, व उप अभियंता यांच्याकडून अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थी, त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हणतात त्याप्रमाणे, निश्चितपणे अपूर्ण असल्याची आयोगास आढळून आले. मूळात अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस दिलेली माहिती अर्धवट आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आपल्या अशा प्रकारच्या वर्तनाने आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या वर्तनाने त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीच्या आदल्या दिवशी माहिती दिली आहे, या मुद्दयावर अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची व गैर आहे. जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती किती मुदतीत दिली व त्या माहितीच्या सत्यासत्यतेबाबत निर्णय आपल्या निर्णयामध्ये देणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी तसे न करता सदोष आदेश जारी करुन त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केलेला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद महसूल आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ३०-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. बोदवड मेनरोड, तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०५

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. अशोक कडू वाघुळदे, अपिलार्थी
रविवार पेठ, सावदा, तालुका रावेर,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, सावदा, जिल्हा
जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
(उत्तर) विभाग, जळगांव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
सावदा, जिल्हा जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही माहिती अधिका-याने त्यांच्याकडून आवश्यक ती फीस घेऊनही कागदपत्रे पुरविली नाहीत, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या उपविभागात रस्त्याच्या डागडुगीकरिता सन २००५ ते २००६ या वर्षामध्ये प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रकमासंदर्भात काही माहिती मागविली होती, ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २३-०३-२००७ रोजी त्यांच्याकडे एकूण रुपये ३०० इतक्या शुल्काचा भरणा मनीऑर्डरव्दारे केला. सदर मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक २६-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या पोचसहीवरुन दिसून येते. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२००७ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाव्दारे अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सूचना दिली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क

माहिती पुरवावयाची आहे किंवा कसे, किती दिवसाच्या आत त्यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी यासंदर्भात कोणतेही आदेश दिलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आठ दिवसाच्या आत मिळावी व संबंधित अधिका-यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दिनांक २८-०३-२००७ रोजी तयार होती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन जाण्यासाठी पत्र लिहिले, तथापि अपिलार्थी हे आवश्यक ते शुल्क भरुनही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेले नाहीत, त्यामुळे ही माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी तयार असून ते अपिलार्थीस ती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे नाही. अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये माहितीच्या संभावित पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर हा तपशील, जो अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे आवश्यक आहे तो अपिलार्थीस न कळवून या कलमाचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केला असून त्यामुळे परिणामतः त्यांनी अपिलार्थीस लिहिलेले दिनांक २३-०१-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे, त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत

होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून या माहितीपोटी प्राप्त करुन घेतलेले रुपये ३०० हे याच कालावधीमध्ये त्यांना परत करावे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली आहे हे पाहता, अपिलार्थीपासून त्यांनी ही माहिती कोणत्याही असद्हेतूने त्यांनी दडविल्याचे अथवा देण्यास टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे या प्रकरणी दिसून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३०० हे त्यांना याच कालावधीत परत करावे.

औरंगाबाद

दिनांक ३०-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक कडू वाघुळदे, रविवार पेठ, सावदा, तालुका रावेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावदा,

जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१४

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. गोवर्धन उत्तमराम कोल्हे, अपिलार्थी
म्हाडा कॉलनी, घर नं. २१, मल्टीपरपज हायस्कूलचे
पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी
कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३०-१२-२००८ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेले, आज रोजी विचाराधीन असलेले त्यांचे अपील क्रमांक २३१४/२००७ हे मागे घेत असल्याचे म्हटले आहे. खुद्द अपिलार्थीच आता त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे

घेत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक २३१४/२००७ दिनांक १४-११-२००७ खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २३१४/२००७, दिनांक १४-११-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोवर्धन उत्तमराम कोल्हे, म्हाडा कॉलनी, घर नं. २१, मल्टीपरपज हायस्कूलचे पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१५

निर्णय दिनांक ३०-१२-२००८

१ श्री. अब्दुल मतीन हुदाई, अपिलार्थी
स्ट्रीट नं.२, अल्लामा इकबाल शाळेच्या बाजू
(पश्चिम), दुःखीनगर, जुना जालना,
तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (सिंचन), जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती मिळाली असून त्यांना श्री. मुसळे शाखा अभियंता यांच्याविरुध्द आलेल्या तक्रारीच्या कमी प्रती मिळाल्या व श्री. मुसळे यांच्याबाबत आलेल्या तक्रारींचा निपटारा कशा प्रकारे केला ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. मुसळे, शाखा अभियंता उपविभाग परतूर यांच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. मुसळे यांच्या कामाबाबत आलेल्या सर्व तक्रारीच्या अॅटेस्टेड प्रती व आलेल्या तक्रारी कशा प्रकारे हाताळण्यातआल्या त्याच्या कार्यवाहीच्या अॅटेस्टेड प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २० इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने शासकीय कोषागारात दिनांक १२-०९-२००७ रोजी भरले, तथापि जन माहिती अधिकारी यांनी मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीस यापूर्वीच दिनांक २०-०७-२००७ रोजी काही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचा निष्कर्ष काढला, परंतु या सदर्भात कोणतेही आदेश दिलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये दिलेल्या शिफारशीप्रमाणे आयोगाने कारवाई करावी. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी शुल्क न आकारता दिली आहे. अपिलार्थीने सदर शुल्क दिनांक १२-०९-२००७ रोजी शासकीय कोषागारात भरले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नाही. तसेच ही माहिती अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी देखिल उपलब्ध नव्हती त्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्रयस्थ पक्ष श्री. मुसळे यांच्याविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रती व त्यावर त्यांनी केलेल्या कारवाईच्या प्रती यांची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती त्रयस्थ पक्षाविषयी विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यावर अधिनियमातील कलम ११ प्रमाणे कारवाई करणे जरुरीचे होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत आहे हा मुद्दा विचारात न घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली एवढाच निष्कर्ष काढून आपले निकालपत्र संपविले आहे. कोणत्याही अपील सुनावणीवर निकाल कशा प्रकारे देऊ नये याचा हा निर्णय म्हणजे उत्तम उदाहरण आहे, असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जेवढी माहिती उपलब्ध असेल तेवढी माहिती अर्जदारास त्यांनी अधिनियमातील तरतदीनुसार देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. श्री. मुसळे यांच्यावर झालेल्या आरोपांची, दक्षता पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या-

मार्फत चौकशी चालू आहे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून यासंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांनी नेली असल्यामुळे ही माहिती त्यावेळी त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस ती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या, आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रती कमी मिळाल्याचे म्हटले आहे. यावर अपिलार्थी यांच्याकडे काही पुरावा असल्यास त्यांनी तो आयोगास सादर करावा असे सांगितल्यानंतर, श्री. मुसळे यांच्या तक्रार अर्जाची नस्ती त्यांनी पाहिली असून त्यामध्ये त्यांना पुरविण्यात आलेल्या तक्रार अर्जापेक्षा जास्त तक्रार अर्ज आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. केवळ अपिलार्थी म्हणतात म्हणून ही माहिती अपूर्ण आहे, असे आयोग मान्य करत नाही. कारण अपिलार्थीने केलेल्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ संदर्भात जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस त्यांनी पाठवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. तसेच जिल्हाधिकारी, जालना यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांचे मूळ अर्जातील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घेण्याचे व तो अपिलार्थीस विनामूल्य कळविण्याचे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमतील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई न करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी

स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल मतीन हुदाई, स्ट्रीट नं.२, अल्लामा इकबाल शाळेच्या बाजू (पश्चिम), दुःखीनगर, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१७
निर्णय दिनांक  ३१-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक पावलस जाधव,<br>रा. गंगापूर जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त (विकास शाखा),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः | सहायक संचालक (विकास),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद |
| जन अपिलीय अधिकारीः | उपआयुक्त (आस्था) विकास शाखा,<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी घेतली नसल्याने संबंधितांकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन देण्याचे आदेशित करण्याची तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत शिक्षण विभागाने सन २००६-०७ मध्ये खरेदी केलेल्या लेखन पाटया व डयुअल डेस्क निकृष्ट दर्जाच्या असल्या बाबत श्री. भरतसिंग राजपुत, जिल्हा परिषद सदस्य, औरंगाबाद यांनी विभागीय आयुक्त कार्यालयास दि. १९/७/२००७ रोजी तक्रार प्राप्त झाली. सदरील तक्रारीच्या अनुषंगाने उपआयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या कार्यालयातील सहाय्यक संचालक (विकास), सहाय्यक लेखाधिकारी व कनिष्ठ लेखाधिकारी यांच्या पथकामार्फत दि. २०/७/२००७ रोजी लेखन पाटया व डयुअल डेस्क खरेदी बाबत चौकशी सुरु करण्यात आली.

सदर विषयाबाबतची माहिती माहितीच्या अधिकारा अंतर्गत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४.७.२००७ च्या अर्जान्वये मागितली होती. श्री. जाधव यांचा अर्ज ज्या तारखेस प्राप्त झाला त्यावेळी सदरची चौकशी पुर्ण झालेली नव्हती म्हणुन श्री. जाधव यांना या कार्यालयाच्या दिनांक ४/८/२००७ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत लेखन पाटया व डयुअल डेस्क खरेदीबाबत या कार्यालयाकडून चौकशी चालू आहे व सदर चौकशी पुर्ण झाल्यानंतर उक्त विषयाचा अहवाल देण्यात येइल असे कळविण्यात आले होते.

सदर बाबीची चौकशी पुर्ण झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र दिनांक ३.९.२००७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे अहवाल आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला. श्री. जाधव यांनी

त्यांना माहीती न मिळण्या बाबत दि. ६/९/२००७ अन्वये अपील अर्ज केलेला होता. दरम्यान चौकशी अहवाल प्राप्त झालेला असल्याने श्री. जाधव यांना त्यांचे पत्र दिनांक १३.९.२००७ अन्वये चौकशी अहवालाच्या टिपणी सह झेरॉक्स प्रती रु १००/- शासन खाती भरणा करुन घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधिताकडून रक्कम भरणा न केल्याने माहीती पाठविण्यात आलेली नाही. सदर रकमेचा भरणा केल्यास त्यांना अहवालाची प्रत देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, दि. २४.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व ते सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क घेण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.९.२००७ रोजीचे पत्र, ज्यामध्ये अपिलार्थीस माहिती तयार आहे, सशुल्क घेऊन जा, असे म्हटले होते, ते पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे दि. १३.९.२००७ रोजीचे पत्र पोस्टाने पाठविल्याचा योग्य तो पुरावा, जावकनोंदवहीची सत्यप्रत आयोगासमोर सादर केला आहे. हा पुरावा आयोग ग्राहय धरीत असून अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांचेकडे भरले नसल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, असा निष्कर्ष आयोग काढीत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य माहिती आता देय असणार नाही. आज सुनावणीमध्ये अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून सशुल्क प्राप्त करुन घेण्याची तयारीही दर्शविली आहे, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक पावलस जाधव, म.फुलेनगर, गंगापूर ता.गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (विकास), विकास शाखा विभागीय आयुक्त कार्यालय, ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (आस्था) विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८९
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

१ श्री. उध्दव नामदेव खडके, : अपिलार्थी
मु.पो.चिचोंडी पाटील ता. जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, आष्टी, जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, बीड
जि.बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: नायब तहसीलदार,आष्टी
जि.बीड
जन अपिलीय अधिकारी: तहसीलदार, आष्टी, जि.बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांच्या कार्यालयात दि. ०८.०८.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज तहसीलदार, आष्टी जि.बीड यांच्याकडे दि. १५.०४.२००६ रोजी केला होता. या अर्जामध्ये त्यांनी - मौजे.पिंपळा ता.आष्टी जि.बीड येथील जनावरांच्या छावणीबाबत सन २००२ ते २००६ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने दि. ३०.५.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, बीड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) प्रथम अपील केले. तथापि उपविभागीय अधिकारी, बीड हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने, अपिलार्थीस, त्यांच्याकडील दि. १२.६.२०६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहता येत नाही, असे कळवून अपिलार्थीस सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचे सूचित केले व त्यांचा अर्ज निकाली काढला. येथे असे दिसून येते की, या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी हे नायब तहसीलदार, आष्टी तहसील कार्यालय, आष्टी असून जन अपिलीय अधिकारी म्हणून तहसीलदार, आष्टी यांची नेमणूक केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना वेगवेगळया सहकारी संस्थेकडून मागवून संकलीत करावयाची होती. तेव्हा अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. ३०.०५.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर तहसीलदार, आष्टी यांनी या टप्प्यावर प्रथम सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी जि.बीड यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय जर अपिलार्थीस मान्य नसेल तर, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांच्याकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

४) तहसीलदार, आष्टी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यासंबंधीचे लेखी आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उध्दव नामदेव खडके, मु.पो.चिचोंडी पाटील ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,आष्टी जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१४
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे,<br>रा.मालेगाव कँप, जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>इमारत पर्यवेक्षक,<br>नगर रचना विभाग,<br>मालेगाव महानगरपालिका,<br>मालेगाव जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>नगररचनाकार, मालेगाव<br>महानगरपालिका, मालेगाव,जि.नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. २०.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक व वस्तुनिष्ठपणे माहिती न देता त्यांना अपूर्ण व उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. बेकायदेशीर बांधकाम -अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द कारवाई का होत नाही याचे उत्तर व कारण देण्याचे टाळले, कार्यवाही करण्याची नस्ती आढळ होत नाही, असे लेखी उत्तरात नमूद केले व माहिती नष्ट करण्याचा प्रयत्न केला, कुठलीच संयुक्तिक व वस्तुनिष्ठ माहिती द्यायची नाही,असा जन माहिती

अधिकारी यांचा दृष्टीकोन व जन  अपिलीय अधिकारी यांच्यासमोर त्यांच्या प्रत्येक सुनावणीच्या वेळी म्हणणे मांडले असताना देखील त्यांनी निकालपत्रात त्यांची कुठलीच बाजू विचारात न घेता, एकाच पध्दतीने छापील उत्तर देऊन प्रत्येक मुद्दा आणि मागणीवर पडदा घालण्याचेच काम केले, माहिती नाकारली/अपील नामंजूर केले हा माहिती कायद्याचा अवमानच आहे, सामान्य नागरिकांवर अतिक्रमण/नियमबाहय बांधकामासाठी विनाविलंब व तात्काळ कारवाई होत असतांना संबंधित अतिक्रमणधारकांवर मात्र कारवाई का होत नाही, अशाप्रकारच्या अभिप्रायांबरोबर आपल्या मूळ माहितीची अपिलार्थीने मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २१.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ ते २००५ या कालावधीशी संबंधित माहिती, महानगरपालिका, मालेगाव येथील जन माहिती अधिकारी यांच्याकडून बेकायदेशीर बांधकामाबाबत/अतिक्रमणाबाबत महापालिकास्तरावरुन करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबतची एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्यावर माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे १२.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ८.३.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक व त्यांच्या कृतीबाबत

कारणे व खुलासे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस दि. १६.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच अधिनियमातील विहित मुदतीमध्ये दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास सुसंगत वाटते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीस मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेतर्फे काढून हवी असल्याचे दिसून येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वस्तुनिष्ठ माहिती दिली नाही. 'वस्तुनिष्ठ माहिती' म्हणजे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती उडवाउडवीची,अपूरी व दिशाभूल करणारी कशाप्रकारे सिध्द होते, या मुद्यांसंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत. हे पाहता व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिलेली सुसंगत माहिती पाहता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

५) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे, 'मधुरमुरली', महावीरनगर, मालेगाव-कॅम्प, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२०
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

१ श्री. रजनीकांत शांतीलाल शाह, : अपिलार्थी
मालेगाव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
इमारत पर्यवेक्षक,
नगररचना विभाग,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
नगररचनाकार,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
जि.नाशिक.

त्रयस्थ पक्षः श्रीमती कंचनबाई कुंदनमलजी जैन

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे सर्व अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांच्या कार्यालयाकडे दि. २५.०४.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, मालेगाव महानगरपालिकेच्या हद्दीतील संगमेश्वर वॉर्डातील मिळकत स.नं.३०८/२ब फायनर प्लाट नं.५२ मधील बांधकामासंदर्भात एकूण ८

मुद्याद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ९.१.२००७ रोजीच्या आदेशानुसार त्यांना मिळालेली माहिती ही दिशाभूल करणारी असून ती जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर त्यांना चुकीची दिली आहे, असे नमूद केले आहे, त्याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीसाठीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची व त्यांना विनामूल्य माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळण्यासाठी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः दि. २.१.२००७ रोजीच्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सौ. कंचनबाई कुंदनलाल जैन यांच्या बांधकामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही मुद्यावर माहिती दिली व काही मुद्यांवर कागदपत्रांसाठी योग्य ती फी भरुन सदर कागदपत्रे त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावीत, असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२१.२.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे अपील, माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिल्याच्या कारणास्तव नामंजूर केले, जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दि.२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीतील एकूण ८ मुद्यांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र.१,४ व ८ शी संबंधित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती देण्यासंदर्भात निर्णय घेऊन तद्नंतर अर्जदारास माहिती देणे, या प्रक्रिया अभिप्रेत आहेत. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे, स्पष्टीकरण अथवा त्यांच्या निर्णयाची कारणे अपेक्षित करणारी अथवा भविष्यातील माहिती मागणे व ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे, अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१, ४ व ८ ची माहिती त्यांना देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यातील माहिती मागितली आहे. ती देखील वर स्पष्ट केलेल्या कारणास्तव अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोघम स्वरुपात उत्तर दिले असल्याचे दिसून येते. या प्रकरणी श्रीमती कंचनबाई कुंदनमलजी जैन यांना दिलेल्या बांधकाम परवानगीचा संपूर्ण तपशील, सदर तपशील ही सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते, अपिलार्थीने या मिळकतीला इतर धारकांकडून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या संमतीपत्राची छायाप्रत मागितली आहे. परंतु ही प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस ती प्रत न पुरविण्याचे कोणतेही कारण आपल्या दि. ९.१.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी नमूद केलेले दिसून येत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना त्यांना निश्चितपणे किती पृष्ठांची व कोणत्या आधाराने माहिती देण्यात आली याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.१.२००७ रोजीच्या पत्रामध्ये केलेला नाही. त्याचबरोबर हक्कसोड प्रमाणपत्र ही सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्याने ती अपिलार्थीस देण्याकरिता संबंधित त्रयस्थ

पक्षांची परवानगी घेणे गरजेचे नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, हक्कसोडपत्रावरुन त्यांना संबंधित मिळकत अर्जदाराच्या मालकीची खात्री झाली आहे. अपिलार्थीस या बांधकाम संबंधातील हक्कसोडपत्र देण्याचे आयोगाने वर सूचित केले आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र.६ च्या संदर्भात बांधकाम परवानगीची अधिकृत प्रत अप्राप्त असल्याने याबाबत खुलासा करता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांची ही भूमिका आयोगास मान्य नसून त्यांना प्रश्नाधीन बांधकामाच्या परवानगीची प्रत अपिलार्थीस देण्याचे आता या निर्णयाद्वारे आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र. ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी चुकीची पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षास जास्त बांधकामाची परवानगी कोणत्या नियमाप्रमाणे देण्यात आली याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केला आहे. या संदर्भात बांधकामास मंजूरी देण्यापूर्वी कोणत्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येते व या प्रकरणात अशाप्रकारची तपासणी जन माहिती अधिकारी यांनी केली आहे काय व केली असल्यास प्रश्नाधीन बांधकाम हे नियमाप्रमाणे होत आहे काय, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यालयात उपलब्ध असलेली मार्गदर्शक तत्त्वे अथवा कार्यालयीन टिपणीची प्रत/ चेकलीस्ट अशाप्रकारची कागदपत्रे उपलब्ध असल्यास, त्यांना ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात, जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे, याच एका मुद्यावर अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली, याची शहानिशा त्यांनी आपल्या स्तरावरुन करणे गरजेचे होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही शहानिशा न करता त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २१.२.२००७ रोजी दिलेला निर्णय हा चुकीचा ठरतो.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २, ३,५,६ व ७ या (पाच) वरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून वर उल्लेख केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय ठरत असल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे अथवा हेतूतः माहिती दडविल्याचे आयोगाच्या निदर्शनास न आल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२,३,५,६ व ७ शी संबंधित उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रजनीकांत शांतीलाल शाह,घर.नं.१०, आदिनाथ जैन सोसायटी, स्टेट बँकेच्या मागे, मालेगाव जि. नाशिक-४२३ २०३

२. जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नगररचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०७
निर्णय दिनांक    ३१-१२-२००८

१ श्री. मधुकर तुकाराम साळवे, : अपिलार्थी
रा.उल्हासनगर, जि.ठाणे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, कान्हूर पठार,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, पारनेर,
जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्षः श्री. दादू तुकाराम साळवे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.०३.२००७ रोजी मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडे केलेले, त्यांच्याकडील दि. २५.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये औरंगाबाद खंडपीठास दि.१५.७.२००८ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य ती माहिती दिली नसल्याचे नमूद करुन, ग्राम विकास अधिकारी, कान्हूर पठार ता.पारनेर

जि.अहमदनगर यांनी बेजबाबदारपणे श्री. दादू तुकाराम साळवे यांच्या घर नं. २३ वर बोजा चढविला असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- "दि.४.१०.९७ रोजी दादू तुकाराम साळवे यांच्या घरावर बोजा चढवलेला आहे, तो कोणत्या पत्राच्या आधारे त्या पत्राची छायाप्रत",- अशी माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) प्रमाणे अपील केले. या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांकाचा उल्लेख कोठेही केला नाही, मात्र या अपिलाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि.२१.१२.२००६ रोजीच्या पत्रावरुन अपिलार्थीने हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.११.२००६ रोजी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिली. या पत्रावरुन व त्यासोबत जोडलेल्या राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कान्हूरपठार ता.पारनेर जि.अहमदनगर या संस्थेच्या दि. २५.९.१९९७ रोजीच्या पत्राच्या प्रतीवरुन असे दिसून येते की, श्री.दादू तुकाराम साळवे यांनी मौ. कान्हूर पठार ता.पारनेर,जि.अहमदनगर येथे राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेकडून एक लाख रुपये इतके कर्ज घेतले होते. कर्ज कधी घेतले याचा उल्लेख संबंधित पतसंस्थेच्या पत्रावर नाही तथापि राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या दि.२५.९.१९९७ च्या पत्रामध्ये पतसंस्थेने केलेल्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या मिळकतीवर हा बोजा लावल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, ते त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत.

अपिलार्थी व त्रयस्थ पक्षास हजर राहण्याबाबत आयोगाच्या कार्यालयामार्फत सूचना देऊनही ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांचे म्हणणे आज सुनावणीमध्ये नोंदवून घेता आले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जी अपिलार्थीस दि. १५.१०.२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अनिवार्य होते. त्याऐवजी त्यांना ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप साधे व सरळ होते, असे असतानाही अपिलार्थीस संबंधित पतसंस्थेच्या पत्राची एक झेरॉक्स प्रत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी ६६ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर या संदर्भात केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही हजर झाले नाहीत, असे नमूद केले. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी उपस्थित नाहीत यावरुन अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी योग्य माहिती दिली नाही व त्यांच्या त्रयस्थ पक्ष श्री. दादू तुकाराम साळवे,घ.नं.२३ या मिळकतीवर बेजबाबदारपणे जन माहिती अधिकारी यांनी बोजा चढविला, असे म्हटले आहे तथापि

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही योग्य कशी नाही किंवा संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी हे बेजबाबदारपणे कसे वागले याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा या संदर्भात त्यांनी कोणताही लेखी पुरावा आयोगासमोर सादर केला नसल्याने अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य नाही व त्यांनी केलेला, श्री. दादू तुकाराम साळवे, यांच्या कान्हूरपठार, ता.पारनेर,जि.अहमदनगर घर नं. २३ वर बेजबाबदारपणे बोजा चढविला हा आरोप आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर तुकाराम साळवे,रा. ए-३६० ब्लॉकच्या मागे, कुर्ला कॅम्प नं.४,उल्हासनगर, जि.ठाणे.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, कान्हूर पठार,ता.पारनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१,पंचायत समिती, पारनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०८
निर्णय दिनांक  ३१-१२-२००८

१ श्री. ईश्वर काशिनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
रा.देवपूर, जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनसंरक्षक,
मानव संसाधन विकास,
प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य यांचे
कार्यालय, नागपूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य यांचे
कार्यालय, नागपूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांच्या कार्यालयात दि. १७.०८.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.३.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या विभागीय चौकशी संदर्भात एकूण ४ मुद्यांच्या संदर्भात शीघ्र टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीचा अर्ज अपर प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, त्यांच्या दि. ३१.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सदर अर्ज नाशिक व धुळे वनवृत्तांच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ च्या संदर्भात अपिलार्थीस वन विभागाच्या संकेतस्थळावरुन (Web site) माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.४.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भाने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.५.२००६ रोजी एक पत्र पाठवून या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मागणी संदर्भात काही खुलासा केला.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही आवश्यक ती माहिती पुरविली गेली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडनीय कारवाई करावी, अशी त्यांनी आपल्या युक्तीवादाच्या शेवटी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली. अपिलार्थीस परत मुद्देनिहाय माहिती त्यांनी दि. २९.१२.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात ज्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता, त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती नव्हती. ती माहिती मुख्य वनसंरक्षक, धुळे यांच्याकडे उपलब्ध होती, त्यामुळे अपिलार्थीचा दि. १४.३.२००६ रोजीचा अर्ज दि. ३१.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांकडे पाठविला. अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर कशाप्रकारे कार्यवाही करणे अभिप्रेत आहे, याचे विवेचन अधिनियमातील कलम ६(३)(एक) मध्ये दिले आहे. त्यातील तरतुदींप्रमाणे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,म.रा.,नागपूर कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे ५ दिवसांच्या आत पाठविणे भाग होते तथापि, त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधितांकडे १७ दिवसांच्या विलंबाने पाठविला व परिणामी हा अर्ज संबंधितांस १२ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने दि. १०.४.२००६ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडील दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आपली जबाबदारी अधिनियमातील तरतुदीनुसार पाडली नसल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी आयोगासमोर उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जी अपिलार्थीस दि. २९.१२.२००८ रोजी त्यांनी पाठविल्याचे ते सांगत आहेत, ती माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. आता आयोगाच्या विचाराधीन उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या प्रतिसादाबद्दल प्रश्न शिल्लक राहत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की,

जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रकरणी अपिलार्थीने अर्ज करते वेळी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा नव्याने लागू झाला होता. या कायद्याची अंमलबजावणीची फारशी कल्पना संबंधित जन माहिती अधिकारी यांना नव्हती, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी थोडा विलंब लागला आहे,असे समर्थन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांनी मुद्दामहून, हेतुपूर्वक अथवा कोणत्याही असद्हेतूने टाळले आहे, असे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची शिफारस आयोग संबंधितांकडे करत नाही. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार यापुढे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर व अपिलावर त्यांनी अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीमध्ये कार्यवाही करणे गरजेचे आहे, या सूचनांची त्यांनी गांभीर्यपूर्वक दखल घ्यावी,असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ईश्वर काशिनाथ शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारीजवळ, देवपूर,धुळे-४२४ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा वनसंरक्षक, मानव संसाधन विकास,प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे कार्यालय,वनभवन,रामगिरी रोड,सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन,रामगिरी रोड,सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१ नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१०९
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

१ श्री. ईश्वर काशिनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
रा.देवपूर, जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस महासंचालक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,मुंबई

सध्याचे जन माहिती अधिकारीः पोलीस उपअधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, धुळे.

जन अपिलीय अधिकारीः पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक

त्रयस्थ पक्षः श्री. संजय मोरे,वनक्षेत्रपाल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी,अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त कार्यालय मुंबई यांच्याकडे दि. १७.०८.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दि. ६.५.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द केलेले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या

कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. संजय मोरे, वनक्षेत्रपाल,शहादा या त्रयथपक्षाविषयी काही माहिती मागितली होती. त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. संजय मोरे, वनक्षेत्रपाल,शहादा जि.नंदूरबार यांना रु. ५०,०००/-ची लाच घेताना रंगेहाथ पकडले, यासंदर्भातील F.I.R.,पंचनामा,जाबजबाब, तपासाचा निष्कर्ष,शासनाला पाठविलेला रिपोर्ट, वनाधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार - या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8(g) नुसार देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. १०.४.२००६ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.५.२००६ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी, माहिती अधिकार अधिनियम, २००५च्या अधीन राहून, जी माहिती देता येऊ शकते, ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे सूचित केले व स्त्रोताची गुप्तता राखण्यासाठी जाबजबाबाच्या प्रती देण्याची आवश्यकता नसल्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.५.२००६ रोजी फिर्यादीची प्रत, पंचनामा क्र.१ व २ ची प्रत, जन माहिती अधिकारी यांनी शासनास पाठविलेला अहवाल, जन माहिती अधिकारी यांनी सचिव, वन व पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना पाठविलेल्या पत्राची प्रत, वन संरक्षक,धुळे वनवृत्त,धुळे यांच्याकडील पत्राची प्रत व उपसचिव,महसूल व वने यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पाठविल्या. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या

माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना संबंधितांनी श्री. संजय मोरे प्रकरणी दिलेल्या जाबजबाबाच्या प्रती प्राप्त झालेल्या नाहीत. या प्रतींची त्यांना आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी शासनाकडे श्री. संजय मोरे यांच्या लाचेचे प्रकरण पाठविताना नेमके कोणाकोणाचे व काय जाबजबाब घेतले, या माहितीची त्यांना आवश्यकता आहे. सध्या हे प्रकरण न्यायालयात 'अ' वर्ग समरी म्हणून दप्तरी दाखल आहे. श्री. संजय मोरे यांचे सदरचे प्रकरण परत सुरु झाल्यास त्यामुळे भ्रष्टाचारास आळा बसेल, लाचलुचपत विभागाने शासनास प्रस्तावित करुनही सदर प्रकरण न्यायालयात दाखल करण्यास शासनाने मंजूरी दिली नाही, तथापि या प्रकरणाची चौकशी परत सुरु व्हावी, अशी त्यांची ईच्छा असल्याने त्यांना या जाबजबाबाच्या प्रतींची आवश्यकता वाटत आहे. ज्याअर्थी रु. ५०,०००/- इतक्या मोठया रकमेची लाच घेताना श्री. रमेश मोरे यांना रंगेहाथ पकडले,त्याअर्थी त्या प्रकरणामधील लाचेची रक्कम स्वीकारण्यात श्री. रमेश मोरे यांच्या वरिष्ठांचा हात/सहभाग असण्याची शक्यता आहे. अशा प्रकारचा भ्रष्टाचार उघडकीस आणून ते व्यापक जनहीत साध्य करु शकतील.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दि.१८.५.२००६ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती दिली असून अपिलार्थीस त्यांनी श्री. संजय मोरे प्रकरणात घेतलेल्या संबंधितांच्या जाबजबाबाच्या प्रती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(एक)(छ) च्या तरतुदीप्रमाणे दिल्या नाहीत. अपिलार्थीस या जाबजबाबाच्या प्रती दिल्यास काही व्यक्तींच्या जीवाला धोका उत्पन्न होणार आहे, त्याचबरोबर माहितीचा स्त्रोत उघड होणार असल्याने ही माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी एका व्यक्तिकडून त्यांच्या कार्यालयास दि. १८.१०.२००१ रोजी प्राप्त झालेले

पत्र दाखविले. या पत्राद्वारे श्री. संजय मोरे यांच्याकडून संबंधित व्यक्तिला जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाबरहुकूम त्यांनी अपिलार्थीस दि. १८.५.२००६ रोजी एकूण ४१ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे.

त्रयस्थ पक्ष श्री. संजय मोरे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस सदर माहिती दिल्याने त्यांच्या सामाजिक स्थानास धोका पोहोचेल, समाजात त्यांना उघड माथ्याने वावरता येणार नाही व अपमानास्पद जीवन व्यतीत करावे लागेल त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देऊ नये.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.५.२००६ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेताना अधिनियमातील कलम (११) नुसार त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक होते, तथापि त्यांनी तसे ते घेतले नव्हते. आता आयोगासमोर सुनावणीमध्ये त्रयस्थ पक्षाचे म्हणणे लक्षात घेण्यात येत आहे. त्रयस्थ पक्षाने केलेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या जाबजबाबाच्या प्रतींमुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली असून त्यामुळे या प्रकरणी त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होऊ शकते, असा युक्तिवाद केला आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस जाबजबाबाच्या प्रती दिल्याने माहितीचा स्त्रोत उघड होईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले आहे. हे पाहता, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८(१)(ज) चा भंग होईल, असे आयोगास वाटते व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये असा अभिप्राय व्यक्त केला की, श्री. मोरे यांना रु.५०,००० इतक्या रकमेची लाच घेताना रंगेहाथ पकडले होते, ही रक्कम मोठी असून या प्रकरणामध्ये श्री. मोरे यांच्या वरिष्ठांचा सहभाग असल्याशिवाय एवढी मोठी रक्कम श्री.मोरे लाचेच्या स्वरुपात मागू शकत

नाहीत.त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकारी या प्रकरणी भ्रष्टाचारात समाविष्ट असतील, अशी त्यांना शंका आहे, या मुद्यावर आयोगास असेही अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थी हे रेंजर फॉरेस्ट ऑफीसर या पदावर कार्यरत असताना त्यांनी केलेल्या काही प्रमादाबाबत त्यांना ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीवरुन निलंबित करण्यात आले होते त्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासाठी अपिलार्थी यांना या माहितीची आवश्यकता आहे, ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांच्या वैयक्तिक कारणासाठी हवी असून त्यांना लाचलुचपत विभागाने अद्यापपर्यंत न दिलेली माहिती आता उघड केल्यास, त्यातून व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. मात्र ही माहिती दिल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबतीत मात्र आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद ग्राहय धरुन ही माहिती अपिलार्थीस कलम ८ (ञ) प्रमाणे देय होत नसल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. अपिलार्थी या प्रकरणी संबंधितांच्या जाबजबाबाच्या प्रती उपलब्ध करुन घेऊन व्यापक जनहित साध्य करु शकतील, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे लक्षात घेता, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ६.५.२००६ रोजीच्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होते, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १८.५.२००६ रोजी विनामूल्य प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस आता माहिती देण्याचे कोणतेही प्रयोजन उरल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक :     ३१-१२-२००८**

**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ईश्वर काशिनाथ शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारीजवळ, देवपूर,धुळे-४२४ ००५.

२. (सध्याचे) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, पहिला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग,मुंबई-४०० ०१३,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. (सध्याचे) जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११०
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रविंद्र लक्ष्मणराव माळी,<br>रा.भडगाव जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था,भडगाव,<br>जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>जळगाव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून,खोटी,असंबध्द,व दिशाभूल करणारी माहिती पुरवून त्यांनी मागितलेली माहिती पोलीसांनी जप्त केल्याचे खोटे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करुन दोन महिन्यापेक्षा अधिक कालावधी लोटूनही जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठांच्या आदेशास न जुमानता माहिती अधिकाराचा अवमान करणे चालू ठेवले आहे. आपल्या

या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ताबडतोब देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याचे व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून त्यांना त्रासात, खर्चात व अडचणीत टाकल्यामुळे त्यांच्याकडून त्यांना रु.१०,०००/- इतकी नुकसान भरपाई मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्या दि. १३.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्यांद्वारे श्री. साईबाबा सहकारी गृहनिर्माण संस्था लि.टोणगाव,ता. भडगाव,जि. जळगाव यांच्याशी संबंधित श्री.सुनील भगवान पाटील थकबाकीदार व श्री. कमलाकर मोहनसिंग महाले तत्कालीन प्रशासक या त्रयस्थ पक्षासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्यात येत असून ही माहिती त्यांना वेळेत देण्यात येईल, असे आश्वासित केले.या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १२.१२.२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती/खुलासा कळविला. तथापि अशाप्रकारे मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि.१२.३.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेश केले तथापि हे आदेश प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन

अपिलार्थीच्या दि.१३.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने या अर्जातील मुद्दा क्र.१ व २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येनुसार अर्जदारास त्यांच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत कोणतेही खुलासे, स्पष्टीकरणे अथवा कारणे अशा बाबींची मागणी करणे त्यांना अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास पुरविणे अपेक्षित आहे, हे लक्षात घेता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती मूळात त्यांना देय ठरत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अनिवार्य आहे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती भडगाव पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याने जप्त केली असून त्यांनी ही माहिती आता भडगाव येथील न्यायालयात जमा केली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, अशा प्रकारे कोणत्याही जप्तीची कारवाई झालेली नसून सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ही वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जातील मद्दा क्र.३ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व असंबद्ध माहिती देऊन दिशाभूल केली आहे, खरी व योग्य माहिती देण्यास नकार

दिला आहे, अशाप्रकारची विधाने केली आहेत. या संदर्भात अपिलार्थी यांनी असा खुलासा केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.११.२००६ रोजीच्या पत्रामध्ये माहिती संकलीत करण्याचे काम चालू असून ती संकलीत झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आश्वासित केले होते, परंतु त्यांच्या दि. १२.१२.२००६ रोजीच्या पत्रामध्ये दि. २०.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना माहिती दिल्याचे म्हटले आहे, जे पूर्णपणे खोटे आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीचे म्हणणे सिध्द होत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात दि. २०.११.२००६ रोजी, दि. १२.१२.२००६ रोजी व दि. १६.५.२००७ रोजी पत्रव्यवहार केला. या पत्रांचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस माहिती न देता त्यांच्या कार्यालयातर्फे काही खुलासा करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. जे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, कर्ज माफ करण्याचा निर्णय त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावर होत नाही. जर असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे, त्या कार्यालयाकडे सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठविणे त्यांना अनिवार्य होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. थोडक्यात, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या चुकीमुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहावे लागले. सबब सहकार आयुक्त यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मूद्दा क्र. ३ च्या संदर्भात मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे त्यांना या प्रकरणी झालेल्या त्रासाबद्दल नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.१०,०००/- जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सदोष असल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) सहकार आयुक्त, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रविंद्र लक्ष्मणराव माळी, रा. हायस्कुल रोड, भडगाव ता.भडगाव जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था,भडगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, बी.जे.मेडीकल कॉलेज जवळ, पुणे स्टेशन परिसर,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१११
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. देवमन नारायण आहेरराव,<br>रा. खांडबारा, जि.नंदूरबार. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, खांडबारा,<br>तहसील कार्यालय, नवापूर,<br>जि.नंदूरबार.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, नंदूरबार | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय नवापूर,
जि.नंदूरबार.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त कार्यालय,मुंबई यांच्याकडे दि. १९.१.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी, दि.०७.०३.२००६ रोजी तहसीलदार, यांच्याकडे माहिती अधिकार कायदा २००५ प्रमाणे विनंती अर्ज दिलेला आहे. त्याचे उत्तर आजपर्यंत

मिळालेले नाही. नोव्हेंबर, डिसेंबर, २००५ मध्ये सर्कल अधिकारी यांनी त्यांच्याकडून त्यांच्या घराविषयी माहिती घेतली व पैशांची मागणी केली. त्याप्रमाणे त्यांनी पैसे दिले. काही दिवसांनी त्यांनी तहसीलदार व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना देण्यासाठी परत पैशाची मागणी केली. तथापि अपिलार्थी यांनी पैसे दिले नसल्याने तहसीलदार नवापूर यांच्याकडून काहीही उत्तर मिळाले नाही असे त्यांनी नमूद केले आहे. त्यांच्या विधानाच्या पृष्ठयर्थ त्यांनी तहसीलदार नवापूर यांच्याकडे दि. ४.११.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत सोबत जोडली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्या दि. ०७.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, खांडबारा यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीतील त्यांनी खांडबारा सि.स.नं.४९७ प्लॉट नं.३९ पैकी १२ X १३ चौ.फू. सत्ताप्रकार ब या जागेच्या विक्रीसाठी त्यांच्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या माहितीची मागणी केली होती व दि. ४.११.२००५ रोजीच्या वेगळया अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, नंदूरबार यांच्याकडे सरकारी जमिनीवर झालेल्या अतिक्रमणासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जिल्हास्तरावरील माहिती मागितली असताना उपविभागीय अधिकारी, नंदूरबार यांनी अपिलार्थीस तहसीलदारकडून माहिती घेण्याचे सूचित केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपेक्षित असलेला प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडून नवापूर तालुक्यातील तत्कालीन नायब तहसीलदार यांनी अपिलार्थीस पोलीसांची धमकी देऊन त्यांच्या दि. ४.११.२००५ रोजीच्या अर्जाबाबत त्यांना

संपूर्ण माहिती मिळाल्याचे बळजबरीने त्यांच्याकडून लिहून घेतले व त्यांना प्रत्यक्षात कोणतीही माहिती दिली नाही. माहिती घेण्यासाठी गेले असता त्यांना संबंधितांकडून उडवाउडवीची उत्तरे प्राप्त होतात. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीचे सदरचे प्रकरण म्हणजे माहिती अधिकार अधिनियमाची शोकांतिका ठरली आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही, असे दिसून येते. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीवर कशाप्रकारे व एकूण किती टप्प्यात कार्यवाही करावयाची याचे सविस्तर विवेचन माहिती अधिकार अधिनियमामध्ये केले आहे, एवढे असूनही या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात महसूल विभागाचे तहसीलदार ते जिल्हाधिकारी या पातळीपर्यंतच्या कर्मचाऱ्यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,खांडबारा यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. ७.३.२००६ रोजीच्या प्रथम अर्जावर त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. ४.११.२००५ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,नवापूर यांनी सुनावणी न घेता व कोणताही निर्णय न घेऊन आपल्या कार्यशैलीतून अक्षम्य बेपर्वाई व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. सबब महसूल आयुक्त, नाशिक यांना संबंधित नायब तहसीलदार यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या दि. ७.३.२००६ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, खांडबारा यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व तदनंतरही कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब महसूल आयुक्त, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, नंदूरबार यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाचे वाचन न करता, त्यांच्याशी चुकीचा पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. सबब या चुकीच्या पत्रव्यवहार प्रकरणी त्यांच्या कार्यालयात जे जबाबदार अधिकारी/कर्मचारी असतील, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, नंदूरबार यांच्याकडे शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, खांडबारा जि.नंदूरबार यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ७.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जिल्हाधिकारी, नंदूरबार यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ४.११.२००५ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४) महसूल आयुक्त, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, खांडबारा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवमन नारायण आहेरराव, मु.पो.खांडबारा, लक्ष्मीनारायण मंदिरासमोर ता.नवापूर जि.नंदूरबार

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, खांडबारा, तहसील कार्यालय, नवापूर जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,नवापूर जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१६
निर्णय दिनांक ३१-१२-२००८

१ श्री. अशोक पावलस जाधव, : अपिलार्थी
रा. गंगापूर जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: १. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
२. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी: अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प.औरंगाबाद.

३ त्रयस्थ पक्ष: १. श्री. आर.पी.जोशी
२. श्री.एम.एल.जाधव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. आर.पी.जोशी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्याप सुनावणी घेतली नाही, असे नमूद केले आहे व याचबरोबर जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या कृतीची गांभीर्याने दखल घेऊन, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करण्याचे व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती या अर्जामध्ये करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्या दि. २४.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एम.एस.जाधव व श्री. आर.पी.जोशी यांच्या संदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - श्री. एस.एस.जाधव यांची एक वेतनवाढ बंद केल्याच्या आदेशाची टिपणीसह प्रत, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री. जोशी यांच्याविरुध्द चौकशीकरिता ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे दिलेले पत्र, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी या प्रकरणी दिलेल्या अहवालाची प्रत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी श्री. जोशी यांच्याविरुध्द केलेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीचा अहवाल, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांच्या पत्रावर प्रशासनाने केलेली कार्यवाही व श्री. आर.पी.जोशी यांची बदली करण्याचे कारण व त्यांच्या बदलीकरिता प्राप्त झालेले शिफारस पत्राची प्रत-या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सन २००१ ते २००५ या कालावधीशी संबंधित ही माहिती पोस्टाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१७.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, "अँटी करप्शन ब्युरोचा अहवाल अपिलार्थीस द्यावयाचा किंवा नाही, याबाबत अँटी करप्शन ब्युरोची लेखी परवानगी घ्यावी. संमती दिल्यास दहा दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती द्यावी व संमती न दिल्यास अपिलार्थीस अँटी करप्शन ब्युरोकडून चौकशी अहवाल घेण्याबाबत कळविण्यात यावे". जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय देऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना श्री. जाधव यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली तथापि श्री. जोशी यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती त्यांना अद्यापही अप्राप्त आहे. औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शिक्षकांच्या पाचव्या वेतन आयोगाचा फरक काढण्याकरिता श्री. जोशी यांनी काही शिक्षकांकडून पैसे घेतल्याची माहिती त्यांना प्राप्त झाल्याने त्यांनी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली होती.

त्रयस्थ पक्ष श्री. जोशी यांनी असा युक्तिवाद केला की,अपिलार्थी हे संघटनेच्या नावाखाली अधिकाऱ्यांना त्रास देत असतात, अपिलार्थीच्या अवास्तव मागण्या ते पूर्ण करु शकले नसल्याने अपिलार्थीने ही माहिती संबंधितांकडे मागितली आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी कदाचित पुढे त्रासही देतील, अशी भीती त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली. त्रयस्थ पक्षाच्या या आरोपाचा अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये इन्कार केला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी शिक्षण विभागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी दि. २३.१०.२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांनी अद्यापपर्यंत अपिलार्थीस दिलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्र.३ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २९.१२.२००८ रोजी (आयोगाच्या सुनावणीपूर्वी २ दिवस आधी) रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीने मुद्दा क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी त्यांचा अहवाल त्यांच्या कार्यालयात दिलेला नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भात ॲन्टी करप्शन ब्युरो यांनी शिफारस केल्याप्रमाणे श्री. आर.पी.जोशी यांच्यावर खातेनिहाय चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे. श्री. जोशी यांना कारणे दाखवा नोटीस व दोषारोपपत्र दिलेले आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र. ६ संदर्भात त्यांनी श्री. जोशी यांच्या बदलीबद्दल मागितलेली कारणे ही माहिती त्यांना देय नाही व श्री. जोशी यांच्या बदलीकरिता कोणतेही शिफारस पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित होती व मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध होती. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या अर्जातील माहिती अशाप्रकारे विविध सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असल्याने अधिनियमातील कलम ६(३)(एक) नुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधितांकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केल्याचे येथे दिसून येत नाही. मूळात शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी देखील अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अपिलावर दि. १७.१०.२००७ रोजी निर्णय झाल्यानंतर, अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २३.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. इतर विभागाने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्या दोन दिवस अगोदर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे फक्त पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी यांच्याकडे पाठविली आहे. मूळ अर्जातील माहितीच्या अनुज्ञेयतेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे, यावरुन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण ६ मुद्यांवरील माहितीपैकी अद्यापपर्यंत त्यांना फक्त एका मुद्याशी संबंधित माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते, अशाप्रकारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण असल्याचे तसेच हा प्रतिसाद शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.औरंगाबाद यांनी विलंबाने दिल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व विलंबाने दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील विविध विभागातील कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे सहाय्य घ्यावे लागणार होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अशा सर्व सहायकांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे सर्वजण या प्रकरणी एकत्रित जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे या सर्वांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस अर्धवट व विलंबाने माहिती देण्यासाठी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक पावलस जाधव, म.फुलेनगर, गंगापूर ता.गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.